ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

Je<e 43 DekeÀ 7 heeve 56 ce 2016 ceu³e 22 ©.

## ’eoJ³eeie“

eoJ³eeie yeeOeJee®ee meJemeceeJeMekeÀ HeJeeme

[e. meO³ee eueceȝe

eJeMe<e ueKe

Me#eeCekeÀ Oee j Ce DeeeCe eoJ³eeie

FoceIee jeJe

eoJ³eeieemeeþe jepeieej DeeeCe keÀeMeu³e eJekeÀmee®³ee meOee

MeeIee jeIeJeve


(HeÀekeÀme)

eoJ³eeie J³eekeIe®ee meueYe JeeJej DeeeCe I³ee®e enIe

eMeJeevee ieHIee

eoJ³eeie J³ekeIeemeeþe DeeeLekeÀ meceeJeMekeÀIee

Hee. mee. Oeme






मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| eve³eecele DekeÀ ceu³e | 22.00 ©He³e |
| eJeMe<eekeÀ | 30.00 ©He³e |
| Jeee<ekeÀ JeieCee | 230.00 ©He³e |
| eÜJeee<ekeÀ JeieCee | 430.00 ©He³e |
| e$eJeee<ekeÀ JeieCee | 610.00 ©He³e |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केन्द्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी. ekeÀJee www.bharatkosh.gov.in/product
³eLe DeeveueeFve YejeJee.

JeieCee ceveeDee [ jve HeeþeJeleevee DeeHeue veeJe, HeÊee Je meHekeÀ ¬eÀceekeÀ keÀHeveceO³e meJee®³e De#ejele euene.

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४३ ❖ ❖ अंक ७ ❖ ❖ मे २०१६ ❖ ❖ मूल्य २२ रु. ❖



मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**

संपादक
**उमेश उजगरे**

उप संपादक
**अभिषेक कुमार**

मुखपृष्ठ
**जी.पी. धोपे**



**'योजना' हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.**



**जाहिरात दर पत्रक**

| | |
|---|---|
| ब्लॅक ॲड व्हाईट पूर्ण पान: | रु. १०,००० |
| ब्लॅक ॲड व्हाईट अर्धे पान: | रु. ६,००० |
| बॅक कव्हर पूर्ण पान: | रु. २०,००० |
| सेकंड कव्हर पूर्ण पान: | रु. १७,००० |
| थर्ड कव्हर पूर्ण पान: | रु. १५,००० |


## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ■ दिव्यांग बांधवांचा सर्वसमावेशक प्रवास | डॉ. संध्या लिमये | ५ |
| ■ शारिरीक अक्षमता विरूद्ध विविध क्षमता | अर्चना सिंह | ८ |
| ■ दिव्यांग-एक व्यावसायिक दखल | अरुणीमा डे | १२ |
| ■ शैक्षणिक धोरण आणि दिव्यांग (विशेष लेख) | इंदुमती राव | १५ |
| ■ दिव्यांगासाठी रोजगार आणि कौशल्य विकासाच्या संधी | शांती राघवन | २१ |
| ■ दिव्यांग व्यक्तींसाठी वाहतूक साधनांची उपलब्धता | डॉ. देवर्षी चौरसिया | २४ |
| ■ अपंग व्यक्तींचा सुलभ वावर आणि त्यांचे हित (फोकस) | शिवानी गुप्ता | २७ |
| ■ साधनांची उपलब्धता-विकसित भारतासाठी नवा माग | डॉ.गौरव रहेजा | ३३ |
| ■ दिव्यांग व्यक्तींसाठी आर्थिक समावेशकता | पी.सी.दास | ३८ |
| ■ कर्णबधीरता: लोकगीतातून जनजागृती | डॉ. त्र्यंबक दुनबळे | ४४ |
| ■ शेतीचा विकास आणि सामुदायिक रेडीओची भूमिका | अश्विनी कांबळे | ५० |



योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

ISSN-0971-8397
विकास समर्पित मासिक
योजना

संपादकीय

# वाटचाल सक्षमतेकडे

महान शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईन यांना शिकविलेले समजायला अडचण असणारा आजार (डिसलेक्सिया) होता. तरीही त्यांनी विश्वाकडे पाहण्याचा आणि त्याचे गूढ समजून घेण्यासाठी महत्वाचा ठरलेला सापेक्षततावादाचा सिद्धांत जगाला दिला. थॉमस अल्वा एडिसनला नीट ऐकू येत नसे, पण याच शास्त्रज्ञाने विजेचा शोध लावला. त्याचा हा शोध आजचे आधुनिक जग आकाराला आणण्यासाठी इतर कशापेक्षाही जास्त महत्वाचा ठरला आहे. लुईस ब्रेल दृष्टिहीन होता, पण त्याने शोधून काढलेल्या 'ब्रेल लिपी'मुळे जगभरातील अंध व्यक्तींना वाचण्या-लिहिण्याची सुविधा उपलब्ध होऊ शकली.

ही प्रातिनिधिक उदाहरणे पाहिल्यानंतर काय लक्षात येते ? या अशा व्यक्ती आहेत ज्यांनी हे सिद्ध केले आहे की अंगात गुण असतील तर अपंगत्वावर मात करता येऊ शकते.

एक काळ असा होता जेंव्हा अपंगत्व- मग ते शारीरिक असो की मानसिक, हा त्या व्यक्तीला आणि त्याच्या कुटुंबाला मिळालेला शाप मानले जायचे. मागच्या जन्मीच्या पापाचे फळ म्हणून त्याकडे पाहिले जाई. आधुनिक विज्ञानामुळे हे गैरसमज आता दूर झाले आहेत. वैद्यकीय उपचाराद्वारे अपंगत्वावर मात केली जाऊ शकते, हे सत्य आता लोक स्वीकारू लागले आहेत. विज्ञान आणि नव-नव्या शोधांमुळे अपंगत्वावर मात करण्यासाठीची साधने उपलब्ध होत आहेत. ब्रेल लिपी, जयपूर फूट ही काही उदाहरणे आहेत. ज्यामुळे शारीरिक विकलांग व्यक्तींचे जीवन आणखी सुसह्य झाले आहे. मानसिक विकलांगांनाही त्यांच्या गरजांबाबत समाजामध्ये मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेल्या संवेदनशीलतेचा लाभ होताना दिसत आहे.

या व्यक्तींसाठी विशेष शिक्षणाच्या असलेल्या गरजेबाबतची जागरूकताही पूर्वीपेक्षा खूप वाढली आहे. एवढेच नव्हे तर आता असाही विचार मांडला जात आहे की सर्वसमावेशक वातावरण तयार करण्याचा एक भाग म्हणून दिव्यांग किंवा अपंग मुलांना विशेष शाळांमध्ये न पाठवता त्यांना इतर सामान्य शाळांमध्येच सामावून घेतले जावे. सामाजिक आणि सांस्कृतिक समावेशन ही अजूनही एक समस्याच आहे. अर्थात, ही स्थिती लवकरच बदलेल आणि दिव्यांग व्यक्तींकडे समाज आणि राष्ट्राचा एक अविभाज्य आणि महत्वाचा घटक म्हणून पाहिले जाईल.

माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानाची साथ लाभल्यामुळे राष्ट्र उभारणीच्या कार्यास हातभार लावण्याची शक्ती दिव्यांग नागरिकांना प्राप्त झाली आहे. दिव्यांगांना अडचणी आणि अडथळे विरहीत वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी आणि त्यांना स्वावलंबी-स्वतंत्र आयुष्य जगता यावे यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले जात आहेत. 'ॲक्सेसिबल इंडिया' मोहीम ही सर्वसमावेशक समाज निर्माण करण्याच्या सरकारच्या अशाच दूरदृष्टीचा परिपाक आहे. या मोहिमेंतर्गत दिव्यांग व्यक्तींना उत्पादक, सुरक्षित आणि सन्मानजनक आयुष्य जगता यावे यासाठी विकास आणि आणि उत्कर्षाची प्राप्य तसेच समान संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.

अलीकडील काळात दिव्यांग व्यक्तींना कामावर घेण्याचे प्रमाण वाढले आहे. यातून अशा व्यक्तींच्या आर्थिक सामावेशनाबाबत घडत असलेला सकारात्मक बदल अधोरेखित होतो. तुलनेने चांगल्या कौशल्यविकास संधीमुळे अधिक अर्हताप्राप्त आणि सक्षम मनुष्यबळ उपलब्ध झाले आहे. परिणामी दिव्यांग व्यक्तींच्या क्षमतांवरचा नियोक्त्यांचा विश्वास वाढला आहे. त्यामुळेच दिव्यांग व्यक्ती आता सरकारी नोकरी, मनोरंजन उद्योग आणि अगदी क्रीडा क्षेत्रासह जवळपास प्रत्येक क्षेत्रात दिसू लागल्या आहेत. प्रत्येकाच्या आयुष्याचे एक प्रयोजन, उद्देश आणि मूल्य असते, मग स्थळ, वय, लिंग कोणतेही असो, किंवा ती व्यक्ती अपंग असो व नसो. गरज आहे ती फक्त हे ओळखण्याची की दिव्यांग व्यक्ती या सर्वाधिक प्रेरणादायी असतात. त्यांना योग्य आणि समान संधी मिळाली तर 'सामान्य' व्यक्तींपेक्षाही जास्त कणखर आणि सक्षम असल्याचे त्या दाखवून देतील. आणि हे वास्तव स्विकारण्याची आपल्या सर्वांची मानसिकता असेल तर निश्चितच समाजामध्ये झालेला बदल आपण प्रत्यक्ष पाहू शकू.

■■■

# दिव्यांग बांधवांचा सर्वसमावेशक प्रवास

डॉ. संध्या लिमये



***जगभराचा आढावा घेता असे आढळते की, जगातील सर्वांत मोठ्या अल्पसंख्यांक समुदायापैकी एका गट हा दिव्यांग/अपंगांचा आहे. पण हा गट इतका असुरक्षित आहे की, समाजाचे याकडे वारंवार दुर्लक्ष होते, नव्हेतर ह्या गटाचे शोषण केले जाते, त्यामुळे ते वंचित तथा बहिष्कृत राहतात. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात, बहुतांश देशांनी शारिरीक विकलांगता असणाऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष पुरवण्यास सुरुवात केली.***

सामाजिक समावेशन, म्हणजे बहिष्करणाच्या नेमकी उलट संकल्पना. किंवा बहिष्करणाकडे नेणाऱ्या परिस्थिती किंवा सवयींमधील सकारात्मक बदल. जागतिक बँकेच्या म्हणण्यानुसार, समाजात समाविष्ट होण्यापासून ज्या लोकांची ओळख परावृत्त करते अशा लोकांच्या क्षमता, संधी आणि सन्मानामध्ये वाढ करणारी प्रक्रिया होय.

जगभराचा आढावा घेता असे आढळते की, जगातील सर्वांत मोठ्या अल्पसंख्यांक समुदायापैकी एका गट हा दिव्यांग/अपंगांचा आहे. पण हा गट इतका असुरक्षित आहे की, समाजाचे यांकडे वारंवार दुर्लक्ष होते, नव्हेतर ह्या गटाचे शोषण केले जाते, त्यामुळे ते वंचित तथा बहिष्कृत राहतात. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात, बहुतांश देशांनी शारिरीक विकलांगता असणाऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष पुरवण्यास सुरुवात केली. देणग्या व संस्थांच्या मदतीवर ह्या समुदायाला उपचार व पुनर्वसन देत असतानाच, शासकीय व अशासकीय मदतीने मानवी हक्क पुरवण्यास प्रारंभ झाला. स्वातंत्र्योत्तर काळात, या गटाची जबाबदारी सर्वतोपरी आपली असल्याचे भारत सरकारने मान्य केले व त्यानुसार, विकलांग व्यक्तींच्या कल्याणार्थ व पुनर्वसनार्थ अनेक कार्यक्रमांची आखणी केली.

विकलांगांना बऱ्याच प्रकारच्या अडचणी असतात. प्रावृत्तिक, शारिरीक आणि सामाजिक अशा प्रकारचे अडथळे समाजात समाविष्ट होण्यापासून त्यांना प्रवृत्त करतात. पहिल्या प्रकारचा अडथळा, समाजाच्या नकारात्मक प्रवृत्तीमुळे उत्पन्न होतो. समाज मनात विकलांगतेबद्दलचा डाग पुसला जात नाही. त्याच्या नुसार शरीराची अक्षमता ही कर्मामुळे प्राप्त झालेली असते. पूर्वजन्मीच्या कृत्यांमुळे देवाने दिलेली ही शिक्षा असून त्याबाबत कुणालाही काही करणे शक्य नाही. याचा परिणाम म्हणजे हे लोक समाज आणि अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहापासून विलग होतात. सक्षम लोकांच्या प्रवाहात त्यांना रोज दैनंदिन जीवनामध्ये झुंजावे लागते. बऱ्याच गोष्टी सहन कराव्या लागतात. या अनुभवाची कटु फळे त्यांचे आणि त्यांच्या कुटुंबीयांचे जीवनमान त्रस्त करतात. यातील बरेचसे लोक एकलकोंडे होतात, समाज त्यांना नकोसे झाल्याची व या समाजावर त्यांचा भार असल्याची जाणीव देतो. त्यांच्या कुटुंबीयांना, अर्थात पालक-मुले व भावडांनाही नकारात्मक भावनांना, दारिद्र्याला आणि सामाजिक बहिष्कृततेला सामोरे जावे लागते. बऱ्याच लोकांना असे वाटते की, जो काळ समाजाकडून पाठिंबा मिळण्यात जावयाचा तो प्रदीर्घ काळ समाजाशी लढण्यात व्यतित झाला आहे.

वाळीत टाकणे म्हणजे समाजजीवनातून व्यक्तिश: परस्पर

संबंधातून व समाज पातळीतून त्याच्या गरजा भागवण्यापासून संपूर्णत: वगळणे- अगदी बहिष्काराची परिसीमाच. उघडउघडपणे ही गोष्ट सर्व पातळ्यांवर घडते. ह्या गटाला ज्या अडथळ्यांचे जे चक्र पार करुन जावे लागते त्या चक्राला भेदणारे इतरही सामाजिक घटक आहेत जसे, जात, वंश, धर्म, मूळस्थान, प्रांत आदी. या दुहेरी वर्गवारीतून, भेदांतून त्यांना फिरावे लागते. विकलांगता आणि लिंगभेद या दोन्ही गोष्टी मानव म्हणून जगताना पंगु करतात. सर्वसामान्य समाजव्याख्यांची पूर्तताही विकलांग मनुष्य करु शकत नाही. पौरुष म्हणजे शक्ती, शारिरीक क्षमता व स्वयंतंत्र. मात्र विकलांग पुरुष ह्या गोष्टी दर्शवू शकत नाही. तर विकलांग स्त्री देखील गृहिणी, पत्नी आणि आई म्हणून स्वीकारली जाण्यात अयशस्वी ठरते. तथा शारिरीक पातळीवरील स्त्री सौंदर्यांची व्याख्याही पूर्ण करु शकत नाही.

शतकानुशतके शारिरीक, मानसिक व सामाजिक पातळीवर, हा गट निव्वळ दुर्लक्षित, शाब्दिक शोषणास व शारिरीक त्रासास, लैंगिक शोषणास बळी पडला आहे.

प्राथमिक शालेय विकासकालामध्ये, मैत्री ही समान आवडीनिवडी, शालेय उपक्रम आणि क्रिडा स्पर्धांतून होते. विकलांग मुले समाज कौशल्यांमध्ये मागे पडतात. संवाद साधू शकत नाहीत. कारण मुळात मैत्रीमध्ये संभाषण गरजेचे असते. संभाषण आणि नाते संबंध - दृढ होण्यास आवश्यक कौशल्ये ही मुलाच्या प्राथमिक परिघातील संपर्कांमुळे वाढीस लागतात. त्यानंतरच्या वर्तुळात नातेवाईक व इतर लोक समाविष्ट असतात. मानवी स्वभावाचे हे सामाजिक आकृतिबंध फार कोवळ्या वयात तयार होतात. ह्यांचा व्यक्तिमत्वावर परिणाम होतो म्हणून या वयात येणाऱ्या सामाजिक अनुभवांचा मोठेपणी मूल, व्यक्ती म्हणून कोण असेल, त्यावर प्रभाव असतो. कर्णबधीर मुले व

***विकलांगता आणि लिंगभेद या दोन्ही गोष्टी मानव म्हणून जगताना पंगु करतात. सर्वसामान्य समाजव्याख्यांची पूर्तताही विकलांग मनुष्य करु शकत नाही. पौरुष म्हणजे शक्ती, शारिरीक क्षमता व स्वयंतंत्र. मात्र विकलांग पुरुष ह्या गोष्टी दर्शवू शकत नाही. तर विकलांग स्त्री देखील गृहिणी, पत्नी आणि आई म्हणून स्वीकारली जाण्यात अयशस्वी ठरते.***

गतीमंद मुले, सभोवतालच्या लोकांशी संवाद साधू शकत नाहीत. नवी मैत्री प्राप्त करताना खूपदा त्यांच्या आत्मसन्मानाला ठेच लागते व समाजात त्यांची स्वीकृती बरीच अयशस्वी ठरते. सगळ्यात मोठी तसेच मूळ समस्या अशी आहे की, अपंग बांधवांचा एकलकोंडेपणा व चिंतातुरता यामध्ये वाढ होत आहे. याचे कारण संवादाचा अभाव होय. तर दुसऱ्या बाजूला, दृश्य आणि अगतिशील अशा अपंग बांधवांच्या समस्या समाजाच्या सहजपणे लक्षात येतात. आणि समाज त्याकडे सहानुभूतीपूर्वक पाहतो. समाजाचे वर्तनही त्यानुसार होते. म्हणून सजग अशा समाजाला अपंग बांधवांशी सुसंवाद साधण्याची संधी दिली पाहिजे. आणि अशातऱ्हेने अपंग बांधवांना समाजाच्या मूळ प्रवाहात आणले पाहिजे.

ज्या लोकांना अपंगत्व आहे, अशा लोकांच्या स्थितीस ते स्वत:च जबाबदार आहेत अशा तऱ्हेची भाषा वापरली जाते. त्यांना शैक्षणिक तसेच रोजगार विषयक संधी नाकारल्या जातात. एवढेच नव्हेतर इतर समाजाशी अर्थपूर्ण नाते जोडण्यासही प्रतिबंध केला जातो. त्यांच्यावर 'कुचकामी' असा शिक्का मारण्यात येतो आणि समाजावर ते भार आहेत, अशी संभावना करण्यात येते.

अनेक अपंगमित्र, अपंगत्वामुळे समाजाला तसेच अर्थ व्यवस्थेला योगदान देऊ शकत नाहीत, हे खरे असले तरी त्यांना योग्य ते सहाय्य दिले तर ते आपले योगदान पूर्णपणे देऊ शकतात. आजचा विचार करता यातील अनेकजण रोजगारापासून दूर आहेत. त्यांच्यामध्ये असलेल्या क्षमतेचा आणि कौशल्याचा एक वर्ग तयार झाला आहे. आपण त्यांच्या या संभाव्य कौशल्याचा व क्षमतेचा वापर करु शकलो तर आपोआपच नवीन आशादायी वातावरण निर्माण होऊ शकेल. अपंगांना त्यांचे रोजगार विषयक अधिकार देऊन त्यांना मिळवते करुन सक्षम बनविण्याऐवजी कुटुंबाकडून तसेच शासनाकडून परावलंबित्वाचे जीवन बहाल केले जाते. त्यांच्या तरुणपणाच्या काळात कठीण आर्थिक परिस्थिती लादली गेल्यामुळे वार्धक्यकाळ अंधकारमय होतो. अशा तऱ्हेने अपंगांच्या वार्धक्याबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण होते.

अपंग बांधवांच्या शारिरीक पातळीवरील मर्यादांचा विचार करता त्यांना सहाय्यभूत असे वातावरण मिळणे कठीण असते. उदा. वाहतूक व्यवस्था किंवा उद्वाहन सुविधायुक्त इमारती इ. मुंबईसारख्या शहरांमध्ये अपंग प्रवासी बांधवांना अत्यंत असुरक्षित अशा वातावरणात रेल्वेस्थानकांमध्ये किंवा रेल्वेमध्ये प्रवास करावा लागतो. सर्वसामान्य नागरिकांप्रमाणेच अपंग नागरिकांनाही रेल्वेमधून प्रवास करण्याचा अधिकार आहे. रेल्वेमंडळाला त्यांच्या विविध अपंगत्वाचा विचार करुन अधिकधिक सोयी पुरविण्याचा विचार करणे गरजेचे आहे.

शासकीय धोरणाचा जो मसुदा तयार केला जातो. त्यामध्ये विविध प्रकारच्या लोकांमध्ये असलेल्या भिन्न भिन्न गरजांचा विचार केला गेला पाहिजे. वस्तुत तसे होत नाही. अनेकदा अपंग लोकांच्या अपंगत्वाच्या विविधतेच्य दृष्टीने विचार

केला जात नाही. त्यांच्याशी सल्लामसलत केली जात नाही. अनेकवेळा असे होते की, अपंगांना आपण व्यवस्थेशी लढत आहोत असे वाटते.यामुळे त्यांना व्यवस्था त्रोटक वाटते, गुंतागुंतीची वाटते, किंवा नोकरशाहीधार्जिणी वाटते. त्याचप्रमाणे ती अपंगांच्या गरजा केंद्रस्थानी ठेवून केलेली नाही असेही वाटते. याचा परिणाम म्हणून चांगले जीवनमान जगण्याची संधी नाकारुन मुख्य प्रवाहापासून दूर ढकलले गेलो आहोत असेही त्यांना वाटते. आपल्याकडील ही राजकीय आणि वैधानिक प्रक्रिया ही, अलगतावाद जोपासणारी, अपंगजनतेला नगण्य स्थान देणारी वाटते. याचा परिणाम यांना समाजातून बहिष्कृत केल्याप्रमाणे वाटतो

**धोरण**

दिव्यांग बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करुन घेण्याची मागणी ही समाजाने या बांधवांविरोधात चालविलेल्या दडपशाहीच्या निषेधाचा एक भाग आहे. यात महत्वाचे हेच की, आपण या बाबतीत पक्षपाती विचारसरणीला तसेच त्यांच्या शोषणाला पूर्णविराम दिला पाहिजे. अशा तऱ्हेने त्यांच्या वरील बंधने काढून टाकली की, अपंग बांधवांच्या सक्षमीकरणादृष्टीने सुरुवात होईल. एक जबाबदार नागरीक म्हणून त्यांना, त्यांच्या कुटुंबात, समाजात, कामाच्या ठिकाणी कर्तृत्वाची संधी मिळेल. आपण या बांधवांचे परावलंबित्व तसेच त्यांच्याकडून न्यून अपेक्षा जोपासणाऱ्या संस्कृतीला पूर्णविराम देऊ. आपण अशा नव्या समाजात अपंग बांधवांचा समावेश करु की, अपंग बांधवांना अधिकाधिक सक्षम बनवून, त्यांना सहाय्य करुन, समाजाच्या मुख्य प्रवाहात त्यांचा सहज समावेश होईल.

दिव्यांग बांधवांवरील प्रतिबंध हटवणे, त्यांच्यापाशी असलेले अडथळे दूर करणे हे फक्त सरकारचेच काम आहे, असे नव्हे. त्यामध्ये प्रत्यक्ष अपंग बांधवांचा, त्यांच्या व्यवसाय मालकांचा, वैद्यकीय व्यवस्थापक, शिक्षण क्षेत्रातील लोक, स्थानिक जातीजमाती, त्याचप्रमाणे वस्तू व सेवा पुरवठादार या सारख्या अनेकांचा समावेश आहे. त्यांनी एक जबाबदार भूमिका निभावून अपंगांच्या आयुष्यात निश्चित अशी संधी मिळवून देणे गरजेचे आहे तसेच त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात स्थान देणे महत्वाचे आहे.

***दिव्यांग बांधवांवरील प्रतिबंध हटवणे, त्यांच्यापाशी असलेले अडथळे दूर करणे हे फक्त सरकारचेच काम आहे, असे नव्हे. त्यामध्ये प्रत्यक्ष अपंग बांधवांचा, त्यांच्या व्यवसाय मालकांचा, वैद्यकीय व्यवस्थापक, शिक्षण क्षेत्रातील लोक, स्थानिक जातीजमाती, त्याचप्रमाणे वस्तू व सेवा पुरवठादार या सारख्या अनेकांचा समावेश आहे. त्यांनी एक जबाबदार भूमिका निभावून अपंगांच्या आयुष्यात निश्चित अशी संधी मिळवून देणे गरजेचे आहे तसेच त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात स्थान देणे महत्वाचे आहे.***

याकरिता, काळजीपूर्वक नियोजन करुन पुरेशी साधन सामुग्री उपलब्ध करुन, त्याची पुर्तता खालीलप्रमाणे दूरदृष्टी ठेवत करता येईल.

१. अपंगत्वाच्या विविध प्रकारच्या समस्यांचा उहापोह करुन त्यांच्या गरजा आणि क्षमता लक्षात घेऊन समाजातील विविध स्तरातील लोकांसाठी संवेदनशील आणि जागृतीविषयक कार्यक्रम करणे.

२. या क्षेत्रातील लोकांना सेवा देताना विविध स्तरातील धुरिणांनी, उदा. वैद्यकीय क्षेत्रातील व्यावसायिक, शिक्षक, शासकीय कर्मचारी,वकील,व्यवसाय मालक,रोजगार विनिमय अधिकारी, समाजातील स्थानिक पुढारी, इत्यादींनी अपंगाबद्दलचे ज्ञान वाढवणे, त्यांच्या बरोबर काम करण्याचे कौशल्य हस्तगत करणे, तसेच अपंगत्व या संकल्पनेचा तसेच अपंग बांधवाबद्दलचा दृष्टीकोन बदलणे आवश्यक आहे.

३. त्यांच्या अंगिभूत गुणांवर दृष्टीकोनावर लक्ष केंद्रीत करुन त्यांच्यामध्ये क्षमतेचा विकास करुन, त्यांना सक्षम बनवून त्यांना अपंगत्वावर मात करण्याकरिता प्रोत्साहन देणे.

४. अपंग बांधवांना प्रशिक्षीत करण्याकरिता बी.एड्. तसेच एम्.एड्. या शिक्षणविषयक अभ्यासक्रमात, अध्ययनशास्त्र बदलून अपंगाबद्दलचा अभ्यासक्रम सक्तीचा करावा.

५. अपंग बांधवांना, समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करुन घेण्याकरिता, प्रत्येक ठिकाणी प्रवेश दिला पाहिजे, तशी संधी त्यांना द्यायला हवी. अशा तऱ्हेने, त्यांचा समाजात सहभाग वाढेल. ते आपल्या क्षमतांवर विश्वास ठेवू शकतील.

६. इतर सामान्य नागरिकांसाठी जी काही धोरणे अवलंबली जातात, त्याबरोबर अपंग बांधवांबरोबरचीही धोरणेही आखली जावीत. अशा धोरणांचा त्यामध्ये समावेश सक्तीने असावा.

७. अपंग बांधव शासनाबद्दल जो काही अनुभव घेत आहेत. त्यात बदल होणे आवश्यक आहे. अपंग बांधव व शासन यांच्यामध्ये पुरेसा संवाद अपेक्षित आहे.

८. सर्वप्रकारचे अडथळे दूर करण्यासाठी वैश्विक तसेच सर्वसमावेशक वातावरण तयार करण्याची गरज आहे.

■■■

*लेखिका मुंबई येथील 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस'मध्ये सहयोगी प्राध्यापिका आहेत.*

*gmail: sandhyalimaye@yahoo.co.in*

# शारिरीक अक्षमता विरूद्ध विविध क्षमता

अर्चना सिंह



***संयुक्त राष्ट्रांच्या मते जगाच्या लोकसंख्येच्या 15 टक्के म्हणजे एक अब्ज लोक हे काहीना काही अक्षमतेने किंवा विकलांगतेने पीडित आहेत. त्यांच्यात काही तरी शारीरिक अक्षमता आहेत. भारताच्या 2011 च्या जनगणनेतील आकडेवारीनुसार देशात 26 दशलक्ष लोक विशेष (दिव्यांग) किंवा विकलांग आहेत ही संख्या ऑस्ट्रेलियाच्या लोकसंख्येपेक्षा जास्त आहे. भारत हा वेगाने विकसित होणारा देश आहे, बरीचशी प्रगती अनुकूलतेच्या दिशेने आहे, ती अजून होतेच आहे. असे असले तरी या प्रगतीतही काही उणिवा आहेत.***

आपल्या दैनंदिन व्यवहारात अनेक गोष्टी आपण रोज करीत असतो त्यात अक्षम किंवा विकलांग व्यक्तींना सामावून घेतले जाईल अशा आणाभाका आपण नेहमीच घेत असतो पण आता परिस्थिती बदलते आहे. अलिकडेच विज्ञान भवन येथे 'ॲक्सेसिबल इंडिया' कॅम्पेन या मोहिमेचा श्रीगणेशा झाला, विज्ञान भवन हे दिल्लीतील अगदी प्रसिद्ध ठिकाण आहे तिथे मोठेमोठे कार्यक्रम होतात. पण एक मोठी दुर्दैवी बाब अशी की, जिथे ही योजना सुरू करण्यात आली ते ठिकाणच विकलांग व्यक्तींना सोयीचे नव्हते म्हणजे 'ॲक्सेसिबल' नव्हते त्यातूनच आपल्याला अजून किती प्रगती साधायची आहे हे दिसून येते. अशा अनेक घटना सांगता येतील की, जिथे आपल्याला विकलांग किंवा विशेष व्यक्तींना संबंधित सुविधा वापरता येण्यासारख्या नाहीत असे अनुभव येतात. संयुक्त राष्ट्रांच्या मते जगाच्या लोकसंख्येच्या १५ टक्के म्हणजे एक अब्ज लोक हे काहीना काही अक्षमतेने किंवा विकलांगतेने पीडित आहेत. त्यांच्यात काही तरी शारीरिक अक्षमता आहेत. भारताच्या २०११ च्या जनगणनेतील आकडेवारीनुसार देशात २६ दशलक्ष लोक विशेष (दिव्यांग) किंवा विकलांग आहेत ही संख्या ऑस्ट्रेलियाच्या लोकसंख्येपेक्षा जास्त आहे. भारत हा वेगाने विकसित होणारा देश आहे, बरीचशी प्रगती अनुकूलतेच्या दिशेने आहे, ती अजून होतेच आहे. असे असले तरी या प्रगतीतही काही उणिवा आहेत. विकलांग (दिव्यांग) व्यक्तीला विशेष व्यक्ती म्हणून मान्यता देऊन अजून आपण सोयीसुविधा उपलब्ध केलेल्या नाहीत. हे कमी म्हणून की काय समाजाने विशेष किंवा विकलांग किंवा दिव्यांग व्यक्तींकडे त्यांच्या शारीरिक वैगुण्यामुळे किंवा अन्य कारणांनी विचित्र नजरेने पाहिले आहे. भारतात अजूनही आपण अशा व्यक्तींकडे आपण अपंगता म्हणजे विशेष व्यक्ती प्रमाणपत्र मागतो . सक्षम अधिकाऱ्यांकडून कायदेशीररित्या ती व्यक्ती अपंग आहे असे प्रमाणपत्र घ्यावे लागते.

**अक्षम किंवा अपंग (दिव्यांग) व्यक्ती कुणाला म्हणायचे ?**

भारतात वैद्यक व्यावसायिक मंडळ सरकारने स्थापन केले असून ते तुम्ही अक्षम आहात की नाही ते ठरवते. तुमची अपंगत्व किंवा अक्षमता ४० टक्के आहे की त्यापेक्षा जास्त आहे हे तेच मंडळ ठरवते त्याच्या आधारे अपंगत्व किंवा अक्षमतेचे प्रमाणपत्र दिले जाते. या

अक्षमता कायद्याच्या चौकटीत बसणाऱ्या असतील तरच प्रमाणपत्र मिळते. हे प्रमाणपत्र असेल तरच त्या स्त्री किंवा पुरूषाला सरकारने त्यांच्यासाठी दिलेल्या सुविधांचा व योजनांचा लाभ घेता येतो. अपंगत्व किंवा विकलांगता प्रमाणपत्र मिळवण्याची प्रक्रिया कालहरण करणारी असली तरी त्यामुळे अशी प्रमाणपत्रे गैरमार्गाने मिळवण्याचे टाळले जाऊ शकते. कारण सर्व बाबींची शहानिशा करण्यास थोडा वेळ देणे गरजेचे असते. एकविसाव्या शतकात आपण डिजिटल इंडिया व तंत्रज्ञानाची भाषा करतो आहोत त्यामुळे आता अपंगत्व (विशेष क्षमता व्यक्ती) किंवा विकलांगता प्रमाणपत्राची प्रक्रिया आता तंत्रज्ञानाधिष्ठित होत आहे. त्यात काही स्वागतार्ह बदल होत आहेत.

**अपंगत्व किंवा विकलांगता प्रमाणपत्राचा प्रवास-**

अपंग व्यक्तींसाठी नियमानुसार (नियम- २००९) अपंगत्व किंवा विकलांगता प्रमाणपत्र मिळवण्याची पहिली पायरी म्हणजे ज्या व्यक्तीला असे प्रमाणपत्र हवे असेल त्याला किंवा तिला विहित नमुन्यात अर्ज करावा लागतो तो सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. हा अर्ज करताना त्याच्या सोबत निवासाचा पुरावा, अलिकडची दोन पासपोर्ट आकाराची छायाचित्रे द्यावी लागतात नंतर तो अर्ज सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे सादर करावा लागतो, तो अर्जदार ज्या जिल्हयातील निवासी असेल तेथे त्याने किंवा तिने अर्ज सादर करणे आवश्यक असते. अनेकदा तो सरकारी रूग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे सादर केला जातो जिथे त्याच्यावर किंवा तिच्यावर अपंगत्व किंवा विकलांगतेवर उपचार सुरू असतात. यात संबंधित तो किंवा ती हे अल्पवयीन किंवा बौद्धिक अक्षम किंवा इतर अक्षमता असल्याने अर्जही सादर करू शकत नसतील तर त्यांच्या वतीने त्यांचे कायदेशीर पालक असा अर्ज सादर करू शकतात. यातील दुसरी पायरी म्हणजे अपंगत्व प्रमाणपत्र जारी करणे, यात अर्ज आल्यानंतर संबंधित वैद्यकीय अधिकारी अर्जदार व्यक्ती खरोखर अक्षम, विकलांग असल्याची खात्री करून घेतल्यानंतर व संबंधित व्यक्ती ( समान संधी, संरक्षण अधिकार व पूर्ण सहभाग) कायदा १९५५ मध्ये केलेल्या अपंगत्वाच्या अटीत बसते आहे याची खातरजमा करून अपंगत्वाचे प्रमाणपत्र देतात. अर्ज दिल्यानंतर आठवडाभरात हे प्रमाणपत्र मिळू शकते पण या प्रमाणपत्रास महिन्यापेक्षा जास्त विलंब लागणे मान्यच केलेले नाही. वैद्यकीय अधिकारी पूर्ण तपासणीनंतर स्थायी अपंगत्वाचे प्रमाणपत्र देतात तेथे अपंगत्वाचे प्रमाण ठरवण्याचा प्रश्न नसतो. यात वैद्यकीय अधिकारी ही अपंगतता त्यांच्या मतानुसार बदलू शकण्याचा वैध कालावधी नमूद करतात. पण अर्थात त्या वैद्यकीय अधिकाऱ्यास तसे वाटत असेल तरच ही बाब नमूद केली जाते. जर एखादी व्यक्ती अपंगत्व किंवा विकलांगता प्रमाणपत्रास अपात्र ठरली तर संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्याला त्याचे स्पष्टीकरण अर्जदार स्त्री किंवा पुरूषास द्यावे लागते व नुसती कारणे सांगून चालत नाही तसे स्पष्टीकरण लेखी द्यावे लागते. अर्ज नाकारला गेल्यानंतर तिसऱ्या टप्प्यात निर्णयाचा फेरआढावा घेतात त्यात संबंधित प्रमाणपत्र नाकारणे किंवा त्यातील स्वरूप याबाबत आक्षेप घेत असेल तर अर्जदार पुन्हा वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे दाद मागू शकतो किंवा शकते जर अर्जदार अल्पवयीन किंवा काही दुर्धर आजार किंवा अक्षमतांनी ग्रस्त असेल तर त्याच्या वतीने कायदेशीर पालक दाद मागू शकतात.

***प्रत्येक समाजाने आजूबाजूच्या अक्षम, अपंग, विकलांग लोकांची काळजी घेतली पाहिजे त्यांच्या गरजा पूर्ण केल्या पाहिजेत त्यांच्या मानवी हक्कांचे पालन केले पाहिजे. त्यांना सन्मानाने जीवन जगण्याचा मार्ग उपलब्ध करून दिला पाहिजे. प्रत्येक देशात लोकांचे अपंगत्व किंवा विकलांगता-अक्षमता या वेगवेगळ्या तीव्रतेच्या पातळीनुसार हाताळल्या गेल्या पाहिजेत. देशातील किंवा समाजातील एखाद्या व्यक्तीची स्थिती दुसरीकडे कदाचित त्याच तीव्रतेने विचारात घेतली जाईल असे नसते कारण त्यात सांस्कृतिक व स्थानिक घटक गृहित धरलेले असतात.***

**मी अपंग (विशेष क्षमता व्यक्ती) किंवा विकलांग आहे हे कोण ठरवणार ?**

अपंगत्व (विशेष क्षमता) किंवा विकलांगता ठरवण्यासाठी जिल्हा पातळीवर वैद्यकीय मंडळे स्थापन केलेली असतात ती अपंगत्व किंवा विकलांगतेचे प्रमाणपत्र देतात. या मंडळात मुख्य वैद्यकीय अधिकारी, उपविभागीय वैद्यकीय अधिकारी असतात व इतर क्षेत्रातील तज्ञ असतात. जसे नेत्रशल्यविशारद, कान-नाक-घसा तज्ञ, श्रवणदोष तज्ञ, अस्थिरोगतज्ञ, वैद्यकीय पुनर्वसन तज्ञ, मानसरोगतज्ञ, समुपदेशक, विशेष मुलांचे शिक्षक यांचा त्या मंडळात समावेश असतो.

**आव्हाने**

प्रत्येक समाजाने आजूबाजूच्या अक्षम, अपंग, विकलांग लोकांची काळजी घेतली पाहिजे त्यांच्या गरजा पूर्ण केल्या पाहिजेत त्यांच्या मानवी हक्कांचे पालन केले पाहिजे. त्यांना सन्मानाने जीवन जगण्याचा मार्ग उपलब्ध करून दिला पाहिजे. प्रत्येक देशात लोकांचे अपंगत्व किंवा विकलांगता-अक्षमता या वेगवेगळ्या तीव्रतेच्या पातळीनुसार

***आता नवीन धोरणे तयार झाली आहेत. अपंगत्व असलेल्या व्यक्तींना सन्मानाने जगण्यास अनुकूल वातावरण त्यातून तयार होते आहे, त्यांच्या पूर्ण क्षमतांनिशी काम करण्याची त्यांना संधी मिळण्यास सुरूवात झाली आहे. हा लेख माहिती व प्रसारण खात्याच्या अंतर्गत असलेल्या योजना नियतकालिकात प्रसिद्ध होतो आहे हेच बदलाचे मोठे सुचिन्ह आहे. ज्योत तर पेटली आहे बदलासाठी मनेही प्रज्वलित होत आहेत. विशेष व्यक्ती म्हणजेच दिव्यांग (अपंग, विकलांग) व्यक्तींना दयेची गरज नसते फक्त सन्मानाची व आर्थिक पाठबळावर समाजात सन्मानाने उभे करण्याची गरज असते. अपंगत्व- विकलांगता ही मनाची एक स्थिती असते त्यावर मात करून अनेक अपंग व्यक्तींनी धडधाकट व्यक्तींच्या तोडीस तोड किंवा त्याहूनही सरस कामगिरी केल्याच्या यशकथा अनेक आहेत.***

हाताळल्या गेल्या पाहिजेत. देशातील किंवा समाजातील एखाद्या व्यक्तीची स्थिती दुसरीकडे कदाचित त्याच तीव्रतेने विचारात घेतली जाईल असे नसते कारण त्यात सांस्कृतिक व स्थानिक घटक गृहित धरलेले असतात. शहरातील शारीरिक अक्षमता किंवा विकलांगता या ग्रामीण भागातील त्याच अक्षमता व विकलांगतांच्या इतक्या तीव्रतेने विचारात घेतल्या जाणार नाहीत कारण शहरात साधने व आर्थिक क्षमता कदाचित जास्त असू शकतात, उपचारांच्या शक्यता असू शकतात. त्यामुळे अपंगत्वाची किंवा विकलांगतेची पातळी वेगळी ठरवली जाऊ शकते. अपंगत्व प्रमाणपत्रात एक मुद्दा किंवा गोष्ट टाळता येऊ शकते ती म्हणजे व्यक्तीगततेत हस्तक्षेप. अपंगत्व प्रमाणपत्र मिळाल्यानंतर अगदी किरकोळ सवलती मिळवताना ते द्यावे लागते त्यातील अपंगत्वाच्या कारणांचा उल्लेख कागदोपत्री सवलत देणाऱ्या कार्यालयांकडून केला जातो. आरोग्याशी संबंध नसलेल्या व्यावसायिकांपुढे हे प्रमाणपत्र जाते त्यात भारतीय रेल्वेचा तिकीट कारकून असतो किंवा इतरही कुणी सरकारी, खासगी खात्यातील लोक असतात . रेल्वेचा महिन्याचा पास किंवा तिकिटात सवलत देताना अपंग प्रमाणपत्राची प्रत द्यावी लागते त्यामुळे प्रत्येक टप्प्यावर तुमचे नेमके अपंगत्व, अक्षमता काय आहे याची नोंद लेखी केली जात असते. ती लोक पाहू शकतात त्यावर काही निर्बंध नाहीत, त्यामुळे ती माहिती गुप्त राहत नाही. त्यामुळे या अपंगत्वाचा डांगोरा पिटल्यासारखेच ते असते त्यामुळे संबंधित अपंग व्यक्तीला त्याचा तिटकारा येऊ शकतो. या प्रमाणपत्र प्रक्रियेत काही त्रुटी आहेत त्या दूर कराव्या लागतील.

- मानवी व्यक्तीगततेवर परिणाम
- वस्तुनिष्ठ तपासणीचा अभाव
- ४० टक्के अपंगत्वाच्या प्रमाणावर संदिग्धता
- प्रदीर्घ काळ चालणारी प्रक्रिया
- प्रमाणीकरणाचा अभाव
- दृष्टिकोनातील संकुचितता
- शिक्का बसणे
- समान संधी नाकारणे

**फायदे-** एका नाण्याला दोन बाजू असतात तसे यातही आहे पण प्रत्येक बाजूचे म्हणून काही मूल्य असते. अपंगत्व किंवा विकलांगता-अक्षमता प्रमाणपत्र काहींना नकोसेच वाटते पण तो काही नुसता कागदाचा तुकडा नसतो त्यावर तुम्ही शारीरिक अक्षम असल्याचा पुरावा नोंद असतो. त्यामुळे अनेक फायदे, सवलती, हक्क याला तुम्ही केंद्र व राज्य सरकारच्या कायद्यानुसार पात्र ठरता. आरक्षणास पात्र ठरता.

या सवलती खालीलप्रमाणे आहेत.

- खासगी व सरकारी क्षेत्रात काही सुविधा.
- रेल्वे भाड्यात ७५ टक्के सवलत
- विमान प्रवासात ५० टक्के सवलत
- वाहतूक भत्त्यात ५ टक्के सवलत
- प्राप्तीकरात ४० हजार रूपये सवलत
- सरकारी बँकांकडून मदत
- साठ वर्षे वयावरील व्यक्तींना आर्थिक मदत
- कमी उत्पन्न गटातील व्यक्तींना मदत
- ज्यात कमावती व्यक्ती गेली आहे अशा कुटुंबांना मदत.
- कुष्ठरूग्णांना मदत
- दिल्लीत राहणाऱ्या व्यक्तींना मदत
- सरकारी योजनांचे लाभ.

बदलाच्या क्रांतीपूर्वी- शेवटी आपल्या देशाने अपंग, विकलांग, मानसिक

विकलांग म्हणजेच दिव्यांग व विशेष व्यक्ती यांच्या समस्या गांभीर्याने घ्यायला सुरूवात केली आहे, त्यांचे समाजातील स्थान मान्य करण्यास सुरूवात केली आहे. अपंग-विकलांग व्यक्ती कायदा १९९५ मंजूर होऊन दोन दशके होऊन गेली आहेत. आता नवीन धोरणे तयार झाली आहेत. अपंगत्व असलेल्या व्यक्तींना सन्मानाने जगण्यास अनुकूल वातावरण त्यातून तयार होते आहे, त्यांच्या पूर्ण क्षमतांनिशी काम करण्याची त्यांना संधी मिळण्यास सुरूवात झाली आहे. हा लेख माहिती व प्रसारण खात्याच्या अंतर्गत असलेल्या योजना नियतकालिकात प्रसिद्ध होतो आहे हेच बदलाचे मोठे सुचिन्ह आहे. ज्योत तर पेटली आहे बदलासाठी मनेही प्रज्वलित होत आहेत. विशेष व्यक्ती म्हणजेच दिव्यांग ( अपंग, विकलांग ) व्यक्तींना दयेची गरज नसते फक्त सन्मानाची व आर्थिक पाठबळावर समाजात सन्मानाने उभे करण्याची गरज असते. अपंगत्व-विकलांगता ही मनाची एक स्थिती असते त्यावर मात करून अनेक अपंग व्यक्तींनी धडधाकट व्यक्तींच्या तोडीस तोड किंवा त्याहूनही सरस कामगिरी केल्याच्या यशकथा अनेक आहेत. अपंगत्व हा समाजाने निर्माण केलेला अडथळा असतो. तो समाजानेच आता दूर करायचा आहे, ते लोक अपंग नसतात मनाने त्यांची उमेद खचवून टाकू नका, त्यांना सन्मानाने जगण्याची प्रेरणा द्या. अपंग- दिव्यांग- विकलांग व्यक्तींना सर्वसमावेशक विकासात भागीदार करून घेणाऱ्या पहाटेचे तांबडे आता कुठे प्राचीवर अंधुकसे दिसते आहे. या लोकांना आता सर्व सोयी सुविधा उपलब्ध होतील त्यापासून ते वंचित राहणार नाहीत याची हमी बाळगा.

■■■

*लेखिका 'स्टॅंडर्ड अॅन्ड अॅश्युरन्स, रिसर्च अॅन्ड पब्लिकेशन्स स्किल कौन्सील फॉर पर्सन्स विथ डिसेबिलीटी' या संस्थेच्या प्रमुख आहेत.*
*email: archana.singh@scpwd.in*




विकास समर्पित
मासिक
**योजना**
नियमित वाचा,
वर्गणीदार व्हा.



# दिव्यांग-एक व्यावसायिक दखल

अरुणीमा डे



***दिव्यांगता ही एका अर्थाने एखाद्या व्यक्तीच्या वैयक्तिक आयुष्यात मर्यादा आणून एक वेगळ्या पद्धतीने आयुष्य जगण्यास प्रवृत्त करते. दिव्यांगता ही भौगोलिक आणि साथीच्या आजारांवर आधारित आहे, ज्यात आरोग्यविषयक मुद्यांचे निवारण केले जात नाही आणि मग ते फिक्के पडले जातात.***

समाजाच्या विकासाचा मापदंड ठरवणारा आरोग्य हा एक महत्त्वपूर्ण घटक आहे, तसेच समाजात दिव्यांग (Disability) ची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. दिव्यांगता ही एका अर्थाने एखाद्या व्यक्तीच्या वैयक्तिक आयुष्यात मर्यादा आणून एक वेगळ्या पद्धतीने आयुष्य जगण्यास प्रवृत्त करते. दिव्यांगता ही भौगोलिक आणि साथीच्या आजारांवर आधारित आहे, ज्यात आरोग्यविषयक मुद्यांचे निवारण केले जात नाही आणि मग ते फिक्के पडले जातात.

**दिव्यांगता/अपंगत्व- शब्दाच्या पलिकडे**

कमजोरी (इम्पेअरमेन्ट), शारिरीक अक्षमता (डिसएॅबिलीटी) आणि अपंगत्व (हॅंडीकॅप) या एकमेकांशी पूरक संज्ञा आहेत आणि प्रत्येकाचा विशिष्ट अर्थ आहे. जागतिक आरोग्यसंघटनेच्या मॅन्यूअलनूसार, 'इम्पेअरमेन्ट' म्हणजे शरीराची अविशिष्ट रचना आणि दृश्य स्वरूप याच्याशी संबधित आहे आणि तत्वत: इम्पेअरमेन्ट अवयव पातळीवरील अडथळ्यांचे प्रतिनिधित्व करते. याचप्रमाणे इम्पेअरमेन्टमुळे एखाद्याच्या प्रत्यक्ष कार्यक्षमतेवर होणारा परिणाम म्हणजे डिसएॅबिलीटी होय. दुसरीकडे इम्पेअरमेन्ट आणि डिसएॅबिलीटीमुळे एखाद्या व्यक्तिवर कार्यक्षमतेच्या बाबतीत होणारे दुष्परिणाम म्हणजे दिव्यांगता/अपंगत्व (हॅंडीकॅप) होय.

**समस्येचा प्रभाव**

भारतातील २००१ आणि २०११ जनगणनेनूसार स्त्री आणि पुरुष दोन्हींमध्ये असलेले दिव्यांगता/अपंगत्वाचे ग्रामीण आणि शहरी भागातील प्रमाण गेल्या दशकात वाढतच गेले आहे. तसेच शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात हे प्रमाण जास्त असल्याचे यातून दिसून येते. गेल्या दशकात स्त्री आणि पुरुष यांचे दिव्यांगता/अपंगत्वाचे प्रमाण वाढलेले दिसून येते. पुरुषांमध्ये याचे प्रमाण जास्त आहे आणि दशकीय प्रमाण हे पुरुषांपेक्षा महिलांमध्ये जास्त आहे.

**संस्कृती आणि अपंगत्व**

दिव्यांग/अपंगत्वाबाबतचा आणखी एक मुद्दा म्हणजे, आपण याकडे कसे पाहतो, कसे वर्णन करतो आणि त्याचे सादरीकरण कशा पद्धतीने करतो हा आहे. व्यक्ती कोणत्याही ठिकाणी जन्मला असेल दिव्यांग/अपंगत्व हे एक प्रमुख आव्हान आहे. भारतासारख्या विकसनशील देशातील आव्हान हे जरा अधिक ठळकपणे जाणवते एवढेच. यामध्ये

आव्हानाला सामोरे जाणाऱ्या आणि त्याची सेवा करणाऱ्या दोघांचीही सांस्कृतिक पार्श्वभूमी समजून घेणे आवश्यक आहे. दोघांचीही समान पार्श्वभूमी आणि सामाजिक घटनाक्रम सारखा असल्यास दोघांसाठी हे कार्य सुलभ होते (स्टोन २००५). आणखी म्हणजे, भाषा आणि समाजाकडे लोकांचा पाहण्याचा दृष्टीकोन, रुजलेला सामाजिक घटनाक्रम. याचा दोन्ही वैयक्तिक आणि सामाजिक दृष्टीकोनाच्या माध्यमातून प्रभाव पडत असतो.

म्हणून दिव्यांग/अपंगत्वाबाबतचा मुद्दा हाताळताना विशेष काळजी घ्यावी लागते. कारण, ते स्वत: आणि समाज याकडे कसा पाहतो याचा फार मोठा



परिणाम दिसून येतो. हावभाव, स्वभाव, अपंग व्यक्तींबद्दल मानहानीकारक भाषा आणि चुकीचा समज. म्हणून दिव्यांग/ अपंगत्वाबाबतचा कायदा (१९९५) च्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींना मोठेपण (ह्युमन डिग्निटी) आणि विशिष्ट प्रकारचे अपंगत्व असे शब्द वापरण्याची सक्ती केली आहे.

**व्यावसायिक हस्तक्षेपाची निकड**

संस्कृतीचे सखोल अध्ययन केल्यानंतर दिव्यांग, अपंगत्वाला नवीन अर्थ प्राप्त होतो. सेवा प्रदात्यांना सक्षम आणि अर्थपूर्ण पातळी गाठण्यास मदत होते. याव्यतिरिक्त, समाज विविध घटनांच्या माध्यमातून विविध लेबल देऊन टाकतो. परिणामी दिव्यांग, अपंगत्वाचा काळीमा हा कधीच दुर्लक्षिला जाऊ शकत नाही. एखाद्या व्यक्तीमध्ये शारिरीक दुर्बलतेमुळे नकारात्मक भावना निर्माण झाल्यास अख्ख्या कुटुंबावर त्याचा परिणाम होतो. त्यामुळे भावनिक दु:ख, वैफल्य यामुळे कुटुंबातील सदस्यांसोबतची नाती खराब होतात. जर, एखादे कुटुंब बराच काळ या अवस्थेत राहिले तर घरातील वातावरण पूर्णपणे नकारात्मक होते. त्या कुटुंबाचा किमान अपेक्षेमुळे आर्थिक आणि सामाजिक दर्जा खालावतो. पालकांची शैक्षणिक पार्श्वभूमी आणि त्यांचा गत अनुभव याचा अशी परिस्थिती हाताळण्यासाठी मोठा उपयोग होतो. कुटुंबाचा प्रतिसाद, मित्र, नातलग, शेजारी आणि इतरांकडून मिळणारा प्रतिसाद यातून सामाजिक वर्तन आकार घेते. म्हणून सामाजिक व्यवस्थेतून उदभवणाऱ्या विविध प्रसंगांना सामोरे जाण्यासाठी व्यावसायिक हस्तक्षेपाची निकड निर्माण होते. तसेच याकामी कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचीही भूमिका महत्त्वपूर्ण ठरते.

***दिव्यांग/अपंगत्वाबाबतचा मुद्दा हाताळताना विशेष काळजी घ्यावी लागते. कारण, ते स्वत: आणि समाज याकडे कसा पाहतो याचा फार मोठा परिणाम दिसून येतो. हावभाव, स्वभाव, अपंग व्यक्तींबद्दल मानहानीकारक भाषा आणि चुकीचा समज. म्हणून दिव्यांग/अपंगत्वाबाबतचा कायदा (१९९५) च्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींना मोठेपण (ह्युमन डिग्निटी) आणि विशिष्ट प्रकारचे अपंगत्व असे शब्द वापरण्याची सक्ती केली आहे.***

**दिव्यांग, अपंगत्व आणि काळजीप्रदाते : शक्यता आणि आव्हाने**

दिव्यांग, अपंग व्यक्तींशी समन्वय साधणे हे मुळात एक आव्हान आहे. यात काळजीप्रदात्यांचे आपल्याला दोन गटात वर्गीकरण करता येईल, एक म्हणजे मूलभूत किंवा अनौपचारिक काळजीप्रदाते, यात प्रामुख्याने कुटुंबातील सदस्य, मित्र यांचा समावेश होतो तर दुसरे म्हणजे दुय्यम काळजीप्रदाते, यात डॉक्टर्स, नर्स आणि इतर व्यावसायिक काळजीप्रदाते यांचा समावेश होतो. यात कळीचा मुद्दा आहे तो सांस्कृतिक मध्यस्थी ('culture brokering) प्रतिमान.

ही संकल्पना प्रामुख्याने आरोग्य क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्तींकडून वापरली जाते. आरोग्य सेवा कशापदधतीने कार्यरत आहेत याची रुग्णांना माहिती व्हावी, म्हणून ही संकल्पना वापरली जाते. अकार्यक्षमतेवर उपचार करणारे आरोग्यसेवकही सांस्कृतिक मध्यस्थीचे प्रतिमान वापरतात. सांस्कृतिक पैलू लक्षात घेऊन हे प्रतिमान वापरले जाते. उदाहरणार्थ, धार्मिक संलग्नता, शिक्षण, जनसंपर्क, व्यवसाय, उत्पन्न या घटकांवर लोकांची वृत्ती, दृष्टीकोन, एकूण रागरंग, आणि अक्षम व्यक्तीला समजून घेण्याची क्षमता यांचा यात समावेश आहे. काळजीप्रदात्याला विभागलेला समुदाय आणि मुख्य प्रवाहातील सेवा यामध्ये सेतू म्हणून कार्य करावे लागते.

'सांस्कृतिक मध्यस्थी' प्रतिमानानूसार, हस्तक्षेप धोरण हे विश्वास आणि जवळीक यावर मुख्यत्वे अवलंबून असते. सॉटनिक आणि जेझेवस्की यांनी स्पष्ट सांगितल्यानूसार सांस्कृतिक मध्यस्थी धोरणात प्रामुख्याने सल्ला, मध्यस्थता, नेटवर्किंग, वाटाघाटी, नवकल्पना, हस्तक्षेप आणि जागरुकता हे मुख्य घटक आहेत. काळजीप्रदात्याला तीन अवस्थांमधून स्थित्यंतर घडवून आणताना या घटकानुरुप कार्य करणे महत्वाचे आहे. तीन अवस्था म्हणजे, समस्या ओळख, धोरण मध्यस्थी आणि परिणाम मुल्यांकन होय. (सॉटनिक आणि जेझेवस्की २००५) म्हणून, सांस्कृतिक मध्यस्थी नेहमी जोखीम पत्करणारी, संदिग्ध भूमिकांना सामोरे जाणारी, सामाजिक व्यवस्थेवर विश्वास आणि आदर असणारी हवी. सांस्कृति मध्यस्थ म्हणून कार्य करणाऱ्यासाठी खालील निकष आहेत.

- परिवर्तनाचा उत्प्रेरक, मध्यस्थ म्हणून कार्य करावे
- अकार्यक्षमतेला सामोरे जाणाऱ्या व्यक्तीच्या कुटुंबाला सर्वप्रकारचा आधार द्यावा
- अकार्यक्षमतेला सामोरे जाणाऱ्या व्यक्तीसोबत व्यवहार करण्यासाठी कुटुंब आणि समुदायाला प्रेरित करावे
- अकार्यक्षमतेला सामोरे जाणाऱ्या व्यक्तीला आणि कुटुंबाला विविध अनैच्छिक प्रसंगी सहकार्य करावे
- आंतर-सांस्कृतिक संबंधांमध्ये संवादावेळी पारदर्शकता असावी
- दोन्ही बाजूंना आधार द्यावा
- कुटुंबाला मानसिक आधार द्यावा. समुपदेशन, शिक्षण, कार्यशाळा, परिसंवाद, खेळणी, अभ्यासिका, पुनर्वसन, साधन आणि उपकरणे, अल्प व दीर्घकालीन विश्रांतीची काळजी, सामाजिक मदत, माहिती, मार्गदर्शन, दळणवळण या मुद्यांवर कुटुंबासोबत चर्चा करावी.
- एक सांस्कृतिक सक्षम वातावरण सुविधा
- अपंग व्यक्ती सहभागी विकास समर्थन प्रदान करणे याशिवाय, व्यावसायिकरित्यासाठी समावेश म्हणजे, लवकर निदान, व्यक्तीच्या निकडीनूसार निरंतर आणि किचकट उपचार, नियमित मुल्यमापन, मानसिक पाठिंबा, पालकांच्या क्षमतेत वृद्धीसाठी प्रयत्नरत असणे या होय (युस्कल २०१०).दिव्यांग व्यक्तीला कुटुंबाचा सर्वप्रकारचा जीवनातील सर्व क्षेत्रात पाठिंबा असला पाहिजेत. ज्यात
- आरोग्याची काळजी, शिक्षण, सामाजिक लाभ आणि गृहनिर्माण या बाबींचा समावेश आहे
- विशिष्ट मदत आणि पुनर्वसन साधने
- सामाजिक पुनर्वसन आणि जे कार्य करत नाही अशांसाठी दैनंदिनी
- व्यावसायिक पुनर्वसन आणि प्रशिक्षण, रोजगार आणि उद्योगासाठी पाठिंबा
- समर्थन, वैयक्तिक मदत आणि कायदेशीर संरक्षण
- अर्थपूर्ण आणि सक्रीय विश्राम सेवा, सांस्कृतिक, क्रीडा आणि मनोरंजन घटकांमध्ये सहभाग तथापी, या क्षेत्राशी निगडित कार्य करणारे हे उत्कृष्ट नेटवर्क, समस्येचे प्रभावी निदान, शिकण्याची आवड आणि लवचिकता, सर्वात महत्वाचे म्हणजे सांस्कृतिक मध्यस्थाची चांगली भूमिका निभावता येणारे असले पाहिजेत.

**सारांश**

दिव्यांग व्यक्तींचे सबलीकरण करणे हा मुख्य उद्देश असला पाहिजे. त्यासाठी आपल्या समाजात कार्य करण्यासाठी भिन्न व्यवस्थापकीय कौशल्य आणि रणनिती आखता येणे गरजेचे आहे. सांस्कृतिक सक्षम प्रतिमान हे अधिक चांगले असल्याने त्याचा वापर करण्याची आवश्यकता आहे. आणखी या मुद्यावर कोणतीही व्यावसायिक पद्धत स्वीकारण्यात आली नाही. तथापी, परिस्थिती समजून घेणे आणि त्यानूसार वैयक्तिक निकड आणि परिस्थिती समजून घेणे महत्वाचे आहे.

■■■

*लेखिका कोलकता येथील विद्यासागर विद्यापीठातील समाजकार्य विभागात सहाय्यक प्राध्यापिका आहेत. त्यांनी देश-विदेशातील अनेक स्वयंसेवी संस्थामध्ये काम केले आहे.*

*email: arunimadey2002@gmail.com*

# शैक्षणिक धोरण आणि दिव्यांग

इंदुमती राव



***2011 च्या जनगणनेप्रमाणे देशातील सर्व अपंग व्यक्ती व प्राथमिक व माध्यमिक शाळांत शिकणाऱ्या विशेष अपंगत्व असलेल्या विद्यार्थ्यांच्या गरजा ओळखून त्यानुषंगाने सर्वसमावेशक असे शैक्षणिक धोरण राबवण्याच्या कामी भारताला अजून बराच लांबचा पल्ला गाठायचा आहे. कारण देशातील अपंगांच्या सद्यस्थितीबाबत सरकारी यंत्रणेकडे अपंगांच्या लोकसंख्येची व तत्संबंधी विविध बाबींची फारच थोडी माहिती जमा होऊ शकली आहे.***

भारतात २००१ ते २०११ या दहा वर्षांच्या काळात दिव्यांग व्यक्तींच्या लोकसंख्येत सुमारे २२.४ टक्क्यांनी वाढ झाली. २००१ मध्ये भारतात अपंग व्यक्तींची संख्या २.१९ कोटी होती. २०११ च्या जनगणना अहवालातील माहितीनुसार मधल्या दहा वर्षांत या लोकसंख्येत जवळजवळ ५० लाखाच्या आसपास वृध्दी झाली. २०११ मध्ये देशात सुमारे २.६८ कोटी अपंग व्यक्तीं असल्याची नोंद आहे. यामध्ये १.५ कोटी अपंग पुरूष तर १.१८ कोटी अपंग महिलांचा समावेश आहे. अपंग व्यक्तींच्या लोकसंख्येच्या वाढीचा दर हा शहरी भागात जास्त असून त्यातही अपंग महिलांची संख्या तुलनेने अधिक आहे. २०११ च्या जनगणनेनुसार दशकाभरात शहरी भागात ४८.२ टक्के अपंग व्यक्तींमध्ये महिलांची संख्या ५५ टक्के व अनुसूचित जातींतील अपंग व्यक्तींची संख्या २.४५ टक्के एवढी आहे.

**सद्यस्थिती**

भारतातील अपंग व्यक्तींच्या जीवनमानाचा विचार करता त्यांच्यासाठी दैनंदिन जीवनात आवश्यक अशा प्राथमिक सोयीसुविधांबाबत समाधानकारक सेवा नाहीत. २०११ च्या जनगणनेप्रमाणे देशातील सर्व अपंग व्यक्ती व प्राथमिक व माध्यमिक शाळांत शिकणाऱ्या विशेष अपंगत्व असलेल्या विद्यार्थ्यांच्या गरजा ओळखून त्यानुषंगाने सर्वसमावेशक असे शैक्षणिक धोरण राबवण्याच्या कामी भारताला अजून बराच लांबचा पल्ला गाठायचा आहे. कारण देशातील अपंगांच्या सद्यस्थितीबाबत सरकारी यंत्रणेकडे अपंगांच्या लोकसंख्येची व तत्संबंधी विविध बाबींची फारच थोडी माहिती जमा होऊ शकली आहे. जसे ०-६ या वयोगटात मोडणाऱ्या विशेष गरजा असलेल्या अपंग बालकांची सविस्तर सांख्यिकी व इतर माहिती उपलब्ध नसल्यामुळे संबंधित योजना तयार करूनही त्यांचे लाभ सर्व लाभार्थ्यांपर्यंत पोहचत नाहीत. यामुळे योजनांचे यश व त्यानुषंगाने देशातील अपंगांच्या शिक्षणमानातील सकारात्मक बदलांचे प्रमाण तुलनेने कमीच आढळते. उदाहरणादाखल -

१. सर्व शिक्षा अभियानांतर्गत सर्वसामावेशक शैक्षणिक योजनेचा लाभ मिळावा, यासाठी देशातील विशेष गरजा असलेल्या सुमारे १०.७१ लाख अपंग मुलांना या योजनेत सहभागी करण्यात आले. (स्त्रोत- जिल्हा अंतर्भूत शैक्षणिक माहिती प्रणाली २०१३-१४)

२. सर्व शिक्षा अभियानांतर्गत माध्यमिक शाळांतील सुमारे २ लाख विशेष अपंगत्व असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सर्वसमावेशक शिक्षण योजना राबवण्यात आली.

३. एका बिगर सरकारी संस्थेने दिलेल्या अहवालानुसार, देशातील विशेष अपंगत्व असलेले जवळजवळ एक लाख विद्यार्थी देशाच्या विविध भागातील एकूण ९७७ विशेष शाळांत प्रशिक्षण घेत आहेत.

२०११ च्या जनगणना अहवालानुसार देशातील ०-२९ या वयोगटातील विशेष अपंगत्व असलेल्या व ज्यांना शिक्षणाची आवश्यकता आहे, अशा व्यक्तींची संख्या १.२३ कोटी आहे. यामध्ये अपंग मुली व महिलांची संख्या सुमारे ५३.४ लाख एवढी आहे. तसेच पारंपारिक माहितीवरून मांडलेल्या अंदाजानुसार सध्या देशात २० लाख विशेष अपंगत्व असलेल्या व्यक्ती सर्वसामान्य मुलांच्या शाळेत व विशेष शाळांत प्राथमिक, माध्यमिक स्तरावर शिक्षण घेत आहेत.

देशापुढील महत्वाचे आव्हान शिक्षणाच्या संधींपासून वंचित राहिलेल्या सर्व अपंग व विशेष गरजा असलेल्या अपंग मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे हे आहे.

भारतीय संविधानातील नियमांनुसार देशात प्राथमिक शिक्षण सर्वांसाठी मोफत व सक्तीचे करण्यात आले आहे. तसेच २००५ या वर्षापासून देशस्तरावर सर्वशिक्षण अभियानासारख्या कार्यक्रमाची कायदेशीर अंमलबजावणी करण्याचे सरकारी नियम करण्यात आले आहेत. तसेच अपंग व्यक्तींना समान संधी, त्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांचा संपूर्ण सहभाग या उद्देशांच्या पूर्ततेसाठी सन १९९५ मध्ये भारत सरकारने अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ हा अपंगांसाठी सर्वसमावेशक कायदा संमत केला. असे असूनही शिक्षण व विकाससंधींच्या बाबत भारतातील अपंग व्यक्तींच्या एकूण लोकसंख्येच्या किमान २० टक्के मुलांनासुध्दा या शैक्षणिक योजनांचे व कायद्यांचे फायदे मिळत नाहीत, ही वास्तविकता आहे. भारताने नेहमीच अपंग व्यक्तींच्या हक्कासंबंधी विविध देशांशी अनेक करार करून सदर कार्यक्रमांना सक्रिय पाठिंबा दिलेला आहे. याशिवाय २००६ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी भरवलेल्या अपंग व्यक्तींचे मूलभूत हक्क या विषयावरील आंतरराष्ट्रीय अधिवेशनातील अनेक करारांवरही भारताने स्वाक्षरी केली आहे. या अधिवेशनात पारित झालेल्या कायद्यांतील कलम २४ नुसार या करारात सहभागी देशांनी सर्वसामान्य मुलांप्रमाणेच अपंग मुलांनाही समान शिक्षण अधिकार व सुविधा उपलब्ध करून देणे व सर्वसमावेशक शिक्षण प्रणालीचा विकास करून अपंग मुलांना शिक्षणच्या सर्व सोयी प्राप्त करून देण्यासंबंधी विशेष धोरण राबवणे अनिवार्य आहे. शिक्षणाच्या बाबतीत सर्व मुलांना एकसमान शिक्षणसंधी उपलब्ध करून देण्याबाबत आपला देश नेहमीच कटीबध्द आहे. असे असूनही देशातील अपंगांच्या शिक्षणाचा मार्ग आजही पूर्वीइतकाच खडतर आहे. या निराशाजनक परिस्थितीची अनेक कारणे सांगता येतील.

***२०११ च्या जनगणना अहवालानुसार देशातील ०-२९ या वयोगटातील विशेष अपंगत्व असलेल्या व ज्यांना शिक्षणाची आवश्यकता आहे, अशा व्यक्तींची संख्या १.२३ कोटी आहे. यामध्ये अपंग मुली व महिलांची संख्या सुमारे ५३.४ लाख एवढी आहे. तसेच पारंपारिक माहितीवरून मांडलेल्या अंदाजानुसार सध्या देशात २० लाख विशेष अपंगत्व असलेल्या व्यक्ती सर्वसामान्य मुलांच्या शाळेत व विशेष शाळांत प्राथमिक, माध्यमिक स्तरावर शिक्षण घेत आहेत.***

अपंग व शारिरिकदृष्ट्या विकलांग व्यक्ती, विशेषत: अपंग महिलांना शिक्षण उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट गाठतांना केवळ वचनबध्दता पुरेशी नाही. त्यासाठी अपंगांच्या गरजा ओळखून त्याप्रमाणे सोईसुविधा देण्याबरोबरच अपंगासाठी भेदाभेदाच्या अडथळ्यांपासून मुक्त असे सामाजिक व शैक्षणिक वातावरण आपल्या देशात तयार होणे आवश्यक आहे. यासाठी अपंगाना सर्वसमावेशक अशी शिक्षणसंधी या संकल्पनेवर आधारित योजनेचा आराखडा तयार करणे, योजनेचे ध्येय, दिशा, व कृती आराखडा ठरवण्याबरोबर आवश्यक संसाधनांचे वाटप, त्यासंबंधी आवश्यक कायदेशीर तरतूदी व नियम तयार करणे महत्वाचे ठरते.

गतकाळचा आढावा घेतल्यास एक बाब प्रमुख्याने लक्षात येते, ती म्हणजे, भारतातील पूर्वीची शिक्षण व्यवस्था अपंग व अपंगत्वामुळे विशेष गरजा असलेल्या व्यक्तींना सामावून घेण्याएवढी व्यापक नव्हती. अपंगांसाठी शिक्षणाची सोय करणे, अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न करणे त्यासाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आखणे  हे विचार ही मान्य होण्यासही बराच काळ जावा

लागला आहे. मात्र आज काळानुरूप घडत आलेल्या बदलांमुळे व सर्वांसाठी एकसामाईक हक्कांच्या वाढत्या सामाजिक जाणीवेतून अपंगांसाठी सर्वसामावेशक शिक्षण कार्यक्रम ही योजना देशाच्या संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचा एक अविभाज्य घटक बनत असल्याचे चित्र आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१५ भारतातील अपंग व विशेष गरजा असलेल्या व्यक्तींच्या शैक्षणिक दर्जा उंचावण्यात ठोस भूमिका बजावू शकेल काय, हा प्रश्न इथे महत्वाचा आहे.

देशातील शिक्षण व्यवस्थेबाबतची राजकिय इच्छाशक्ती व दूरदृष्टीला योग्य कृतीची जोड देण्याचा प्रयत्न म्हणजे सर्वसमावेशक शैक्षणिक धोरण. याद्वारे शिक्षणापासून वंचित राहिलेल्या समाजातील सर्व घटकांचा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात समावेश करून त्यांचा सर्वांगिण विकास साधण्याची निरंतर प्रक्रिया घडत असते. ही विकास प्रक्रिया समजून घेणे व या कार्यात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकिय व प्रशासकिय स्तरांतून येणाऱ्या विविध अडथळ्यांना बाजूला सारून पुढे पावले टाकणे, हे सर्वसमावेशक शिक्षण धोरणाचे मुख्य सूत्र आहे.

सर्वसमावेशक शिक्षण या संकल्पनेचे सविस्तर स्वरूप २०१५ च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात स्पष्ट करण्यात आले आहे. भारताच्या संदर्भात, सर्वसमावेशक शिक्षण या संकल्पनेत देशाच्या सर्व स्तरांतील मुलांचा जसे अनुसूचित जाती अनुसूचित जमाती, मागासवर्गीय जाती तसेच लहान व तरूण अशा अपंग व्यक्तींचा, व अतिशय गरिबीत व हलाखीच्या परिस्थितीत राहणाऱ्या बालकांचाही विचार होणे आवश्यक होते. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१५ च्या निमित्ताने पहिल्यांदाच राष्ट्रीय स्तरावरील धोरणात भारतीय समाजातील सर्व स्तरांतील सामाजांच्या आवश्यकतेचा विचार केला गेला असून भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वीकारलेल्या शिक्षणासंबंधीच्या अनेक करारांतील प्रमुख तरतूदींही या धोरणात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

---

***राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१५ च्या निमित्ताने पहिल्यांदाच राष्ट्रीय स्तरावरील धोरणात भारतीय समाजातील सर्व स्तरांतील सामाजांच्या आवश्यकतेचा विचार केला गेला असून भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वीकारलेल्या शिक्षणासंबंधीच्या अनेक करारांतील प्रमुख तरतूदींही या धोरणात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.***

---

देशातील अपंग व्यक्तींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर ठेवण्यास कारणीभूत असेलेले मुख्य घटक पुढील प्रमाणे आहेत.

१. आजवरच्या शिक्षण धोरणात देशातील सर्व अपंग व्यक्तींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची बाब दुर्लक्षितच राहिली होती.

२. सर्वांसाठी शिक्षण या राष्ट्रीय योजनेच्या प्रत्यक्ष यशाची पाहणी करतांना अपंगत्व असलेल्या विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहचले की नाही, या बाबत कोणतीच दखल घेतली जात नव्हती.

३. सर्वांसाठी शिक्षण या योजनांच्या नियोजन, प्रशासकिय अंमलबजावणी व पाहणी इ. स्तरांतील विविध अडथळे ओळखून ते दूर सारण्याचा विचार देशातील धोरणकर्त्यांनी अवलंबलेला नव्हता.

४. भारतीय समाजात अस्तित्वात असणारे भेदाभेदाच सामाजिक घटक अनुसूचित जाती, जमाती, स्त्रिया-पुरूष यांच्यातील सामाजिक अंतर अशा घटकांमुळे अपंगत्व असणा-या व्यक्तींपर्यंत सर्व शिक्षण योजनेचे लाभ पोहचू शकलेले नव्हते.

५. शिक्षणाला समवर्ती विषय म्हणून हाताळले जाते तर अपंग व्यक्ती व त्यांच्या पुर्नवसनाचा विषय हा राज्य तसेच पंचायत राज व्यवस्था त्यांच्या सोईनुसार हाताळतात. यात अपंग व्यक्तींना शिक्षण ही बाब पूर्णपण बाजूला राहते त्यामुळे भारतातील अनेक राज्यांत अपंग व्यक्तींना शिक्षणासाठीच्या संधी अजूनही पूर्णपणे व सहज उपलब्ध झालेल्या नाहीत.

६. अपंग व्यक्तींना शिक्षणाचा अधिकार मिळावा ही जबाबदारी भारत सरकारने दोन केंद्रिय मंत्रालयांना सोपवली आहे. यापैकी मनुष्यबळ विकास मंत्रालयाला सर्वसमावेशक शिक्षणाची जबाबदारी दिली गेली असून सामाजिक न्याय मंत्रालयावर विशेष मुलांच्या शिक्षण व कौशल्य विकास इ. बाबींची कामगिरी सोपवण्यात आली आहे. याच धर्तीवर राज्यस्तरावरही जबाबदारीचे वाटप दोन सरकारी विभागांत केलेले आहे. परंतु यामुळे यासंबंधित बाबतीत सुसूत्रता येण्याएवजी परस्परविरोधी कार्यक्रम व धोरणांचीच भर पडली आहे. तसेच अनेक धोरण राबतांना काही मुख्य गोष्टींकडे सर्रास दुर्लक्ष झालेले आहे. जसे, आजही आपल्या देशात अगजी लहान वयातील अपंग बालकांना योग्य प्रशिक्षण देण्याची सोय उपलब्ध नाही. अंगणवाडी शिक्षण केंद्राच्या माध्यमातून लहान वयातील अपंग बालकांना त्यांच्या गरजांनुसार शिक्षण देण्याची तरतूद अजूनही विचाराधीन आहे.

७. सर्वांसाठी शिक्षण ही योजना म्हणजे देशाच्या शिक्षण व्यवस्थेत नव्याने समाविष्ट झालेला एक घटक या संकुचित दृष्टीकोन बाळगल्यामुळे या योजनेतून शिक्षण क्षेत्रात अपेक्षित अशी क्रांती झाली नाही. देशातील संपूर्ण शिक्षण व्यवस्था सुधारण्याच्या दृष्टीने सर्वांसाठी शिक्षण ही योजना सुरूवातीच्या टप्प्यातील महत्वाची भूमिका बजावू शकते ही बाबही धोरणकर्त्यांनी व परिणामी सर्वांनीच म्हणावी तितकी गांभिर्याने घेतलेली नाही. त्यामुळे या योजनेचे यश मर्यादितच राहिले.

८. आपल्या देशातील सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीनुरूप अपंग मुली व महिलांसाठी पुनर्वसन धोरण राबवले जाणे आवश्यक आहे. योग्य माहिती अभावी तसेच इतर अनेक कारणांमुळे आजच्या आधुनिक काळात अपंग महिलांना सर्वाधिक कठिण परिस्थितीचा सामना करावा लागतो. भारतीय समाजाने एकूणच महिलांविषयीची नेहमीच दुटप्पी भूमिका स्वीकारली आहे. त्यात भर म्हणजे आजकाल दृकश्राव्य माध्यमांतून व फॅशन जगतातील महिलांचे चित्रण पाहून समाजाने एकूणच सर्व महिलांविषयी एकसारखे चुकीचे मत बनत राहते. अशा परिस्थितीत महिला त्यातही विशेषत: अपंग महिला व मुलींच्या गरजांबाबत योग्य सामाजिक भान तयार करणे अत्यंत आवश्यक बनले आहे.

**अपंग व्यक्तींच्या संदर्भात नियोजन व सेवा देतांना माहिती प्रणालीची उपलब्धता**

या मुद्द्यावर चर्चा सुरू करण्यापूर्वी आपणाकडे अपंग व्यक्तींच्या संदर्भात नियोजन करतांना व प्रत्यक्ष सेवा देतांना त्यांच्या बाबत अद्ययावत व पुरेशी माहिती उपलब्ध करून देऊ शकेल अशी यंत्रणा आहे का, हा प्रश्न उभा राहतो. याचे नेमके व स्पष्ट उत्तर मात्र नाही. असंच म्हणता येऊ शकेल की, आज आपल्याकडे अपंग व्यक्तींची माहिती मिळवण्यासीठी जनगणना अहवाल, काही बिगर सरकारी संस्थांच्या अभ्यासांचे अहवाल इ. ठराविकच स्त्रोत उपलब्ध आहेत.

ग) अपंगत्वाचे प्राबल्य-२०११

---

***अपंगांच्या एकूण लोकसंख्येपैकी सुमारे १८ दशलक्ष लोक ग्रामीण भागात वास्तव्य करतात तर केवळ ८.१ दशलक्ष लोक ग्रामीण भागात राहतात. अपंगांच्या एकूण संख्येपैकी १९ ते २९ वर्ष वयोगटातील ४१ लाख तरूण आहेत. यामध्ये फक्त दोन टक्के अपंग साक्षर आहेत तर फक्त एक टक्का अपंग रोजगार मिळवू शकतात. रोजगारासाठी आवश्यक ती कौशल्यं नसल्यानं एवढ्या प्रचंड लोकसंख्येला रोजगार मिळू शकत नाही. (स्त्रोत इंटरनॅशनल लेबर स्टडी २०११ -प्रादेशिक कार्यालय आशिया, बँकॉक)***

---

च्या जनगणना अहवालानुसार देशातील एकूण अपंग व्यक्तींपैकी ७५ लोक ग्रामीण भागात राहतात तर केवळ २५ टक्के लोक शहरी भागात राहतात. २.१३ टक्के अपंग लोकांत एकाच प्रकारचे अपंगत्व आहे. तसेच ग्रामीण भागात अपंगत्व असण्याचे प्रमाण शहरी भागाच्या तुलनेने अधिक (२.२१ टक्के) आहे हेच प्रमाण शहरी भागात केवळ १.९३ टक्के एवढे आहे. पुरूषांमध्ये अपंगत्वाचे प्राबल्य २.३७ टक्के असून महिलांमध्ये तेच १.८७ टक्के आहे.अनुसूचित जातींच्या लोकसंख्येत अपंगत्व आढळणाऱ्या लोकांचे प्रमाण इतर लोकसंख्येपेक्षा थोडे अधिक (२.२३ टक्के) आहे. तर अनुसूचित जमातींपैकी १.९२ टक्के लोकांत अपंगत्व आढळते जे तुलनेने फारच थोडे आहे.

२००१ मध्ये २१.९ दशलक्ष ते २०११ मध्ये २६.८ दशलक्ष म्हणजेच २.१३ टक्के ते २.२१ टक्के एवढी वाढ

आताच्या जनगणना अहवालातील सांख्यिकीनुसार गेल्या दहा वर्षांत विशिष्ट प्रकारचे अपंगत्व असणा-या व्यक्तींची संख्येत किरकोळ वाढ नोंदवण्यात आली. २००१ मध्ये २१.९ दशलक्ष होती ती २०११ मध्ये ही संख्या २६.८ दशलक्ष एवढी झाली. म्हणजे देशाच्या एकूण लोकसंख्येच्या २.२१ टक्के लोकसंख्या अपंग आहे. यापैकी अपंग पुरूषांची संख्या १४. ९ दशलक्ष (२.४१ टक्के) तर अपंग महिलांची संख्या ११.८ दशलक्ष(२.०१ टक्के) एवढी आहे. अपंगांच्या एकूण लोकसंख्येपैकी सुमारे १८ दशलक्ष लोक ग्रामीण भागात वास्तव्य करतात तर केवळ ८.१ दशलक्ष लोक ग्रामीण भागात राहतात. अपंगांच्या एकूण संख्येपैकी १९ ते २९ वर्ष वयोगटातील ४१ लाख तरूण आहेत. यामध्ये फक्त दोन टक्के अपंग साक्षर आहे तर फक्त एक टक्का अपंग रोजगार मिळवू शकतात. रोजगारासाठी आवश्यक ती कौशल्यं नसल्यानं एवढ्या प्रचंड लोकसंख्येला रोजगार मिळू शकत नाही. (स्त्रोत इंटरनॅशनल लेबर स्टडी २०११ -प्रादेशिक कार्यालय आशिया, बँकॉक)

जनगणनेसंबंधी आकडेवारी गोळा करणाऱ्या सर्वसामान्य सर्वेक्षकांना बरेचदा विशेष अपंग असलेल्या (विशेषत:

बौध्दिक पातळीवरील अपंगत्व जसे मतिमंदता, गतीमंदता इ.) व्यक्तींना ओळखणे शक्य नसते. असे असूनही सध्या अपंग व्यक्तींबाबत उपलब्ध असलेली माहितीत अपंगात्वासंबंधी विविध बाबींची सविस्तर माहिती उपलब्ध आहे. तरीही या आकडेवारीत अचूकता आणि माहितीत नेमकेपणा आणण्यासाठी आकडेवारी गोळा करण्याच्या सर्वेक्षण पध्दतीत काही बदल सुचवता येतील. अनेक सरकारी योजना आखतांना अपंग व्यक्तींबाबत सविस्तर माहिती जसे- अपंगत्वाची लक्षणे, कारणे, वैद्यकिय उपचारासंबंधी माहिती, वैशिष्टपूर्ण सवयी, विशेष गरजा, सामाजिक, शैक्षणिक व रोजगारसंबंधी स्थिती, विशेष कौशल्य इ. बाबत सविस्तर वर्णन आवश्यक असते. सर्वसामान्य सर्वेक्षण प्रश्नावलीतून अपंगांबाबत एवढ्या खोलात प्रश्न विचारून सविस्तर व नेमकी माहिती मिळवणे शक्य नसते. अपंग व विशेष गरजा असलेल्या व्यक्तींबाबत नाविन्यपूर्ण सर्वेक्षण पध्दतींचा अवलंबन करून सर्वसमावेशक माहितीचे अचूक संकलन व्हावे, जेणे करून समाजातल्या प्रत्येक अपंग व्यक्तींना त्यांच्यासाठी योजलेल्या योजनांचा लाभ मिळेल, अशी मागणी समाजात अपंगांसाठी काम करणाऱ्या विविध संस्थांमार्फत केली जात आहे. सरकारी पातळीवरही यादृष्टीने बदल सुचवण्यात आले आहेत.

भारतात ग्रामीण, स्थानिक विभाग, शालेय स्तरावर किंवा अगदी लहान वसाहतींमध्ये अपंग व्यक्तींची नोंदणी करण्याची यंत्रणा विकसित करणे आवश्यक आहे. याशिवाय नोंदणीप्रमाणे अपंगांना आधार कार्ड किंवा रेशन कार्डाप्रमाणे कायमचे ओळखपत्र वितरित करावे. किंवा डिजीटल तंत्रज्ञानाचा वापर करून अपंगांसाठी स्मार्ट कार्ड सारखे विविध सेवायोजनांसाठीचे एकच असे विशिष्ट ओळखपत्र उपलब्ध करावे असेही सुचवले जात आहे. या प्रकारची नोंदणी व ओळखपत्र सेवा भारतात विविध समुदायांच्या पुनर्वसन कार्यक्रमात (community based rehabilitation programme) पाळली जाते. गावांतील अपंग लोकांची ठरवून दिलेल्या पध्दतीनुसार नोंदणी करण्यामुळे या योजनेतील विविध प्रकारच्या पुनर्वसन सेवा देणे सोपे झाले आहे.

**अपंग व्यक्तींना सर्वसमावेशक शिक्षण पध्दतीत समाविष्ट करून घेण्यात अडथळा ठरलेल्या इतर काही बाबी :**

१. न्यूनगंड व आत्मविश्वासाचा अभावामुळे अपंगत्व असलेली मुले स्वत:ला शिक्षण व्यवस्थेपासून आपणहूनच दूर ठेवतात.

२. बरेचदा अशा मुलांना शिक्षण घेण्याबाबत पुरेसे कौटुंबिक प्रोत्साहन व पाठबळ मिळत नाही.

३. सर्वसामान्य शिक्षकांना अपंग व्यक्तींना योग्य प्रकारे शिक्षण देता येईल यासाठी आवश्यक प्रशिक्षणाची सोय उपलब्ध नसणे. अपंग मुलांच्या गरजा लक्षात घेऊन योग्य अभ्यासक्रम विकसित करू शकणारे व प्रशिक्षित शिक्षकांची फळी तयार करण्यासाठी नेतृत्वगुण, विचारक्षमता तसेच योग्य माहिती, ज्ञान व कौशल्य असणाऱ्या अनुभवी व प्रयोगशील शिक्षकांची कमतरता.

४. शिक्षणाचा सर्वसामान्य दर्जा.

५. पालक, शिक्षक, प्रशासक, व धोरणकर्त्यांना अपंग व्यक्तीसंबंधित नेमकी कोणती भूमिका घ्यावी याचे योग्य भान, तौलानिक अद्ययावत माहिती व ज्ञान इ. नसणे.

६. प्रशासन, धोरण, नियोजन, निधी, अंमलबजावणी व आढावा या पध्दतशीर टप्प्यांतून शिक्षण यंत्रणेची प्रभावी कार्यप्रणाली असणाऱ्या यंत्रणेचा अभाव. ग्रामीण भागातील मुलांपर्यंत सेवा व योजना पोहचवण्यासाठी लागणारी मनुष्यबळ व इच्छाशक्तीचा अभाव

७. संबंधित योजनांमध्ये जनसहभागाचा अभाव.

८. जबाबदारी समर्थपणे पूर्ण करणाऱ्या व कार्याच्या परिणामांची वरचेवर फेरपडताळणीची सोय नसणे.

यावरून असे म्हणता येईल की, देशातील अपंग व अपंगत्वामुळे विशेष गरजा असलेल्या व्यक्तींना शिक्षणासारख्या मूलभूत हक्काची योग्य सोय सर्वसमावेशक शिक्षण योजनेच्या माध्यमातून करून देता आली असती. परंतु, एकूणच सर्व योजनांच्या अंमलबजावणीत राजकिय नेतृत्व व प्रशासकिय यंत्रणेतील समन्वयाच्या कमतरतेमुळे हे साध्य होऊ शकलेले नाही.

**अपंगांबाबतची सामाजिक विषमता दूर करण्यासाठीचा प्रयत्नात राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१५ ची भूमिका**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१५ मध्ये समस्येच्या मुळापासून आजतागायतच्या परिस्थितीचा आढावा घेऊन उपाय योजण्यावर भर देण्यात आला आहे. यामध्ये चर्चा, वादविवाद, लोकसहभागातून संबंधित बाबींवर प्रतिसाद मागवणे इ. पध्दतीं अवलंबल्या आहेत. किंबहुना असेही म्हणता येईल की, सर्वांच्या सहभागातून, विविध स्तरांतून मिळवलेल्या जनप्रतिसादातून हे धोरण बनवण्यात आले आहे. धोरणकर्त्यांनी विविध समूदायांच्या गरजा व वास्तविकता या दोनही बाबींना धोरणात पुरेशा प्रमाणात समाविष्ट करायचे होते. सर्वसमावेशकतेवर आधारित

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१५ मध्ये शिक्षणाला सर्वसमावेशक करण्याचा प्रयत्न असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. सर्वांसाठी एकसामाईक हक्कांच्या वाढत्या सामाजिक जाणीवेतून अपंगांसाठी सर्वसामावेशक शिक्षणाचा वेगळा कार्यक्रम न करता ही योजना देशाच्या संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचा एक अविभाज्य घटक कशी बनवता येईल यावर भर देण्यात आला आहे. अपंगांना प्राथमिक शिक्षणासह उच्च शिक्षणाच्या संधीही विनासायास उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट या धोरणात निश्चित करण्यात आले आहे.

मागवलेल्या प्रतिसादातून अपंगांसाठी सर्वसमावेशक निरंतर शिक्षणाच्या संधी देतांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, ई-लर्निंग सारख्या नव्या डिजीटल तंत्राचा फायदा उपलब्ध करून देण्याचे तसेच विविध स्तरांवर अपंगांसाठी काम करणाऱ्या बिगर सरकारी संस्थांच्या मदतीने शिक्षकांसाठी व्यापक प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्याचे सुचवण्यात आले आहे. याशिवाय ग्रामीण व शहरी भागात एकसमान शिक्षणसंधी देताना देशाच्या मागास भागातील प्रत्येक अपंग व्यक्तीपर्यंत पोहचण्याचे प्रामाणिक प्रयत्न



त्याबरोबरच शिक्षकांना सर्व विद्यार्थ्यांच्या आकलनक्षमतेनुसार शिक्षण व तत्सम कौशल्य शिकवण्याबाबत प्रशिक्षित करण्याची गरज देखील नव्या शिक्षण धोरणात अधोरेखित करण्यात आली आहे. याबरोबरच शिक्षण प्रशासनानेही विशेष गरजा असलेल्या अपंग विद्यार्थ्यांबाबत सकारात्मक दृष्टीकोन ठेवण्याची गरज असल्याचेही धोरणात नमूद करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने काही महत्वाचे बदल करण्याच्या उपायांचाही नव्या धोरणात समावेश करण्यात आला आहे.

धोरण आखण्यापूर्वी विविध स्तरांतून सतत पाठपुरावा घेत राहून करण्यात यावे, अशी सूचनाही सर्व स्तरांतून करण्यात आली आहे.

थोडक्यात राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१५ मध्ये शालेय प्रवेश व त्यासंबंधीत नियमांपासून ते शालांतर्गत विविध उपक्रम व शिक्षणविषयक सर्व अनिवार्य गोष्टींबाबत जसे अभ्यासक्रमाची आखणी, शिकवणीच्या पध्दती, साहित्य, त्यासंबंधीत शिक्षकांसाठी वरचेवर प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन, अपंगांसह सर्वांसाठीच ई-लर्निंगच्या माध्यमातून स्वयंअध्ययनाची सुविधा, राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमातील सर्व उपक्रम, तसेच या सर्व बाबींचे वेळोवेळी योग्य मूल्यमापन व त्यानुसार बदल करण्याची समांतर प्रणाली अशा सर्व गोष्टींचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१५ मध्ये केवळ अपंगांसाठी शिक्षणाची सुविधा असा मर्यादित विचार न ठेवता सर्वासाठी शिक्षण संधी उपलब्ध करून देण्याचा व्यापक विचार स्वीकारण्यात आला आहे. अपंग मुलांना त्यांच्या अपंगत्वापलिकडे जाऊन नवी ओळख मिळवून देण्याच्या प्रयत्नात सर्वसामान्य विद्यार्थ्यांप्रमाणे सर्व तऱ्हेच्या शैक्षणिक संधीचा लाभ मिळवून देण्यावर भर दिला आहे व यासाठी आवश्यक स्पष्ट उद्दिष्टे आखण्यात आली आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याला कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सुरक्षित व विकासाला पूरक अशा वातावरणात शिक्षण घेण्याची नवी संधी नव्या पिढीतील सर्व विद्यार्थ्यांना मिळू शकेल, असा आशावाद या नव्या धोरणाच्या निमित्ताने निर्माण झाला आहे. या धोरणाचा सांगोपांग आढावा घेतांना असे लक्षात येते, की या धोरणाची अंमलबजावणी देशाच्या तळागाळातील व दुर्गम भागापर्यंत केल्यास संपूर्ण शिक्षण व्यवस्थेत अमूलाग्र बदल घडून येणे शक्य होईल. तेव्हा आपण सर्वांनीच सर्वसमावेशक अशा सर्वांसाठी शिक्षणाच्या या नूतन प्रयत्नाला यशस्वी व सक्रिय ठेवण्यात हातभार लावूया.

■■■

*लेखिका केंद्रिय मानवसंसाधन विकास मंत्रालयाच्या राष्ट्रीय शैक्षणिक सल्लागार मंडळाच्या सामुदायिक पुनर्वसन प्रादेशिक सल्लागार, सदस्या आहेत.*

*email: ideasianetwork2013@gmail.com*

# दिव्यांगासाठी रोजगार आणि कौशल्य विकासाच्या संधी

शांती राघवन



***दिव्यांग असूनही मंजुनाथ, स्टॅनली, तबस्सुम, प्रदीप, गौसिया, राजीव, प्रशांत हे सारे 'चेंज इन इंडिया'चे घटक आहेत. कौशल्य प्राप्त करून आणि रोजगारक्षम होऊन ते इतरांसारखेच काम करतात, कर भरतात, आपल्या कुटुंबाची काळजी घेतात आणि सर्वसाधारण समाजाचे घटक बनून राहतात. भारत कशामुळे महान आहे तर दारिद्र्य, अपंगत्व आणि पक्षपातासारख्या आव्हानांवर मात करण्याच्या अशा नागरिकांच्या क्षमतांमुळे, याची आठवण ते आपल्याला करुन देतात.***

मंजुनाथ हा एका लहान कंपनीत सुपरवायझर असून त्याच्याकडे यंत्राच्या सुट्या भागांवर काम करणारा १५ कामगारांचा एक संच आहे. दर्जा राखणे अत्यंत महत्वाचे असून ग्राहकाने एखादे उत्पादन नाकारल्यास धंद्याचे नुकसान स्पष्ट आहे. पंतप्रधान मोदी यांचा 'मेक इन इंडिया' हा कार्यक्रम दर्जेदार उत्पादन निर्माण करणाऱ्या मंजुनाथसारख्या लोकांवर आधारित आहे. मंजुनाथची दृष्टी अधु आहे आणि त्याच्या हाताखालील कामगारांत विविध विकलांगतेने ग्रासलेल्या लोकांचा समावेश आहे.

स्टॅनले हा स्वयं रोजगार करणारा असून तो फिनाईलचा व्यवसाय करतो. सेरेब्रल पाल्सी या आजाराने तो त्रस्त आहे. तबस्सुम ऑफशोअर सपोर्ट सेंटरमध्ये काम करते आणि इंग्लंडमधील सातासमुद्रापार ग्राहकांवर सातत्याने नजर ठेवण्यासाठी ती आपल्यासमोरील मॉनिटरला डोळे खिळवून बसलेली असते. शारिरीक अपंगत्व असलेली ती व्यक्ती आहे. प्रदीप एका मॉलमध्ये कामावर आहे. बौद्धिक दृष्ट्या कमी समज असलेला, दृष्टी अधु झालेला आणि थोडा बहिरा असाही तो आहे. राजीव हा एका बहुराष्ट्रीय बँकेत विश्लेषक असून तो बहिरा आहे. दिव्यांग व्यक्तिंबाबत आखलेल्या सकारात्मक कृती धोरणाचा परिणाम म्हणून प्रशांतला पंचायत विकास अधिकारी म्हणून नोकरी मिळाली आहे. तो दृष्टीहीन आहे. प्रथम त्याला त्याच्या दृष्टीहीनतेमुळे काम दिले गेले नव्हते, परंतु विशिष्ट प्रशिक्षणानंतर त्याला कानडीत टाईप करण्याचे काम दिले गेले व उच्चारांविषयक सॉफ्टवेअरमुळे त्याला आपल्या विकलांगतेमुळे समोर उभ्या ठाकलेल्या आव्हानांवर मात करता आली. त्याला सहकारी कर्मचारी व ग्रामस्थांचा आदरही मिळवता आला.

गौसियाला तिच्या आत्यंतिक विकलांगतेमुळे तिच्या आईलाच स्नान घालून भरवावेही लागे. परंतु आज गौसिया एका बहुराष्ट्रीय कंपनीत प्रकल्प समन्वयक म्हणून मिळणाऱ्या पगारातून आईलाही सांभाळते. तिने ऑनलाईन खरेदी केलेल्या वॉशिंग मशिनची तिच्या आईला प्रचंड मदत होते. गौसिया आपले सर्व काम उच्चार ओळखण्याच्या (स्पीच रिकग्निशन) सॉफ्टवेअरसारख्या वर्कप्लेस सोल्युशन्सच्या मदतीने ऑनलाईनच करते ज्यामुळे तिला केवळ आपल्या उच्चारांच्या आधारे फोन डायल करता येतो, इंटरनेट वापरता येते आणि इतर सॉफ्टवेअर साधनांचा उपयोग करता येतो.

दिव्यांग असूनही मंजुनाथ, स्टॅनली, तबस्सुम, प्रदीप, गौसिया, राजीव, प्रशांत

हे सारे 'चेंज इन इंडिया'चे घटक आहेत. कौशल्य प्राप्त करून आणि रोजगारक्षम होऊन ते इतरांसारखेच काम करतात, कर भरतात, आपल्या कुटुंबाची काळजी घेतात आणि सर्वसाधारण समाजाचे घटक बनून राहतात. भारत कशामुळे महान आहे तर दारिद्र्य, अपंगत्व आणि पक्षपातासारख्या आव्हानांवर मात करण्याच्या अशा नागरिकांच्या क्षमतांमुळे, याची आठवण ते आपल्याला करुन देतात.

**विद्यमान रोजगार आणि कौशल्य स्थिती**

गेल्या दहा वर्षांत विकलांग व्यक्तींना मिळत असलेल्या खासगी क्षेत्रातील रोजगारांच्या संधीमध्ये नाट्यपूर्ण वाढ झाली असून विशेषत: प्रमुख महानगरांमध्ये कंपन्यांनी विकलांगता असलेल्या व्यक्तीना नोकरीवर ठेवण्यातील व्यावसायिक मूल्य ओळखल्यामुळे हे घडले आहे. उत्पादकता आणि दर्जा याबाबत कंपन्यांना भेडसावणारी चिंता उमेदवारांना रोजगारक्षम बनवण्यासाठी दिलेल्या कौशल्य प्रशिक्षणामुळे दूर झाली. उत्तम रोजगारक्षम कर्मचारी कंपन्यांना पुरवल्यामुळे निर्माण झालेल्या विश्वासाची फळेही मिळाली आहेत. जागतिक मंदी शिखरावर असताना म्हणजे २००८ आणि २०१४ मध्ये कंपन्यांनी विकलांगांची भरती केली. ज्यावरून तुम्ही जर चांगले उत्पादन तयार केले तर त्याला नेहमीच बाजारपेठ असते, हेच पुन्हा सिद्ध झाले. गेल्या पाच वर्षांत अत्यंत वेगाने वाढणाऱ्या कंपन्यांना मनुष्यबळाची मोठी उणीव भासू लागली असून मनुष्यबळाचा कायमस्वरुपी सातत्यपूर्ण पुरवठा म्हणून आता विकलांगता असलेल्या व्यक्तींकडे पाहण्यास सुरूवात झाली आहे. अपंगत्वावर खास काम करणाऱ्या एनजीओज, मुख्य प्रवाहातील प्रशिक्षण संस्था आणि सामाजिक व्यावसायिक संस्था आता दिव्यांग असलेल्या अधिकाधिक व्यक्तींना कौशल्य प्रदान करून त्यांना द्विस्तरीय आणि जिल्ह्यांमध्येही रोजगार मिळवण्यास सक्षम बनवत आहेत.

विकलांग असलेल्या व्यक्तींना कंपनीत घेऊन त्यांना यशस्वीपणे सामावून घेण्याचे कौशल्य सुपरवायझरना दिल्यामुळे नोकरी देणे शक्य झाले आहे. विशिष्ट कार्यक्षेत्र अथवा कामाच्या प्रशिक्षणासाठी कंपन्यांशी सहयोग केल्यामुळे अधिक दर्जेदार कर्मचारी व त्यामुळे चांगल्या नोकऱ्या देणेही शक्य झाले आहे. कंपन्यांना आपल्या

***जागतिक मंदी शिखरावर असताना म्हणजे २००८ आणि २०१४ मध्ये कंपन्यांनी विकलांगांची भरती केली. ज्यावरून तुम्ही जर चांगले उत्पादन तयार केले तर त्याला नेहमीच बाजारपेठ असते, हेच पुन्हा सिद्ध झाले. गेल्या पाच वर्षांत अत्यंत वेगाने वाढणाऱ्या कंपन्यांना मनुष्यबळाची मोठी उणीव भासू लागली असून मनुष्यबळाचा कायमस्वरूपी सातत्यपूर्ण पुरवठा म्हणून आता विकलांगता असलेल्या व्यक्तींकडे पाहण्यास सुरूवात झाली आहे.***

भविष्यातील मनुष्यबळासाठी योग्य उमेदवार मिळवण्याच्या दृष्टीने हा मार्ग तयार करण्यात आल्याने कंपन्यांसाठी तर सर्व बाजूंनी फायदाच, अशी परिस्थितीच तयार झाली आहे.

यशस्वी ठरलेल्या कौशल्य प्रदान करण्याच्या मॉडेल्समध्ये प्रायोगिक शिक्षणाचा मोठा भाग आहे. कौशल्य प्रशिक्षणात जेव्हा ॲटिट्यूड आणि जीवन कौशल्य विकासाचा भाग समाविष्ट असतो तेव्हा कंपन्यांना आपले कर्मचारी राखता येणे जास्त शक्य झाले आहे. कौशल्य विकास कार्यक्रमात जेव्हा पालक विकासावर जास्त भर दिला जातो तेव्हा ते मॉडेल दीर्घकालीन मुदतीत अधिक शाश्वत असल्याचे सिद्ध झाले आहे. आपला पाल्य जीवन व नोकरीच्या कठोर वास्तवाला सामोरा जाऊ शकणार नाही, असे पालकांना वाटत असते. त्यामुळे आर्थिक गरजा असतानाही ते दूरचा प्रवास, पाळ्यांमध्ये अथवा टार्गेटला समोर ठेवून काम करणे अशा दुरान्वयानेही तणावपूर्ण वाटणाऱ्या कामांपासून आपल्या विकलांग मुलामुलींचे संरक्षण करतात.

बौद्धिक समज अत्यंत कमी असलेल्या म्हणजे ज्यांचा आयक्यू ६५ च्याही खाली आहे, अशा व्यक्तींसाठी बरोबरीच्या सहकाऱ्यांकडून देण्यात आलेले प्रशिक्षण जास्त यशस्वी सिद्ध झाले आहे. पारंपरिक प्रशिक्षणाच्या मॉडेलपेक्षा ही प्रशिक्षण पद्धती चांगला पर्याय म्हणून पाहिली पाहिजे. मानसिक-सामाजिक विकलांग व्यक्तीला प्रशिक्षण व नोकरी देताना समुपदेशक व मानसोपचार तज्ज्ञ यांची पूरक सेवा उपलब्ध आवश्यक आहे.

बांधकाम, हॉटेल व्यवसाय, आयटी, आयटीईएस, तयार कपडे, आणि बँकिंग या वाढत्या क्षेत्रांमध्ये मूलत: प्रशिक्षण देण्यात आले आहे. सौंदर्य प्रसाधन आणि आरोग्य, मोबाईल दुरूस्ती आणि भौगोलिक विशिष्ट क्षेत्रांमध्ये स्वयंरोजगार कौशल्य प्रशिक्षण यशस्वी झाले आहे.

**भविष्यातील स्थिती**

पंतप्रधानांनी सुरू केलेल्या राष्ट्रीय कौशल्य धोरणात येत्या सात वर्षात ३८ लाख विकलांग व्यक्तींना प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयात स्थापन करण्यात आलेल्या विकलांग व्यक्ती सक्षमीकरण

विभागामुळे विकलांगांसाठी राष्ट्रीय कृती योजना व 'ॲक्सेसिबल इंडिया कँपेन' द्वारे विकलांगांसाठी पर्यावरण तयार करण्यावर भर देण्यास मदत झाली आहे. कौशल्य धोरण पुढे नेण्यासाठी विकलांगांसाठी कौशल्य मंडळ स्थापन केले आहे. त्यामुळे भारतात विकलांगांनी कामगारवर्गाचा घटक बनावे, यासाठी अगदी उत्तम स्थिती आहे. विविध प्रकारच्या विकलांगता असलेल्यांसाठी विशेषत्वाने तीव्र स्वरुपाच्या मानसिक व शारिरीक अपंगत्व असलेल्यांवर विशेष भर देऊन तसेच सर्वत्र सर्व प्रकारच्या रोजगारांना समान महत्व देऊन प्रशिक्षणाच्या यशस्वी मॉडेल्सचा फायदा घेण्याची गरज आहे.

त्याचबरोबर ६०० हून अधिक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थांसारख्या दर्जेदार पायाभूत सुविधांचा फायदा करून घेण्याची गरज आहे ज्यांचा स्वयंरोजगार प्रशिक्षणासाठी उपयोग करता येईल. विविध स्वयंरोजगार संधींसाठी विशेष अभ्यासक्रम तयार करण्याची गरज आहे. स्वत: विकलांग असलेल्या पात्र प्रशिक्षकांची तातडीने गरज असून ते विकलांगांसाठी रोल मॉडेल म्हणून काम करतील व त्यांना प्रशिक्षण देतील.

गेल्या दहा वर्षांत २६ क्षेत्रांत २७३ हून अधिक प्रकारचे रोजगार विविध प्रकारच्या विकलांगांसाठी खुले करण्यात आले असून त्यांना परिणामकारकरित्या काम करण्यासाठी उपाययोजना व पर्यावरण निश्चित करण्यात आले आहे. तीव्र स्वरूपाच्या विकलांगता असलेल्यांसाठी उपाययोजना शोधून आणखी नोकऱ्या खुल्या करण्याची गरज आहे. जास्तीत जास्त अपंगांना सामावून घेण्यासाठी नेतृत्व विकसित करण्यासाठी योजनाबद्ध प्रयत्न झाले पाहिजेत.

विकलांगांना रोजगार देण्यासाठी कामाचे विश्लेषण, कामाच्या ठिकाणाच्या अडचणी दूर करण्यासाठी उपाययोजना, समावेशक सेवा, जागृती आणि जाणीव निर्माण करणे, नेतृत्व विकसित करणे व आणखीही अनेक सेवा पुरवण्यासाठी समग्र समर्थन देणारी व्यवस्था तयार करावी लागेल. कौशल्य प्रदान करण्याचा उपाय यशस्वी होण्यासाठी हे अत्यंत महत्वाचे आहे. विकलांगांना मुख्य उपजीविकेच्या क्षेत्रात आणण्यासाठी काम करणाऱ्या संस्थांमध्ये सहकार्य वाढवण्यासाठी 'इनॅबल ॲकॅडमी' हे व्यासपीठ तयार करण्यात आले आहे.

***गेल्या दहा वर्षांत २६ क्षेत्रांत २७३ हून अधिक प्रकारचे रोजगार विविध प्रकारच्या विकलांगांसाठी खुले करण्यात आले असून त्यांना परिणामकारकरित्या काम करण्यासाठी उपाययोजना व पर्यावरण निश्चित करण्यात आले आहे. तीव्र स्वरूपाच्या विकलांगता असलेल्यांसाठी उपाययोजना शोधून आणखी नोकऱ्या खुल्या करण्याची गरज आहे. जास्तीत जास्त अपंगांना सामावून घेण्यासाठी नेतृत्व विकसित करण्यासाठी योजनाबद्ध प्रयत्न झाले पाहिजेत.***

हे असे व्यासपीठ आहे ज्याचा उपयोग सर्व भागधारक करून साधनसंपत्तीची देवाणघेवाण करू शकतात तसेच सहकारी प्रयत्नांच्या सामर्थ्याला मुक्तपणे वाव दिला जाईल, अशा मोहीमा सुरू करु शकतात तसेच अत्यंत आवश्यक असलेले समग्र समर्थन पुरवतात. नम्मावाणी हे अशाच प्रकारचे ध्वनीला प्रतिसाद देणारे व सुसंवाद साधणारी व्यवस्था असून त्यात मिसकॉल दिल्याने सहज उपलब्ध होऊ शकते आणि ग्रामीण कर्नाटकातील अनेक अपंगांना व्हर्च्युअल नेटवर्किंगची सेवा पुरवते. कोणत्याही प्रकारची विकलांगता असलेल्या व्यक्ती त्यात आपल्या कहाण्या, समस्या सांगू शकतात तसेच एकमेकांचे प्रश्न सोडवू शकतात, जाणीव व आशा प्राप्त करू शकतात, रोजच्या आव्हानांना सामोरे जाऊ शकतात आणि आर्थिक दृष्ट्या स्वायत्त होतात. तंत्रज्ञानावर आधारित अशी ही व्यासपीठे खेळाचे नियमच बदलून टाकणारे ठरतील आणि विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या प्रशिक्षणासाठी उज्वल भविष्याची खात्री करतील.

'मेक इन इंडिया' तेव्हाच यशस्वी होईल जेव्हा चेंज इन इंडिया असेल जे समाजाच्या सर्व घटकांसाठी समावेशक असेल. यशस्वीपणे काम करणाऱ्या विकलांग व्यक्ती या बदलाच्या अग्रदूत असतील. अशोक फेलोशिप मिळवलेल्या शांती राघवन या इनॅबल इंडियाच्या संस्थापक व व्यवस्थापकीय विश्वस्त आहेत. विकलांग व्यक्तींना उपजीविका देण्याची चौकट बनवण्याची प्रणेता अशी 'इनॅबल इंडिया' संस्था असून गेल्या १६ वर्षांपासून खासगी नोकरी, स्वयंरोजगार आणि सकारात्मक रोजगाराचे मॉडेल्स तयार करत आहे. नाविन्यपूर्ण संशोधनाद्वारे अनेक शारिरीक, जाणीवेचे तसेच बौद्धिक विकलांग व्यक्तींचा प्रत्यक्ष काम करणाऱ्या वर्गात समावेश करण्यात इनॅबल इंडियाने प्रणेता म्हणून काम केले आहे.

■■■

*लेखिका 'एनेबल इंडिया'या संस्थेच्या संस्थापक आणि व्यवस्थापकिय विश्वस्त आहेत. दिव्यांग व्यक्तिंना रोजगारक्षम बनवण्याचे काम ही संस्था करते.*
*email: shanti@enable-india.org*

# दिव्यांग व्यक्तींसाठी वाहतूक साधनांची उपलब्धता

डॉ. देवर्षी चौरसिया,



***संयुक्त राष्ट्रांच्या जाहीरनाम्यानुसार दिव्यांग व्यक्तींना सोयीसुविधा मिळण्याचा अधिकार आहे व त्या कराराला भारतानेही मान्यता दिलेली आहे. त्या जाहीरनाम्यातील कलम नऊ अन्वये सरकारने दिव्यांग व्यक्तींना माहिती, वाहतूक, आजूबाजूची स्थिती, संदेशवहन तंत्रज्ञान व सेवांची उपलब्धता तसेच आपत्कालीन सेवांची उपलब्धता या क्षेत्रात सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.***

दिव्यांग किंवा शारीरिक अक्षमता असलेल्या व्यक्तींसाठी सर्व सुविधांची उपलब्धता ही महत्वाची आहे, या सेवा सुविधा नसतील व त्यात दिव्यांग व्यक्तींना स्थान नसेल तर ती सर्वांना समान संधी आहे असे म्हणता येत नाही ( संयुक्त राष्ट्रे २००७). संयुक्त राष्ट्रांच्या जाहीरनाम्यानुसार दिव्यांग व्यक्तींना सोयीसुविधा मिळण्याचा अधिकार आहे व त्या कराराला भारतानेही मान्यता दिलेली आहे. त्या जाहीरनाम्यातील कलम नऊ अन्वये सरकारने दिव्यांग व्यक्तींना माहिती, वाहतूक ,आजूबाजूची स्थिती, संदेशवहन तंत्रज्ञान व सेवांची उपलब्धता तसेच आपत्कालीन सेवांची उपलब्धता या क्षेत्रात सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

दिव्यांग किंवा शारीरिक अक्षम व्यक्तींसाठी समान संधीसाठी सर्व सुविधा इतरांप्रमाणेच मिळणे आवश्यक असते. त्यांना स्वतंत्रपणे जीवन जगता आले पाहिजे व जीवनातील सर्व गोष्टीत सहभागी होता आले पाहिजे व समाजानेही त्यांना सामावून घेतले पाहिजे.'पर्सनस् विथ डिसॅबिलिटी( समान संधी,अधिकारांचे संरक्षण व पूर्ण सहभाग) कायदा १९९५' अन्वये ते अपेक्षित आहे. या कायद्याच्या कलम ४४, ४५, ४६ अन्वये वाहतूक, रस्त्यावरून चालणे, आजूबाजूची स्थिती यात दिव्यांग व्यक्तींना सुरक्षित व समान संधी असली पाहिजे.

**भारतातील स्थिती**

भारतीय शहरातील अनेक लोक त्यांच्या गन्तव्य ठिकाणी पोहोचण्याकरिता सार्वजनिक वाहतुकीवर अवलंबून आहेत. रोजच्या रोज त्यांना ही धावपळ करावी लागत असते. अनेक लोक नोकरीसाठी, शिक्षणासाठी व इतर कारणांसाठी सार्वजनिक वाहतुकीचा वापर करून आवश्यक त्या ठिकाणी जातात.व्यक्तीगत वाहने कमी, लांबीची अंतरे, महागडे इंधन, धोकादायक रस्ते यामुळे बस व रेल्वे सेवा पसंत केली जाते. समाजातील स्थानिक अर्थव्यवस्थेत या सुविधांचा मोठा वाटा आहे.मोठ्या प्रमाणावर पैसा सार्वजनिक वाहतुकीच्या पायाभूत सुविधांवर खर्च केला जातो. शहरात अशा सुविधांची मागणी जास्त असते तरीही दिव्यांग व्यक्तींना या सेवांचा लाभ घेताना वेगळ्या सुविधा नसल्याने पदरी निराशाच येते कारण त्यांच्यासाठी अनुकूल स्थिती सार्वजनिक वाहतूक सेवा व इतरत्र नसते. वयस्क लोक, मुले, गर्भवती महिला व दिव्यांग व्यक्ती यांना अशा सेवा सुविधा वापरताना अनेक अडचणी येतात. लोक

रस्त्याने व्यवस्थित चालू शकत नाहीत. बस थांबे, पायऱ्या, संदेशपट्या, वाहनांची रचना यात अनुकूलता नाही.

भारतीय शहरात मोठ्या प्रमाणात प्रवासी आहेत पण पायाभूत सुविधा व सेवा विशिष्ट किंवा अंगाने धडधाकट लोकांसाठी आहेत पण दिव्यांग व्यक्तींसाठी वेगळ्या सोयी नाहीत.वृद्ध, मुले, गर्भवती महिला व दिव्यांग व्यक्ती यांची संख्या वाढू शकते. जागरूकता वाढवणे,दिव्यांग व्यक्तींसाठी सेवा व सुविधा निर्माण करून त्यांना मदतीसाठी समाजाला प्रेरित करणे आवश्यक आहे. बदलत्या जगात प्रगत तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे, जागरूकता वाढत आहे. सामाजिक समतेची मूल्ये पुढे येत आहेत त्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत दिव्यांग व उपरोल्लेखित वृद्ध, गर्भवती महिला व मुले यांना सुविधा देणे आवश्यक आहे.

**समस्येतील आव्हाने**

सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा सुयोग्य व सोयीस्कर वापर करण्याची संधी दिव्यांग व्यक्तींसह इतर उपरोल्लेखित व्यक्तींच्या मिळावी यासाठी आवश्यक सुविधा निर्माण करणे हे आव्हान आहे. सार्वजनिक ठिकाणे, वाहतूक, वाहने यात दिव्यांग व्यक्तींसाठी सुविधा नसतात पण राष्ट्रीय स्तरावर जवाहरलाल नेहरू नागरी नूतनीकरण योजनेत बीआरटीएस (बस रॅपिड ट्रान्सिट सिस्टीम) सारखे प्रस्ताव पुढे आले त्यातून सक्षम वाहतूक व्यवस्थेचा एक मार्ग मिळाला. या योजनेत दिव्यांग व्यक्तींच्या समस्यांची दखल घेतली गेली आहे पण अजूनही पुरेशी जागरूकता व संवेदनशीलता त्यांच्या बाबतची मानके व सुविधा राबवताना दिसत नाही. या सुविधा व सेवांची निगा व दुरूस्ती यात कमतरता आहे. अनेक ठिकाणी दिव्यांग व्यक्तींसाठी सुविधा असतात पण त्यांचा वापर केला जात नाही. किंबहुना त्या सुविधा त्यांना सहज वापरता येतील अशा नसतात. तेथे अतिक्रमणे असतात त्यामुळे ते लोक त्यापर्यंत पोहोचू शकत नाहीत. अनेक ठिकाणी बाह्य स्थिती म्हणजे रस्ते, पदपथ यात या लोकांसाठी सुविधा असणे आवश्यक असते. निवासी भागांमध्येही अशा लोकांसाठी स्वतंत्र मार्गिका असावी लागते. ठिकठिकाणी पाट्या लावलेल्या असाव्या लागतात त्यात इलेक्ट्रॉनिक साईनबोर्डचा समावेश असतो त्यातून वापरकर्त्यांना त्यांच्यासाठी असलेल्या सोयींची माहिती समजते. भारतासारख्या देशात पायाभूत सुविधा या लोकाभिमूख नसतात असा अनुभव आहे त्या तशा करणे आवश्यक आहे. तसे केले नाही तर आपण दिव्यांग व्यक्तींच्या जगण्यात सुलभता आणत नाही असा अर्थ होतो. सार्वजनिक सुविधा दिव्यांग व्यक्तींनी वापरू नयेत असेच यात सूचित केले जाते. सध्या आपण ज्या सुविधा दिलेल्या आहेत त्यांचा वापर दिव्यांग व्यक्ती सहजतेने करू शकत नाहीत त्यांना आत्मविश्वासाने त्या वापरता आलेल्या नाहीत किंबहुना त्या त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत. धडधाकट लोकांपेक्षा दिव्यांग व्यक्तींना जास्त सुविधा देणे गरजेचे असते.

भारत सरकारने आता देशव्यापी सुगम्य भारत अभियान सुरू केले आहे त्यात दिव्यांग, वृद्ध व मुले व गर्भवती स्त्रिया या सगळ्यांना सुविधा उपलब्ध करून त्याबाबत जनजागृती केली जात आहे.

**मार्गदर्शक तत्वे व प्रमाणन**

दिव्यांग व शारीरिक अक्षम व्यक्तींसाठी सुविधा कशा असल्या पाहिजेत याची मार्गदर्शक तत्वे व मानके अनेक देशात आहेत. आपल्याकडे राष्ट्रीय मानके नसल्याने इतर देशातील तत्वांची शिफारस केली आहे. सीपीडब्ल्यूडी यांनी केलेल्या शिफारशीनुसार दिव्यांग व वृद्ध व्यक्तींसाठी सुविधांची मार्गदर्शक तत्वे सुधारली पाहिजेत. त्याची सविस्तर माहिती दिली पाहिजे. ती कशी वापरतात हे सांगितले पाहिजे. त्यासाठी सर्व पातळ्यांवर प्रयत्न केले पाहिजेत, अनेक संस्था (सरकारी, निम्न सरकारी व स्वयंसेवी संस्था) या क्षेत्रात काम करीत आहेत. कार्य शाळा, चर्चासत्रे यांच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. त्यात सामान्य लोकांना तर माहिती देणे आवश्यक आहे पण सरकारी अधिकाऱ्यांनाही अशा व्यक्तींसाठी असलेल्या सुविधांची माहिती व नियम ज्ञात असले पाहिजेत. शहर विकासात सहभागी विभागांना या सुविधांची माहिती असली पाहिजे व त्यांनी त्या निर्माण करण्यावरही भर दिला पाहिजे. शैक्षणिक व संशोधन संस्था मुलांना लहानपणापासून या व्यक्तींना मदत करण्याबाबत संवेदनशील बनवू शकतात. समाजातील दिव्यांग, वृद्ध, गर्भवती महिला व लहान मुले यांना सार्वजनिक सुविधा वापरताना येणाऱ्या अडचणी किंवा तशा सुविधांचा अभावच असणे याची माहिती संशोधन प्रकल्पात गोळा केली जाऊ शकते. त्यांचा उपयोग पायाभूत सुविधांच्या बदलात होऊ शकतो.

**सध्याच्या व नवीन विकास गरजा**

समाजातील सर्व घटकांना वाहतुकीसाठी बहुपर्यायी सेवा दिल्या पाहिजेत. जेएनएनयूआरएम योजनेत सरकार वाहतूक प्रकल्पांसाठी निधी पुरवत आहे. दिव्यांग व्यक्तींसाठी बस थांबे, मेट्रो स्थानके, बीआरटी या व्यवस्था असल्या पाहिजेत व त्यांची रचना वापर

योग्य असला पाहिजे. प्रवासात पूर्ण साखळी सुविधा पुरवल्या गेल्या पाहिजेत. दृष्टीहीनांना किंवा व्हीलचेअरवरून येणाऱ्यांना एकात्मिक सुविधा मिळणे गरजेचे आहे त्यांना सगळीकडे सहज फिरता आले पाहिजे. पदपथापासून ते बीआरटी व इतर वाहतूक व्यवस्था, बसथांबे ते मेट्रो थांबे यात त्यांना सुविधा गरजेच्या आहेत. जे लोक बसचा वापर करतात ते पहिल्यांदा पदपथावरून चालत असतात. त्यामुळे पदपथ अतिक्रमण मुक्त असावेत. आजूबाजूची स्थिती किंवा सुविधा सहज उपलब्ध नसतील तर या लोकांना मदत मिळणार नाही. रॅम्प व रेलिंगचा वापर कुठे करावा याचा विचार केला पाहिजे. सुविधांपर्यंत पोहोचता न येणे हाच मोठा अडथळा होतो. समाजातील दिव्यांग व्यक्तींना सहभागी करून घेण्यासाठी या सुविधा गरजेच्या आहेत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर सोपा करणे हे महत्वाचे आहे, पदपथ सुरक्षित, सोपे व सुसह्य असले पाहिजेत. (ग्रिफीन २०००). सार्वजनिक माहिती सुविधा, स्वच्छतागृहे, पदपथ, रस्ता ओलांडण्याचे सिग्नल, रॅम्पस, रेलिंग, टॅक्टाइल पेव्हिंग यांना निगा व दुरूस्तीच्या धोरणाची जोड गरजेची आहे. ते चांगल्या अवस्थेत व सहज वापरता येतील असे असले पाहिजेत.

**सुगम्य भारत अभियानातील (जनजागृती व प्रशिक्षण) पुढची वाटचाल-**

सुगम्य भारत अभियान ही देशव्यापी मोहीम आहे त्यात समाज, शाळा, महाविद्यालये, व्यावसायिक ठिकाणे, अधिकारी, शहरी नियोजन संस्था, राजकारणी व नोकरशहा यांच्यात जनजागृती आवश्यक आहे. रोजच्या दैनंदिन गरजा किंवा जीवनचक्राशी या गोष्टी निगडित असल्या पाहिजेत. उत्तम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, ट्राम-बसेस-विमाने व जहाजे असे अनेक वाहतूक प्रकार आहेत त्यात या व्यक्तींसाठी सुविधा गरजेच्या आहेत. यात प्रशिक्षणाचा भाग महत्वाचा आहे. कौशल्य असलेले चालक, वाहक, ट्रान्सिट ऑपरेटर्स, सुविधा, सुरक्षा कर्मचारी यांनी दिव्यांग, वृद्ध, गर्भवती महिला व मुले यांची काळजी घेतली पाहिजे. संबंधित कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण नसेल तर त्यांना त्याचे महत्व समजणार नाही. दिव्यांग व्यक्तींना त्यांच्याकडून वाईट वागणूक मिळू शकते ते टाळले पाहिजे.

***सुगम्य भारत अभियान ही देशव्यापी मोहीम आहे त्यात समाज, शाळा, महाविद्यालये, व्यावसायिक ठिकाणे, अधिकारी, शहरी नियोजन संस्था, राजकारणी व नोकरशहा यांच्यात जनजागृती आवश्यक आहे. रोजच्या दैनंदिन गरजा किंवा जीवनचक्राशी या गोष्टी निगडित असल्या पाहिजेत. उत्तम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, ट्राम-बसेस-विमाने व जहाजे असे अनेक वाहतूक प्रकार आहेत त्यात या व्यक्तींसाठी सुविधा गरजेच्या आहेत.***

माहिती व तंत्रज्ञानाचा वापर व हरित तंत्रज्ञानाची संकल्पना ही वाहन रचना व इंधन यात महत्वाची आहे. त्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बळकट, सुरक्षित, सहज उपलब्ध होते, महत्वाचे संदेश दिव्यांग व्यक्तींना लगेच मिळाले पाहिजेत म्हणजे त्यांची गैरसोय टळू शकते. एलिझाबेथ बार्टन व लिनी मिशेल यांनी 'इनक्लुझिव्ह अर्बन डिझाईन स्ट्रीट ऑफ लाईफ' हे पुस्तक २००६ मध्ये लिहिले त्यात असे म्हटले आहे की, लोक शारीरिक अक्षम असण्यास त्यांच्या आजूबाजूची सुविधांचा अभाव असलेली परिस्थिती कारणीभूत असते. आपण जर नवीन शहरे स्मार्ट करणार असून तर त्यात सुविधांची सहज उपलब्धता, सुरक्षितता व सर्वसमावेशकता यांचा समावेश असला पाहिजे. त्यात आर्थिक, शारीरिक, लैंगिक तसेच वयपरत्वे भेदभाव असता कामा नये.

■■■

*लेखक डॉ. देवर्षी चौरसिया हे स्कूल ऑफ प्लानिंग अँड आर्किटेक्टर भोपाळ या संस्थेत प्राध्यापक आहेत,कृषी विषयातील पदवीनंतर त्यांनी मौलाना आझाद नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी संस्थेतून शहर नियोजन व वास्तूरचना या विषयात पदव्युत्तर पदवी घेतली. राजीव गांधी प्राद्योगिकी विश्वविद्यालयातून यांनी पीएचडी केली आहे..*
*email dchaurasia@spabhopal.ac.in*



# अपंग व्यक्तींचा सुलभ वावर आणि त्यांचे हित

## सुविधा

शिवानी गुप्ता



***सर्व ठिकाणच्या वाढलेल्या सुलभ वावरामुळे व्यक्तीचे इतरांवरचे अवलंबित्व पर्यायाने अपंगत्व कमी होते. समाजात प्रत्येक ठिकाणी प्रत्येक वेळी सुलभतेने पोचता येणे हा प्रत्येकाचा स्वाभाविक हक्क आहे. वृद्धांसारख्या समाजातल्या विशिष्ट गटाबरोबरच अपंगत्वामुळे हालचालींवर मर्यादा आलेल्या व्यक्तींनाही हा हक्क मिळायला हवा.***

कोणत्याही प्रकारचे अपंगत्व असलेल्या व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी प्रत्येक ठिकाणी त्यांना सुलभ वावर उपलब्ध करुन देणे, ही पूर्व अट असते. जी पूर्ण केल्यावर अपंग व्यक्तींना स्वतंत्रपणे जीवन जगणे आणि समाजातल्या विविध घडामोडींमधे सुरक्षितपणे आणि आरामात भाग घेणे सोपे जाते. अपंगत्व आणि सुलभ वावर किंवा पोहोच या गोष्टी एकमेकांशी व्यस्त प्रमाणात असलेल्या दिसून येतात. सर्व ठिकाणच्या वाढलेल्या सुलभ वावरामुळे व्यक्तीचे इतरांवरचे अवलंबित्व पर्यायाने अपंगत्व कमी होते. समाजात प्रत्येक ठिकाणी प्रत्येक वेळी सुलभतेने पोचता येणे हा प्रत्येकाचा स्वाभाविक हक्क आहे. वृद्धांसारख्या समाजातल्या विशिष्ट गटाबरोबरच अपंगत्वामुळे हालचालींवर मर्यादा आलेल्या व्यक्तींनाही हा हक्क मिळायला हवा.

अपंग व्यक्तींच्या रोजच्या जगण्यात त्यांना स्वतंत्रपणे सर्वत्र संचार करता यावा, या गरजेमधे त्यांच्या सुलभ वावरासाठी विशिष्ट सोयी उपलब्ध करुन देण्याची कल्पना लपली आहे. अशा व्यक्तींना विना अडथळ्यांचं वातावरण उपलब्ध करुन देण्याच्या गरजेतून ही कल्पना पुढे आली आणि मग कालांतराने ती जागतिक योजनेच्या स्वरुपात विकसित झाली. जागतिक योजना किंवा आराखडा तयार करताना ही प्रक्रिया सर्वसमावेशक असावी. त्यातून योग्य फायदे मिळावे तसेच लिंग, वयोगट आणि विविध सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक पार्श्वभूमीतून येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी त्यातून अचूक लाभ मिळावा ही अपेक्षा ठेवण्यात आली आहे. जागतिक आराखडा तयार करताना, अपंगत्व असलेल्या व्यक्तींसाठी खास, वेगळ्या प्रकारचा आकृतिबंध बनवण्याऐवजी सर्व प्रकारच्या लोकांना वापरता येईल, असाच आकृतिबंध तयार करणे असा मूलभूत फरक करण्यात आला आहे. त्यामध्ये विशिष्ट प्रकारचा किंवा अतिरिक्त सोयी असणारा आकृतिबंध तयार केल्याशिवाय, प्रत्येक इमारत, तंत्रज्ञान, उत्पादन तसेच धोरणे सुद्धा ती वापरणाऱ्या प्रत्येकाला वापरता यायलाच हवीत आणि ती ही स्वतंत्रपणे, सुरक्षितपणे आणि निर्धास्तपणे अशी पूर्वकल्पना ठेवण्यात आली आहे. अशा प्रकारच्या आराखड्यामुळे अपंग व्यक्तींच्या सुलभ वावरासाठी ज्या सोयी बनवाव्या लागतात त्याचा खर्च प्रत्येकामधे विभागला जातो. त्यामुळे आर्थिक स्तरावर देखिल सर्वांना परवडेल अशा किंमतीत प्रत्येकाला

वापरता येईल, असा आकृतिबंध तयार करणे सोयीस्कर आहे.

जागतिक स्तरावर, संयुक्त राष्ट्रांच्या 'अपंगत्व असलेल्या व्यक्तींना समान संधी' उपलब्ध करुन देण्यासाठीचा नियम हा पाचव्या भागात, पर्यावरणीय सुलभ वावरासाठी स्वतंत्रपणे नमूना घालून देणारा आहे. अपंगत्व असलेल्या व्यक्तींच्या हक्कांच्या विषयावर नुकत्याच झालेल्या परिषदेमधे सुलभ वावराचा मुद्दा, सर्वसामान्य, मूलभूत तत्व आणि विशिष्ट नियम म्हणून संबोधित केला गेला. विशिष्ट नियम म्हणून नियम क्रमांक ९ सुलभ हलचालीसाठीचा हा नियम, २१ क्रमांकाच्या 'माहितीची उपलब्धता आणि मत व अभिव्यक्ती स्वातंत्र', सुलभ हालचालीसाठीच्या गरजा व्यवस्थित समजून घेण्याबाबतचा नियम क्रमांक २० 'व्यक्तिगत गतिशीलता' या सर्व नियमांचा एकत्रितपणे विचार व्हायला हवा. परिषदेतला चर्चिला गेलेला नियम क्रमांक ४ 'सर्वसामान्य कर्तव्ये' हा राज्य सरकारांना, त्यांच्या अपंग नागरिकांना सर्वत्र पोहोचणे सोपे व्हावे, यासाठीच्या मार्गदर्शक सूचना देतो आणि सुलभ वावराच्या 'प्रगतिशील परिपूर्णतेची' कल्पना समोर मांडतो.

जागतिक पातळीवर २०१३ ते २०२२ हे दशक आशियाई आणि पॅसिफिक प्रदेशात अपंगांसाठी काम करण्यावर केंद्रित करण्यात आले असून, त्यातल्या लक्ष्य क्रमांक ३ नुसार शारीरिक पर्यावरण, सार्वजनिक परिवहन, ज्ञान माहिती आणि दळणवळण यांच्या सार्वत्रिक सुलभ उपलब्धतेवर जोर देण्यात येत आहे. भारताने देखिल हा कार्यक्रम स्विकारला असून, हे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी 'सुगम भारत मोहीम' सुरु करण्यात आली आहे.




**'सुगम भारत मोहिम'**

सर्व क्षेत्रात अपंग व्यक्तींच्या सुलभ वावरासाठी भारत सरकारने 'सुगम भारत मोहीम' या देशव्यापी कार्यक्रमाची सुरुवात केली आहे. या मोहीमेमुळे काही अपंगत्व असलेल्या व्यक्तींना सर्व क्षेत्रांत समान संधी उपलब्ध होतील, त्यांना स्वतंत्रपणे जगणे आणि समाजात राहून जीवनाच्या विविध घटनांमधे सहभाग घेणे शक्य होणार आहे. अपंगत्व असलेल्या व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठीचा केंद्र सरकारचा विभाग, केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने ही मोहीम चालवण्यात येत आहे. आपल्या आजूबाजूच्या वास्तू, वाहतूक व्यवस्था तसंच माहिती आणि दळणवळणासाठीचे व्यवहार सर्वांनाच सुलभपणे करता यावेत यासाठी या मोहिमेला प्रोत्साहन देण्यात आले आहे. सुगम भारत मोहिम यशस्वीपणे राबविण्यासाठी काही योजनाबद्ध पावले उचलायचे सरकारने ठरविले आहे. उदाहरणार्थ :

अ) मोहीमेच्या यशस्वितेसाठी उत्तम नेतृत्व

ब) या कामाच्या प्रसारासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती

क) कार्यशाळांद्वारे मोहिमेत काम करण्यासाठी कार्यकर्त्यांची क्षमता वाढविणे

ड) कायद्यांची चौकट, त्यासंबंधी उद्भवणारे इतर प्रश्न, तंत्रज्ञानविषयक माहिती, अडचणी आणि त्यांचे उपाय, आवश्यक साधन संपत्तीचे उत्पादन, इत्यादी.

इ) सार्वजनिक - खाजगी भागीदारीद्वारे खाजगी व्यावसायिकांचा मोहिमेतील सहभाग वाढविणे

केंद्र सरकारच्या अपंगत्व असलेल्या व्यक्तींच्या सक्षमीकरण विभागाने या मोहीमेच्या अंमलबजावणीला पाठिंबा देण्यासाठी, विविध राज्य सरकारांशी समजुतीचा करारनामा केला आहे. इंचिऑन योजनेच्या (२०१३-२०२२) तिसऱ्या लक्ष्याला अनुसरुनच सुगम भारत योजनेच्या निर्देशक आणि लक्ष्यांची आखणी केलेली आहे.

भारतीय इतिहासात पहिल्यांदाच अपंग व्यक्तींच्या सुलभ सार्वजनिक वावराच्या मुद्यावर आवश्यक तितका भर दिला जात आहे आणि म्हणूनच संपूर्ण देशाने खुल्या दिलाने, मनापासून या मोहिमेचे स्वागत केले आहे. सुलभ भारत मोहिमेकडे आणखी सुलभ भविष्याची सुरुवात म्हणून पहाता येऊ शकेल, असे मला वाटते. ही योजना आणि मोहीम

*भारतीय इतिहासात पहिल्यांदाच अपंग व्यक्तींच्या सुलभ सार्वजनिक वावराच्या मुद्यावर आवश्यक तितका भर दिला जात आहे आणि म्हणूनच संपूर्ण देशाने खुल्या दिलाने, मनापासून या मोहिमेचे स्वागत केले आहे. सुलभ भारत मोहिमेकडे आणखी सुलभ भविष्याची सुरुवात म्हणून पहाता येऊ शकेल, असे मला वाटते. ही योजना आणि मोहीम यांमधे चांगली गोष्ट अशी आहे कि, त्यामुळे देशात सुलभ वावराबाबत मोठ्या प्रमाणावर जागृती होईल.*

यांमधे चांगली गोष्ट अशी आहे कि, त्यामुळे देशात सुलभ वावराबाबत मोठ्या प्रमाणावर जागृती होईल. त्याबरोबरच ही मोहीम फक्त शारीरिक दृष्ट्या सुलभ वावरासाठी बनवली नसून, त्यात सर्वंकष स्वरुपाचा दृष्टीकोन ठेवला आहे आणि त्यामधे माहिती आणि दळणवळणाच्या संदर्भातली सुलभ पोहोच देखिल अंतर्भूत करण्यात आली आहे. ही गोष्ट अधिक उल्हासित करणारी आहे.

ही मोहीम योग्य प्रकारे यशस्वी करण्याच्या प्रक्रियेत काही कमतरता आणि काही आव्हाने आहेत.


❖ सुलभ वावरासाठी पूर्ण करायच्या किमान गरजा वा बाबी आणि आकृतिबंधाची मानके अजूनही स्पष्ट झालेली नाहीत, मग त्या वास्तूविषयक सुलभ वावराची असोत, वाहतुकीच्या पायाभूत सुविधा असोत वा माहिती आणि दळणवळणाच्या साधनांचा सुगम वापर असो. भारतातली एकूण परिस्थिती पाहता आपण वाहतुकीच्या पायाभूत सुविधांसंदर्भातल्या सुलभतेच्या सर्वांगीण मानकांचे तितक्या कडकपणे पालन करत नाही. काही विषयांचे मथळे ठरविणे आणि खुणांची भाषा विकसित करणे यासाठी काही मानके विकसित करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे, पण वाहतुकीच्या पायाभूत सुविधांबाबत मानकांचा विकास झालेला नाही. इमारतींच्या बांधकामाबाबतही विविध मार्गदर्शक तत्वांमधे मूल्यमापनाच्या पद्धतीत मतभेद आहेत आणि यापैकी कोणतीही एक पद्धत बांधकाम व्यावसायिक वा सुविधा पुरवणाऱ्या व्यवस्थापकांना बंधनकारक नाही.

❖ या मोहिमेमध्ये सुलभपणे सर्वत्र पोहोचण्यासाठीच्या मार्गांचा तपासणीवर विशेष भर देण्यात आला आहे. मात्र अशा तपासणीसाठी आवश्यक असणारे प्रशिक्षित तपासनीस उपलब्ध नाहीत आणि आपल्या देशात अशा प्रकारचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थादेखिल नाहीत.

❖ या मोहिमेत, शहरी भागात सुविधा देण्यावर भर आहे. मात्र, ग्रामीण भागातल्या अपंगत्व असलेल्या व्यक्तींना सर्व सुविधा स्वतंत्रपणे हाताळता येण्यासाठी कोणतेही विशेष प्रयत्न होताना दिसत नाहीत.

***सुलभ वावरांबाबतचा कायदा बनवण्यात काही देशांनी यापूर्वीच पावलं उचलली आहेत, तर काही देश याबाबत गंभीरपणे विचार करत आहेत. अपंग व्यक्तींच्या हक्कांबाबतच्या परिषदेत व्यक्त झालेल्या विचारांना अनुसरुन त्याप्रमाणे कृतीचा मेळ घालण्याचा प्रयत्न कॅनडा आणि युरोपियन युनियनने केला आहे. फिलिपाईन्स देशाने सुलभ वावर वाढवण्यासाठी १९८३ मध्येच कायदा अस्तित्वात आणला***

❖ ही मोहीम सरकारी मालकीच्या पायाभूत सुविधा, उदा. इमारती, वेबसाईटस् किंवा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमधे राबवण्यावर भर दिला आहे. खाजगी क्षेत्राकडून पुरवल्या जाणाऱ्या सार्वजनिक सेवा, सुविधा या मोहिमेच्या कक्षेत येत नाही. खाजगी क्षेत्रात यासंबंधी काम करणाऱ्यांना जनतेचा पैसा वापरुन सेवा, सुविधा पुरविणे सरकारला बंधनकारक नाही. मात्र खाजगी क्षेत्राकडून जनतेला दिल्या जाणाऱ्या सोयी सुलभ वापराच्या दृष्टीने कुठल्या दर्जाच्या आहेत याचे परिक्षण सरकारने करायलाच हवे.



❖ शहरांतर्गत तसेच दोन शहरांदरम्यान चालवली जाणारी बस सेवा ही नागरिकांकडून वापरली जाणारी सर्वात स्वस्त आणि जास्त सोयीची वाहतूक व्यवस्था आहे. मात्र रस्ते वाहतूक सोयीची किंवा पोहोचण्यास सुलभ व्हावी यासाठी कोणतीही विशेष व्यवस्था केली गेलेली नाही. कदाचित त्याच्या बराचशा भागाचे खाजगीकरण केल्यामुळे ही परिस्थिती असेल.

❖ सरकारी क्षेत्रातल्या सर्व सुविधांपर्यंत पोचून त्या सोपेपणाने वापरता याव्यात यासाठी या मोहिमेची सुरुवात केली आहे. पण एखादी नवी सुविधा निर्माण करताना, उदाहरणार्थ नवीन इमारती, वाहतूक व्यवस्था माहिती आणि दळणवळण व्यवस्था इत्यादी उभारतांना त्या सर्वसाधारण तसेच अपंगत्व असलेल्या व्यक्ती अशा सर्वांनाच वापरायला सोप्या कशा बनवता येतील यावर या मोहिमेत विचार केलेला नाही.

**सुगम भारत मोहिमेपलीकडे**

सर्व सोयी सुविधांपर्यंत पोहोचून त्या सुगमपणे वापरता येण्याचा प्रश्न हा अपंगत्वाशी निगडीत असल्यामुळे ह्याच्याशी संबंधित बाबींची अंमलबजावणी आणि निरीक्षण, सध्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या अखत्यारीत येते. तथापि सुगम वापरासाठीच्या सुविधांचा फायदा

घेणाऱ्यांची संख्या आणि त्याच्याशी संबंधित कामे करणारी अनेक मंत्रालयं अशा दोन्ही गोष्टी एकमेकात गुंतलेल्या आहेत.

सुलभ वावरासाठीच्या सुविधांची अंमलबजावणी आणि परिक्षण यासाठी पुढील बाबींची आवश्यकता आहे. -

**कायदेविषयक सुधारणा**

अपंगत्व असलेल्या व्यक्तींच्या हक्काविषयीचा सध्या अस्तित्वात असलेला कायदा, याबाबतचे इतर कायदे, तसंच धोरणविषयक चौकटीमध्ये अपंगत्व असलेल्या व्यक्तींना सर्व सुविधा सोपेपणाने वापरता येण्याबाबतचा मुद्दा अविभाज्य आवश्यकता म्हणून अंतर्भूत व्हायला हवा. सध्या या विषयी बांधकाम नियामक, शहरी आणि ग्रामीण विकास कायदा, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतले रस्ते वाहतूक, रेल्वे, नागरी विमानप्रवास, जलवाहतूक, आंतरजाल नियामक, प्रसारण आणि दूरसंचार नियमन, आणीबाणी आणि आपत्कालीन व्यवस्थापन कायदे गृहविषयक कायदे, खरेदीविषयक कायदे, तसेच शिक्षण, आरोग्य, पर्यटन, पोलीस, न्यायालये, क्रीडा आणि संस्कृतीविषयक असे विविध नागरी सेवा आणि सुविधांशी संबंधित कायदे अस्तित्वात आहेत.

सुलभ वावरांबाबतचा कायदा बनवण्यात काही देशांनी यापूर्वीच पावलं उचलली आहेत, तर काही देश याबाबत गंभीरपणे विचार करत आहेत. अपंग व्यक्तींच्या हक्कांबाबतच्या परिषदेत व्यक्त झालेल्या विचारांना अनुसरुन त्याप्रमाणे कृतीचा मेळ घालण्याचा प्रयत्न कॅनडा आणि युरोपियन युनियनने केला आहे. फिलिपाईन्स देशाने सुलभ वावर वाढवण्यासाठी १९८३ मध्येच कायदा अस्तित्वात आणला ज्याचा उद्देश काही इमारती, संस्था, आस्थापना आणि इतर सार्वजनिक स्थळी अपंगत्व असलेल्या व्यक्तींना तिथल्या सुविधा वापरणे सोपे व्हावे म्हणून काही विशिष्ट सोयी करुन देणे हा आहे.

> ***सध्या भारतातले सार्वजनिक खरेदीबाबतचे कायदे आणि व्यवहार सुलभ वावरासाठी अनुकुल नाहीत. सार्वजनिक खरेदी व्यवस्थेद्वारे विकत घेतल्या जाणाऱ्या विविध वस्तू आणि त्यांच्यावर खर्च होणारा पैसा या गोष्टी लक्षात घेता, विकली जाणारी प्रत्येक वस्तू अपंगत्व असलेल्या व्यक्तीलाही सहजपणे उपलब्ध होईल, याची काळजी, सरकारने घेणे महत्त्वाचे आहे.***

**❖ अनुकुल वातावरणाची निर्मिती**

अ) 'इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन साईन लँग्वेज' आणि 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इन्क्ल्यूजिव अँड युनिव्हर्सल डिझाईन' या दोन प्रस्तावित शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था लवकरात लवकर कार्यान्वित झाल्या पाहिजेत.

ब) बांधकामांमधली मानके, वाहनांचा आराखडा आणि वाहनतळांच्या आराखड्याची मानके, सर्व सार्वजनिक सेवा, सुविधांचे प्रमाणिकरण इत्यादींच्या सुलभ वापराच्या विविध पैलूंचा विचार करुन त्यासाठीच्या किमान आवश्यकतांचा विकास करुन तो जाहीर करायला हवा.

क) वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी, आरेखन शास्त्र, खरेदी व्यवस्थापन इत्यादी व्यावसायिक अभ्यासक्रमात सुलभ वावरासाठीचा सर्वसमावेशक आराखडा आणि सुलभ पोहोच हे विषय अनिवार्य करायला हवेत. मग ते कमी महत्त्वाचे म्हणून ठेवले तरी चालेल. त्याबरोबरच सर्वसमावेशक आराखडा शिकविणारे खास वेगळे अभ्यासक्रम उपलब्ध असायला पाहिजेत.

ड) सरकारच्या सर्व अत्यंत महत्त्वाच्या कार्यक्रमांमधे तसेच इतर विकासविषयक कार्यक्रमांमधे 'अपंगत्व असलेल्या व्यक्तींची सर्व सुविधांपर्यंत सुलभ पोहोच' हा विषय अंतर्भूत व्हायला हवा. त्यासंबंधीची मार्गदर्शक तत्वे, अर्थसंकल्पामधे त्यासाठी निधी राखून ठेवणे आणि त्यांची अंमलबजावणी करुन ती योग्यपणे होते आहे की नाही याचे परिक्षण करणे हे सर्व टप्पे त्या कार्यक्रमांमधे असायला हवेत.

इ) नवीन इमारतींना आग निरोधक यंत्रणा बसविल्यानंतरच प्रमाणपत्र दिले जाते. त्याच धर्तीवर अपंगत्व असलेल्या व्यक्तींनां नवीन इमारतींमधे सोपेपणाने वावरता यायला हवे अशा सोयी केल्याची खात्री केल्यानंतरच त्यांना परवानगी द्यायला हवी. सध्या मात्र अशा व्यक्तींसाठी आग लागल्यानंतर बचावाच्या कोणत्याच वेगळ्या सोयींचा विचार झालेला नाही.

❖ **सार्वजनिक खरेदी वा संपादन**

कोणत्याही देशात, राज्य सरकारे ही सर्वात मोठी खरेदीदार असतात. 'आर्थिक सहकार्य आणि विकास संघटने'च्या अहवालानुसार भारतातली सार्वजनिक खरेदी स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या २० ते ३० टक्क्यांदरम्यान आहे. अमेरिका आणि युरोपियन युनियन मधल्या देशांनी सार्वजनिक खरेदी ही सुलभ वावरासाठी परिणामकारकपणे वापरली आहे.

सध्या भारतातले सार्वजनिक खरेदीबाबतचे कायदे आणि व्यवहार सुलभ वावरासाठी अनुकुल नाहीत. सार्वजनिक खरेदी व्यवस्थेद्वारे विकत घेतल्या जाणाऱ्या विविध वस्तू आणि त्यांच्यावर खर्च होणारा पैसा या गोष्टी लक्षात घेता, विकली जाणारी प्रत्येक वस्तू अपंगत्व असलेल्या व्यक्तीलाही सहजपणे उपलब्ध होईल, याची काळजी, सरकारने घेणे महत्त्वाचे आहे. खरेदीबाबतच्या धोरणांमधे अपंगत्व असलेल्यांच्या सुलभ पोहोचण्याचा मुद्रा ग्राह्य धरला गेला तर त्यामुळे खरेदीच्या टक्केवारीवर सकारात्मक परिणाम करेलच त्याबरोबरच खाजगी क्षेत्रावर आणि वस्तू उत्पादक कंपन्यांवर बाजारातल्या प्रभावाच्या दृष्टीनेही चांगला परिणाम करेल.

❖ अपंगत्व असलेल्या व्यक्तींना खाजगी क्षेत्रातल्या सोयी आणि सुविधा सुलभपणे वापरता याव्यात.

सरकारकडून सोयी आणि सुविधांच्या क्षेत्रात खाजगीकरणाला प्रोत्साहन दिले जात असतानाच सुलभ वावराबाबतचे नियम खाजगी क्षेत्राला तितकेच लागू व्हायला हवेत. सध्या भारतात अशी कोणतीही कायदेशीर चौकट नाही, ज्यामुळे खाजगी क्षेत्राला सुलभ वावराचा मुद्दा बंधनकारक होईल तरीही खाजगी क्षेत्राकडून सेवा आणि सुविधा पुरविणाऱ्यांनी, अपंगत्व असलेल्या व्यक्तींना त्या सोपेपणाने उपलब्ध होतील, याची जबाबदारी स्वीकारायला हवी. आंतरजालाद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवांसकट सर्व सरकारी सुविधा अपंगत्व असलेल्या सर्व व्यक्तींना उपलब्ध असायलाच हव्यात.

**सरकारी सक्रियता कशी वाढवता येईल, यासाठी काही शिफारसी खालीलप्रमाणे :-**

❖ खाजगी क्षेत्राकडून सुलभ वावरासाठीच्या अटींची पूर्तता करुन घेण्यासाठी सार्वजनिक यंत्रणेचा वापर व्हायला हवा. उदाहरणार्थ, सरकारने जर ठरवले कि जनतेच्या पैशाने देशभरात बसवलेल्या लिफ्ट्स सुलभ वावराच्या अटींची पूर्तता करणाऱ्या असाव्यात, तर इतक्या मोठ्या प्रमाणावर लिफ्ट्सची खरेदी खाजगी क्षेत्रातल्या ज्या उत्पादकांकडून केली जाईल. त्यांना लिफ्ट्सचे उत्पादन करताना सुलभ वापराच्या सर्व अटी पूर्ण कराव्याच लागतील.

❖ खाजगी क्षेत्रातल्या लोकांकडून पुरवल्या जाणाऱ्या सार्वजनिक सेवा आणि सुविधा यांना सरकारकडून परवाना मिळविणे अनिवार्य करावे. परवाना मिळवतानाच सुलभ वावराची अट पूर्ण करणे अनिवार्य केल्याने त्याची अंमलबजावणी आपोआपच केली जाईल. उदाहरणार्थ, खाजगी वाहतुकदारांना सार्वजनिक प्रवासी बस चालवण्यासाठी परवानगी देतानाच त्यामधे अपंगत्व असलेल्या व्यक्तींच्या वापरासाठी योग्य अशा रचनेच्या बस वापरण्याची आणि अशा बसच्या कर्मचाऱ्यांना अपंगत्व असलेल्या व्यक्तींना प्रवासादरम्यान योग्य ती मदत मार्गदर्शन करण्यासाठी प्रोत्साहित करण्याची पूर्व अट घातली, तर खाजगी क्षेत्रातल्या लोकांकडून चालवल्या जाणाऱ्या सार्वजनिक बस सेवा साहजिकच अपंगत्व असलेल्या व्यक्तींना वापरायला सुलभ होतील. बस उत्पादन करणाऱ्या कंपन्यांवर सुद्धा याचा चांगला परिणाम होईल आणि विशिष्ट वापरास सुलभ अशा बसचे उत्पादन करायला त्यांना प्रोत्साहन मिळेल.

❖ प्रमाणीकरण सुद्धा यासाठी चांगल्या तऱ्हेने वापरता येईल. ज्याप्रमाणे सरकारच्या पर्यटन विभागाकडून किंवा खाजगी क्षेत्रातल्या टेरीग्रीन रेटींग पद्धतीप्रमाणे विविध हॉटेल्सना तारांकीत रेटिंग दिले जाते, त्याप्रमाणे सरकारकडून श्रेणी दिली जावी. अपंग व्यक्तींसाठी विशेष सोयी पुरवणाऱ्यांना वरची श्रेणी किंवा प्रमाणपत्र दिले जावे, त्यामुळे खाजगी क्षेत्रात या विषयाबद्दल जाणीव निर्माण होईल आणि वरची श्रेणी मिळवण्याच्या चढाओढीतून योग्य परिणाम मिळेल. अन्यथा या विषयाकडे खाजगी क्षेत्राचे दुर्लक्ष होणे सहज शक्य आहे.

❖ दर्जाच्या खात्रीसाठी केल्या जाणाऱ्या तपासण्या आणि त्यासाठीच्या यंत्रणा यांमध्ये देखिल सुलभ वावराचा मुद्दा अत्यावश्यक म्हणून समाविष्ट करायला हवा.

■ ■ ■

*लेखिका 'ॲक्सेस ॲबिलिटी' या संस्थेच्या संस्थापक असून सार्वजनिक ठिकाणांचा अधिकाअधिक लोकांना कसा लाभ देता येईल याबाबत कार्यरत आहेत.*
*email: shewany@gmail.com*




# जम्मू काश्मीरसाठी विशेष औद्योगिक पुढाकार 'उडान' योजना

जम्मू आणि काश्मीर राज्यासाठी विशेष औद्योगिक पुढाकार 'उडाण' या उपक्रमाची सुरुवातीची कालमर्यादा २०१५-१६ वरून वाढवून आता २०१९-२० इतकी करण्यात आली आहे.

उडान या राष्ट्रीय एकात्मता योजनें चा उद्देश जम्मू-काश्मीरमधल्या तरुणांना देशाच्या इतर भागासारखे मुख्य प्रवाहात आणणे हा असून या योजनेमार्फत कौशल्य विकास व नोकरीच्या संधी उपलब्ध करण्या बरोबरच - जम्मू काश्मीरमधील युवकांना दहशतवादी बनण्यापासून रोखणे तसेच त्यांच्यातील वेगळेपणाची भावना नष्ट करणे याकडे लक्ष दिले जाणार आहे.

'उड्डाण' अंतर्गत जम्मू-काश्मीरमधील युवकांना भारतातील कॉर्पोरेट जगतातील सर्वोत्तम संधी उपलब्ध करून देणे तसेच कॉर्पोरेट जगताला या दुर्गम राज्यातील हुशार युवकांचे मनुष्यबळ उपलब्ध करून देणे हे दुहेरी उद्दीष्ट साधले जाणार आहे. आतापर्यंत ६७ आघाडीच्या कॉर्पोरेट कंपन्यांनी राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाशी उडानंतर्गत जोडून घेतले आहे. त्यातील तरुणांना प्रशिक्षित करण्याबरोबरच रिटेल, बँकिंग, वित्त सेवा, आयटी, आयटीईएस, पायाभूत संरचना, आदरतिथ्य सेवा इत्यादी क्षेत्रांसाठी १९,००० च्या वर उमेदवार निवडण्यात आले त्यातील १५ हजारांपेक्षा जास्त प्रशिक्षणासाठी आले, त्यापैकी ८ हजार सातशे उमेदवारांनी प्रशिक्षण पूर्ण केले व ६,८३८ उमेदवारांना नोकऱ्या देऊ केल्या गेल्या. या योजनेंतर्गत ४० हजार पदवीधर, उच्चपदवीधर आणि तीन वर्षांच्या अभियांत्रिकी पदविका धारकांना प्रशिक्षण देणे व रोजगार उपलब्ध करून देण्याचे लक्ष्य २०१९-२० पर्यंत साध्य करायचे आहे. अंमलबजावणीचा वेग वाढण्यासाठी, मोठ्या प्रमाणावर निवड प्रक्रियेचा उपयोग करून निवड संख्या वाढवता येईल. आतापर्यंत ६७ महाभरती मेळावे राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये घेण्यात आले.



# साधनांची उपलब्धता-विकसित भारतासाठी नवा माग

डॉ.गौरव रहेजा



***विकसित देशाचे स्वप्न पाहणाऱ्या भारताने मानवी समानता जपली पाहिजे, त्यात पायाभूत सुविधा व माहिती व्यवस्थेत महत्वाची भूमिका पार पाडणे गरजेचे आहे. भारतात दिव्यांग व्यक्तींचे जीवन सुकर करण्यासाठी प्रयत्नांची गरज आहे. दिव्यांग व्यक्तींकडे केवळ शारीरिक अक्षमतेच्या नजरेतून न बघता सांस्कृतिक व इतर विविधतांसारखे बघितले पाहिजे, त्यांच्या विषयी कणव बाळगण्याचीही गरज आहे, त्यांना जीवनाच्या सर्व प्रवाहात सहभागी करून घेतले पाहिजे.***

कुठल्याही देशाचा विकास हा तेथील दिव्यांग किंवा शारीरिक अक्षम व्यक्तींची काळजी कशी घेतली जाते यावर अवलंबून असतो.भारतातील दिव्यांग व्यक्तींची लोकसंख्या जगाच्या एक तृतीयांश आहे व जगातील निम्म्या अंध व्यक्ती या भारतात आहेत. त्यामुळे धर्मादाय कृती ते सामाजिक प्रारूप असा प्रवास यात करणे आवश्यक आहे. विकसित देशाचे स्वप्न पाहणाऱ्या भारताने मानवी समानता जपली पाहिजे, त्यात पायाभूत सुविधा व माहिती व्यवस्थेत महत्वाची भूमिका पार पाडणे गरजेचे आहे. भारतात दिव्यांग व्यक्तींचे जीवन सुकर करण्यासाठी प्रयत्नांची गरज आहे. दिव्यांग व्यक्तींकडे केवळ शारीरिक अक्षमतेच्या नजरेतून न बघता सांस्कृतिक व इतर विविधतांसारखे बघितले पाहिजे, त्यांच्या विषयी कणव बाळगण्याचीही गरज आहे, त्यांना जीवनाच्या सर्व प्रवाहात सहभागी करून घेतले पाहिजे. त्यासाठी शिक्षण, माध्यमेव इतर मानवी संपर्क माध्यमात बदल व जागरूकता आणणे गरजेचे आहे. दिव्यांगता किंवा शारीरिक अक्षमतेकडे मानवी जीवनातील विविधता म्हणून पाहिले पाहिजे.आपल्या जगण्याच्या परिसंस्थेत त्यांना सामावून घेतले पाहिजे, सापत्नभाव न ठेवता तरतुदी केल्या पाहिजेत. गुरूदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या शब्दात सांगायचे तर भेदाभेद कसे दूर करायचे हा प्रश्न नाही तर भेदांविरोधात एकी टिकवायची गरज आहे.

दिव्यांग व्यक्तींचे जीवन सुसह्यकरणाऱ्या सुविधांची उपलब्धता ही शारीरिक अक्षमतेच्या आधारावरील भेदाभेद दूर करण्याचे महत्वाचे साधन आहे.त्या सुविधांच्या अंमलबजावणीसाठी सतत मूल्यमापन व संशोधन केले पाहिजे. शहरी व ग्रामीण जीवनावर या सुविधांचा काय परिणाम होतो याचा अभ्यास केला पाहिजे.दिल्ली मेट्रोचेच उदाहरण घ्यायचे तर तो एक सकारात्मक वस्तुपाठ आहे समकालीन भारतात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठीची चलता प्राप्त करण्याकरिता तो एक मार्ग आहे. दिव्यांग व्यक्तींची चलता पायाभूत सुविधांशी एकात्म आहे पण त्यात माहिती व इतर सेवाही दिल्या गेल्या आहेत.मोठ्या परिप्रेक्ष्यात पाहिले तर त्यामुळे आर्थिक, सांस्कृतिक व सामाजिक विविधता यात मोठी उद्दिष्टे साध्य होत आहेत.शारीरिक फरकांना आपण विविधतेच्या मार्गाने सामोरे जातो आहोत. त्यासाठी कायम फेर शिक्षण आवश्यक आहे तरच दिव्यांग व्यक्तींना साधन-सुविधा उपलब्ध होऊ शकतात.

**साधन सुविधांची गरज व महत्व**


दिव्यांग किंवा शारीरिक अक्षम व्यक्तींना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण फार वेगळे काही करतो

आहोत असे समजण्याचे कारण नाही, फक्त लोकांच्या मनात त्यांच्या विषयी संवेदनशीलता जागी करणे आवश्यक आहे. जीवनसंस्कृती, सामाजिक दृष्टिकोन, मानवी प्रतिसाद याला यात महत्व आहे. साधनांची उपलब्धता हा केवळ शारीरिक अक्षमतेशी संबंधित मुद्दानाही तर त्यात बोधन क्षमता सामाजिक व संस्थात्मक स्वीकार्यता हे मुद्दे महत्वाचे आहेत.मानवी अवलंबित्व कमी करून रोजची कामे करता येणे, संपर्क साधता येणे हा एक जीवनानुभव आहे.यात मानवी सन्मानाचा मुद्दाही महत्वाचा ठरतो सन्मानाने जीवन जगण्यासाठी साधनसुविधा मिळणे आवश्यक असते, त्यासाठी सर्वंकष दृष्टिकोन असणे आवश्यक आहे, आपण एका ठिकाणाहून सहज दुसरीकडे जाऊ शकतो का,संपर्कसाधू शकतो का,प्राप्तस्थितीत कुणाची मदत न घेता जीवन जगू शकतो का व सन्मानाने समानतेवर आधारित जीवन आपल्या वाटेला येते का..याप्रश्नाची उत्तरे हो अशी असतील तर आपण चांगले जीवन जगतो आहोत असे म्हणायला हरकत नाही, जर उत्तर नाही असे येत असेल तरआपण साधनांची अनुपलब्धता किंवा त्यापर्यंत पोहोचणे का शक्य होत नाही याचा विचार केला पाहिजे.साधन व सेवांची उपलब्धता हा मानवी आंतरसंबंधांचा एक अनुभव असतो तो तसा नसेल तर या आंतरसंबंधात काही तरी बिनसले आहे असे म्हणायला हवे.मानवी जीवन सुसह्य करण्यासाठी साधनांची उपलब्धता ही गुंतागुंतीच्या आंतरक्रिया, मानवी कार्य व अवकाश या घटकांशी निगडित आहे. जर मानवी कृतींना अवकाश मिळाला तर साधनांची उपलब्धता सोपी जाते व पण आपण जर काही संकुचित समज ठेवले तर ती अवघड बनते.साधनांची उपलब्धता ही मानवी कार्यासाठी पाठिंबा देणारी नसेल तर ती संबंधित व्यक्तींपर्यंत पोहोचत नाही असा होतो किंवा ती अंशत उपलब्ध असते असाही होतो.

आपल्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक दर्जाचे प्रतिबिंब आपल्या जीवनात उमटत आहे. साधनांच्या उपलब्धतेतील अडथळे केवळ पायाभूत सुविधांच्या अभावामुळे नसतात तर सांस्कृतिकते मधील त्रुटींमुळेही असतात. दिव्यांग व्यक्तींसाठी साधनांची उपलब्धता ही संकल्पना आता गेल्या दशक भरापेक्षा वेगाने साकारते आहे, त्याच्या फायद्यांचा अनुभवही येत आहे. 'पर्सन्स विथ डिसॅबिलिटी ॲक्ट १९९५' हा कायदा म्हणजे अंमलबजावणीचा मोठा मंच आहे. पण त्यातील काही शब्दप्रयोग गोंधळात टाकणारे आहेत. योग्य सरकारी संस्था व स्थानिक अधिकाऱ्यांनी त्यांच्या आर्थिक व विकास मर्यादेत राहून रॅम्पस किंवा इतर काही गोष्टी कराव्या असे म्हटले आहे त्यामुळे मूळ तत्वांमध्ये कुठेतरी बाधा येते. साधनांची उपलब्धता ही नियम व निर्बंधांच्या चक्रात अडकते. या कायद्यानुसार खरेतर दिव्यांग व्यक्तींना शिक्षण व रोजगारात तीन टक्के आरक्षण आहे. जर शैक्षणिक पाया सुविधा व प्रक्रियाच पूर्णपणे उपलब्ध नसतील तर कामाच्या ठिकाणी समानता व सर्वसमावेशकतेचा मुद्दा बाजूला राहतो अजून ही अनेक कामाच्या ठिकाणी पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध नाहीत. दिव्यांग व्यक्ती कायदा (पीडब्ल्यूडी) कायदा१९९५ अन्वये आपल्याला सगळ्या गोष्टींचा फेर आढावा घेण्याची गरज आहे.जर आपण पायाभूत सुविधा व समावेशकतेत प्रगती केल्याचा दावा करीत असू तर असा फेर आढावा गरजेचा आहे असे वाटते. यात आता उपलब्धता निर्देशांक नावाचा एक प्रकार आहे. त्यानुसार आपल्याला दिव्यांग व्यक्तींसाठी साधने व सेवांची सुविधा नेमकी किती आहे हे समजू शकेल. ज्याचे मापन करता येते ते साध्य करता येते त्यामुळे आता सार्वजनिक इमारती, संस्था, वाहतूक ठिकाणे,पायाभूतसुविधा यांचे तसेच बांधकाम केलेल्या व इतर सुविधांचे मूल्यमापन करणे गरेजेचे आहे. यागोष्टींचे मोजमाप व मूल्यमापन शक्य आहे. त्याच बरोबर या सुविधा निर्माण करताना अधिक संशोधनाचीही गरज असते. 'डब्ल्यूआयएनआयटी मॉडेल' आकृती एक मध्ये दाखवले असून त्यातून संबंधित सोयीसाठीचे उत्पादन किंवा सोयीच्या, उत्पादनाच्याव पायाभूत सुविधेच्या टप्प्यात किती प्रकाराची लोकसंख्या येते आहे. या सेवांचा लाभ कुणाला मिळत आहे व कोण वंचित आहे. उत्पादन, सेवा, पायाभूत सुविधा कुणाला मिळत आहेत कुणाला मिळत नाहीत याचे विश्लेषण करता येते, कुठल्या गटातील लोकांना सेवा मिळतात हे समजते. वरून खालपर्यंत आपल्याला सगळे नियोजन जपता येते. वरून खाली व खालून वर आपल्याला यात नियोजन दिसते व त्यात उपलब्धता हा प्रमुख मुद्दा राहतो. त्यात मूल्यमापन व प्रगतीचे मापन करताना पारदर्शकता व स्पष्टता लागते. 'डब्ल्यूआयएनआयटी मॉडेल'

***साधनांच्या उपलब्धतेतील अडथळे केवळ पायाभूत सुविधांच्या अभावामुळे नसतात तर सांस्कृतिकतेमधील त्रुटींमुळेही असतात.दिव्यांग व्यक्तींसाठी साधनांची उपलब्धता ही संकल्पना आता गेल्या दशक भरापेक्षा वेगाने साकारते आहे, त्याच्या फायद्यांचा अनुभवही येत आहे. 'पर्सन्स विथ डिसॅबिलिटी ॲक्ट १९९५' हा कायदा म्हणजे अंमलबजावणीचा मोठा मंच आहे. पण त्यातील काही शब्दप्रयोग गोंधळात टाकणारे आहेत.***

असे दाखवते की, साधनांच्या उपब्धतेचे मॅपिंग करता येते व स्मार्ट सिटीची संकल्पना भारतात ज्या पद्धतीने सांगण्यात आली त्यात सर्वसाधारण उपलब्धता हा घटक स्मार्टनेसमध्ये महत्वाचा मानला गेला आहे तो आपल्या शहरी व प्रत्यक्ष जीवनमानाशी निगडित आहे कारण त्यात सामाजिक शाश्वतताआहे. आपल्याशहरी पर्यावरणात त्यामुळे एक महत्वाचा थर समाविष्ट होतो. स्मार्टसिटीतील विकासाचे लक्ष्य असलेला लोकसंख्येचा वर्ग कोणता आहे, ज्याला अंतिम फायदा मिळणार आहे, तो फायदा कशा पद्धतीने मिळणार आहे, दिव्यांगव्यक्तींना त्यात कशा पद्धतीने सहभागी केले जाणार आहे याप्रश्नांची उत्तरे देण्यासाठी साधन उपलब्धता बृहत




आराखडा उपयोगी पडतो.

आकृती क्रमांक १ डब्ल्यूआयएनआयटी प्रारूप ( कीटस अँड क्लार्कसन जे. २००४).

२०२०पर्यंतचा लोकसंख्येचा अंदाज पाहिला तर वयोवृद्धांची संख्यावाढते आहे. तत्कालिक अपंगत्व वाढते आहे, हृदयरोग, श्वसनरोग व इतर वैद्यकीय आजार असले तरी आयुर्मान औषधांमुळे वाढले आहे. आपण या सर्व व्यक्तींना सुविधांचे नियोजन, रचना, बांधणी करताना सामावून घेत आहोत काय हा खरा प्रश्न आहे. जर त्यांना सामावून घेत नसू तर तसे करण्याने प्रत्यक्षात मोजावी लागणारी किंमत लक्षात घ्यावी लागेल. आर्थिकव शारीरिक अक्षमता व दुसऱ्यांवरचे अवलंबित्व यामुळे समाजाला व देशाला वेगळी किंमत मोजावी लागत असते. त्यामुळे जर आपण साधने उपलब्ध केली तर या समस्येवर मात करता येते.

**पुढील वाटचाल**

साधन सुविधांचे नियोजन नागरिकांच्या दृष्टिकोनातून झाले पाहिजे. त्यासाठी सहभागात्मक नियोजन, व्यक्तीगत पुढाकार यांनाही महत्व आहे, त्याला सरकारच्या पाठिंब्याची जोड असणे गरजेचे आहे. सेवा सुविधांची उपलब्धता ही बाब केवळ निकषांचे अनुपालन ठरण्याइतकी मर्यादित नाही पण उत्तम जीवशैली जीवनव्यवहाराशी निगडित आहे. यासाठी काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा गुणवत्ता विकास महत्वाचा आहे.आराखडा, नियोजन व मूल्यमापन हे घटक साधन सेवा उपलब्धतेत महत्वाच्या ठरतात. ॲक्सेसेबल इंडिया कँपेन ही मोहीम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१५ मध्ये सुरू केली त्यामुळे दिव्यांग व्यक्तींसाठीच नव्हे तर देशातील त्याबाबत उद्दिष्ट पूर्णतेसाठी आशेचे किरण दिसत आहेत. विकासात्मक भवितव्य जर काही असेल तर त्याला आपण कसा प्रतिसाद देतो यावर सगळे अवलंबून आहे. कुठलाही भेदभाव न ठेवता दिव्यांग व्यक्तींसह सर्व प्रकारच्या व्यक्तींना जीवन संधी निर्माण करणे महत्वाचे आहे. सार्वत्रिक आराखडा तत्वज्ञानाच्या मदतीने सर्वांना सर्व सुविधांचा विनासायास लाभ मिळणे आवश्यक आहे. राष्ट्रीय आव्हाने स्वीकारताना आपण भारतीय लोकांपुढची नवी आव्हाने पेलत आहोत. साधन सेवा उपलब्धता निर्देशांक तयार करून त्याचा प्रगत उपयोग हे दोन्ही घटक भारतीय शहरी परिप्रेक्ष्यात मोजता येतील. त्यातून पुढे ज्या भागात देशातील सर्वात जास्त लोक राहतात तेथे व निम्न शहरी व ग्रामीण परिप्रेक्ष्यातही या संकल्पना रूजवता येतील.आजूबाजूची स्थिती, माहिती व्यवस्था व पायाभूत सुविधा विविध अपंगत्वे असलेल्या लोकांसाठी देणे आवश्यक आहे. केवळ दिव्यांग व्यक्तीच नव्हे तर इतरांमध्येही काही शारीरिक अक्षमता असतात, त्यांचा विचार केला पाहिजे. तसे केले तरच त्यातून मोठा लाभ मिळू शकेल सर्वसमावेशकतेशिवाय कुठल्याही योजनेवर केलेला खर्च वाया जात असतो. त्यामुळे मदत साधने व सुविधा यांची उपलब्धता सर्वसमावेशकतेने झाली पाहिजे त्यातून उज्ज्वल भविष्याची फळे आपणा सर्वांना मिळतील.

■■■

*लेखक डॉ. गौरव रहेजा हे सेंटर फॉर आर्किटेक्टर अँड प्लानिंग व सेंटर फॉरएक्सलन्स इन ट्रान्सपोर्टेशन सिस्टीम या आयआयटी रूडकीच्या संस्थेत प्राध्यापक आहेत. स्मार्टसिटीज प्रोग्रॅममध्ये ते जर्मन अकडेमिक एक्सचेंज सर्व्हिसेस या संस्थेचे फेलो असून भारत सरकारचे अक्सेसिबिलिटी अँड युनिव्हर्सल डिझाइन इनिशिएटिव्ह या प्रकल्पाचे सल्लागार आहेत.*

*email: gr.iitroorkee@gmail.com*

# आधार: १०० कोटी भारतीयांची ओळख

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण अर्थात युआयडीएआयने ४ एप्रिल २०१६ला त्याच्या १०० कोटीव्या आधार कार्डाचे वितरण केले. पहिल्या आधाराचे वितरण २०१० साली करण्यात आले होते, गेल्या साडे पाच वर्षांच्या काळातला हा विक्रम म्हटला पाहिजे. याच्या काही दिवस आधीच आधार अधिनियम २०१६ या ऐतिहासिक विधिविधानाची घोषणा करण्यात आली होती.

आतापर्यंत १८ वर्षांवरील ९३ टक्के लोकांना आधारचे वाटप करण्यात आले (आकडेवारी २०१५ सालच्या जनगणनेनुसार).

आजच्या तारखेला तेरा राज्ये व केंद्रशासीत प्रदेश मिळून ९० टक्क्यांच्या वर आधार वाटप झाले असून उर्वरित १३ राज्ये व केंद्रशासित प्रदेशात हा आकडा ७५ ते ९० टक्क्यांच्या मध्ये आहे.

**आधारची काही क्षणचित्रे**

१. १०० कोटींपेक्षा अधिक नागरिकांकडे आधार आहे

२. ७३.९६ कोटी भारतातील (९३ टक्के) प्रौढांकडे आधार आहे

३. ५ ते १८ वर्षांपर्यंतच्या २२.२५ कोटी (६७ टक्के) मुलांकडे आधार आहे.

४. शून्य ते ५ वयोगटातील २.३० कोटी (२० टक्के) बालकांकडे आधार आहे.

५. दर दिवशी ५ ते ७ लाख लोक आधारसाठी नोंदणी करतात

६. जागतिक पातळीवर आधार सगळ्यात मोठे ऑनलाईन डिजिटल व्यासपीठ आहे.

**आधारचे फायदे**

१. डीबीटीएल (पहल) - १४,६७२ कोटी रुपये अंदाजित बचत

२. पीडीएस - आंध्रप्रदेश, तेलंगणा, पाँडिचेरी आणि दिल्ली या चार राज्यांची अंदाजित बचत २,३४६ कोटी रुपये

३. शिष्यवृत्ती - आंध्रप्रदेश, तेलंगणा व पंजाब या तीन राज्यांची अंदाजित बचत २७६ कोटी रुपये

४. निवृत्ती वेतन (NSAP) - झारखंड, चंदिगढ, पाँडिचेरी या राज्यांची मिळून ६६ कोटी रुपये इतकी अंदाजित बचत

**आधार वापर**

१. २५.४८ कोटी बँक खाती आधारला जोडण्यात आली.

२. जवळपास १२.२८ कोटी (७१ टक्के) एलपीजी जोडणी आधारला जोडण्यात आली.

३. जवळपास ११.३९ कोटी (४५ टक्के) रेशन कार्डे आधारला जोडण्यात आली.

१. जवळपास ५.९० कोटी (६० टक्के) नरेगा कार्डे आधारला जोडण्यात आली.

**आधार प्राधिकृतीकरण**

१. जवळपास १५० कोटी प्राधिकृतिक व्यवहार हे युआयडीएआयमार्फत केले जातात.

२. जवळपास ८.४ कोटी ई-केवायसी व्यवहार हे युआयडीएआयमार्फत केले जातात.

३. दिवसभराचे जवळपास ४० लाख व्यवहार युआयडीएआयमार्फत प्रमाणीकृत केले जातात.

आधार पेमेंट बाईड (एपीबी) मार्फत सरळ गरजूला त्याच्या बँक खात्याची माहिती नसतानाही पैसे देता येणे शक्य झाले. एपीबी मध्ये गेल्या दोन वर्षात वाढ झाली आहे. २३ कोटींपेक्षा जास्त लोकांनी आपली बँक खाती आधारला जोडून घेतली आहेत. एकूण एपीबी व्यवहारात ९४.७१ कोटी रुपयांवरून २८,३६३ कोटी रुपयांची वाढ झाली.या वर्षी आधार पेमेंट ब्राईड (एपीबी) वर २८,३६३ कोटी रुपयांचे एकूण ९४.७१ कोटी आर्थिक व्यवहार नोंदवण्यात आले. ३१ मे २०१४ रोजी प्रकाशित माहितीनुसार त्या वर्षी हा आकडा अनुक्रमे ४४७४ कोटी आणि ७.१३ कोटी आर्थिक व्यवहार असा होता.

आणखी एक महत्त्वाची प्राप्ती अशी की गेल्या दोन वर्षात आधार सक्षम भरणा प्रणाली (एईपीएस) मध्ये झालेली वाढ. एईपीएस म्हणजे दूरस्थ गावतील बँक खाते नसलेल्या कोणत्याही व्यक्तीला त्याच्या दारात मायक्रो एटीएमवर अंगठा उमटवून किंवा आधारद्वारे पैसे काढणे किंवा जमा करणे शक्य होते. ३१ मार्च २०१६ पर्यंत एईपीएस व्यवहार १०.७६ कोटी इतके झालेले होते, ३१ मार्च २०१४ ला हा आकडा केवळ ४६ लाख इतका होता. भारत सरकारने प्रधानमंत्री जन धन योजना, एमजीएनआरीईजीएस, पेन्शन्स, शिष्यवृत्ती, पीडीएस, पासपोर्ट, डीहीटीएल, युएएन, सरकारी कार्यालयातील उपस्थिती प्रणाली इत्यादी अनेक वेगवेगळ्या योजना व उपक्रमांना आधारशी जोडण्यास प्रोत्साहन दिले आहे.



# दिव्यांग व्यक्तींसाठी आर्थिक समावेशकता

पी.सी.दास



***भारत सरकारने दिव्यांग व्यक्तींना समान संधी देण्यासाठी तीन कायदे केले आहेत.त्यात सामाजिक आर्थिक समावेशकता हा प्रमुख उद्देश आहे. 1) भारतीय पुनर्वसन मंडळ कायदा 1992 2) अपंग कायदा 1995 3) स्वमग्नता (ऑटिझम) सेरेब्रल पाल्सी, मतीमंदत्व व बहुविकलांगता व्यक्ती कल्याण राष्ट्रीय विश्वस्त संस्था कायदा 1995 याशिवाय संयुक्त राष्ट्रे शारीरिक अक्षमता जाहीरनामा 2006 (यूएनसीआरपीडी) भारतानेही 2008 मध्ये मंजूर केला आहे ,त्यात दिव्यांग, शारीरिक अक्षम व्यक्तींना समाजात सामावून घेण्याला प्राधान्य दिले आहे.***

भारताच्या राज्यघटनेने कलम ३९ अशा मार्गदर्शक तत्वाला मान्यता दिली आहे, ज्यान्वये नागरिक, पुरूष, स्त्रिया यांना समान अधिकार आहेत, त्यात रोजीरोटी कमावण्याच्या अधिकाराचा समावेश आहे. कलम ४१ अन्वये सरकारने त्यांच्या आर्थिक अधिकारात लोकांना काम देणे आवश्यक आहे. कलम ४२ अन्वये सरकारने लोकांना न्याय्य व मानवी सुसह्य स्थितीत काम देणेही गरजेचे आहे. मुख्यत्वेकरून आपण येथे दिव्यांग व्यक्तींचा विचार करणार आहोत. वैद्यकीय प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या प्रमाणित नियमानुसार निर्धारित अपंगत्वाच्या ४० टक्क्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या व्यक्तीला दिव्यांग- अपंग किंवा शारीरिक अक्षम व्यक्ती म्हणतात. भारत सरकारने दिव्यांग व्यक्तींना समान संधी देण्यासाठी तीन कायदे केले आहेत.त्यात सामाजिक आर्थिक समावेशकता हा प्रमुख उद्देश आहे. १) भारतीय पुनर्वसन मंडळ कायदा १९९२ २) अपंग कायदा १९९५ ३) स्वमग्नता (ऑटिझम) सेरेब्रल पाल्सी, मतीमंदत्व व बहुविकलांगता व्यक्ती कल्याण राष्ट्रीय विश्वस्त संस्था कायदा १९९५ याशिवाय संयुक्त राष्ट्रे शारीरिक अक्षमता जाहीरनामा २००६ (यूएनसीआरपीडी) भारतानेही २००८ मध्ये मंजूर केला आहे ,त्यात दिव्यांग, शारीरिक अक्षम व्यक्तींना समाजात सामावून घेण्याला प्राधान्य दिले आहे. त्याचबरोबर त्यांना समान संधी व सन्मानाचे आयुष्य जगण्याचा अधिकारही दिला आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारतात दिव्यांग म्हणजे शारीरिक अक्षम व्यक्तींची संख्या २६.८ दशलक्ष असून त्यात १४.९९ दशलक्ष पुरूष तर ११.८२ दशलक्ष स्त्रिया हे अपंग किंवा दिव्यांग आहेत. यातील ग्रामीण भागात राहणाऱ्या अक्षम व्यक्तींची (दिव्यांग) संख्या १८.६३ दशलक्ष आहे तर शहरी भागात ही संख्या ८.१८ दशलक्ष आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार १३.४ दशलक्ष दिव्यांग व्यक्ती रोजगार योग्य गटात असून त्यातील ८८ लाख ग्रामीण तर ४६ लाख शहरी भागात आहेत, १३.४ रोजगारक्षम वयोगटातील लोकांपैकी ७८ लाख पुरूष तर ५६ लाख स्त्रिया आहेत. दिव्यांग व्यक्तींच्या एकूण संख्येपैकी १४.६ दशलक्ष लोक हे साक्षर आहेत याचा अर्थ त्यांची देशाच्या अर्थव्यवस्थेत योगदान देण्याची क्षमता नाकारता येणार नाही. आर्थिक सेवातील सर्वसमावेशकता व आर्थिक उत्पादने वाजवी किंमतीत वंचित असलेल्या या गटांना मिळणे आवश्यक

आहे. येथे आर्थिक उत्पादने याचा आर्थिक सेवा योजना असा अर्थ अभिप्रेत आहे. यात बँकिंग सेवा, विमा, निवृत्ती वेतन, कर्ज यांचा समावेश आहे. सर्वसमावेशक विकासासाठी दिव्यांग व्यक्तींना वाजवी दरात या सेवा मिळणे आवश्यक आहे. त्यातून त्यांना आर्थिक व सामाजिक सुविधा मिळतात. दिव्यांग किंवा शारीरिक अक्षम व्यक्तींच्या सर्वसमावेशकतेचे महत्व सरकारला पटले आहे. जनधन योजना, गरिबांसाठी आरोग्य विमा , मुद्रा कर्ज हे राष्ट्रीय अग्रक्रमाचे कार्यक्रम आहेत. आर्थिक सर्वसमावेशकता ही सामाजिक कल्याणाशी निगडित असते त्यासाठी सामाजिक कल्याण कार्यक्रम राबवले जातात त्यातून लाभार्थींना पैसे मिळणे सोपे होते व त्यात प्रक्रियात्मक खर्च कमी होतो व गैरप्रकारही होत नाहीत. प्रक्रियेत पारदर्शकता येते खऱ्या लाभार्थींना मदत मिळते शिवाय लाभार्थींची द्विरूक्ती होत नाही.

**आर्थिक परिघाबाहेरील दिव्यांग किंवा शारीरिक अक्षम व्यक्ती**

समाजात जे वंचित घटक असतात त्यात शारीरिक अक्षम व्यक्ती म्हणजेच दिव्यांग व्यक्ती ( पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे संबोधन वापरले आहे) लाभापासून जास्तच दूर आहेत. ते गरिबात गरीब राहिले आहेत. अपंगत्व हे दारिद्र्याला सोबत घेऊन येते त्याची अनेक उदाहरणे आहेत. तशीच त्यावर मात केलेली उदाहरणेही आहेत.यात उलटाही अर्थ आहे अपंगत्वामुळे दारिद्र्य येते असे म्हटले तरी दारिद्र्यात अपंगत्वाचे प्रमाण जास्त असते असाही एक दुसरा अर्थ आहे. दारिद्र्य व अपंगत्व हे असे एकमेकांशी निगडित आहेत. समाजातील गरीब वर्गात अपंगत्वाचे प्रमाण जास्त असते असे म्हणता येते. महिलांच्या बाबतीत तर ही परिस्थिती आणखी वाईट चित्र उभे करते. त्यामुळे अपंगांचा जो वंचित गट आहे त्याला समाजात व आर्थिक विश्वात उभे करणे हे इतर वंचित गटांपेक्षा फार मोठे आव्हान आहे, त्यांना आर्थिक समावेशकतेत आणणे महत्वाचे आहे. एकतर त्यांची हिंडण्याफिरण्याची क्षमता कमी असते. शारीरिक मर्यादा असतात, त्यांना आर्थिक

---

***अपंगत्व हे दारिद्र्याला सोबत घेऊन येते त्याची अनेक उदाहरणे आहेत तशीच त्यावर मात केलेली उदाहरणेही आहेत . यात उलटाही अर्थ आहे अपंगत्वामुळे दारिद्र्य येते असे म्हटले तरी दारिद्र्यात अपंगत्वाचे प्रमाण जास्त असते असाही एक दुसरा अर्थ आहे. दारिद्र्य व अपंगत्व हे असे एकमेकांशी निगडित आहेत. समाजातील गरीब वर्गात अपंगत्वाचे प्रमाण जास्त असते असे म्हणता येते. महिलांच्या बाबतीत तर ही परिस्थिती आणखी वाईट चित्र उभे करते. त्यामुळे अपंगांचा जो वंचित गट आहे त्याला समाजात व आर्थिक विश्वात उभे करणे हे इतर वंचित गटांपेक्षा फार मोठे आव्हान आहे, त्यांना आर्थिक समावेशकतेत आणणे महत्वाचे आहे.***

---

सेवांचे ज्ञानही कमी असते व ते विखुरलेले असल्याने स्वमदत गटासारख्या योजनात त्यांचे एकत्र येणे अजून तरी खूप कमी आहे. काही अडचणींचा विचार करून अपंग किंवा दिव्यांग व्यक्तींना आर्थिक मदत व स्वरोजगारासाठी, शिक्षणासाठी कर्ज दिले जाते. भारत सरकारने त्यासाठी 'नॅशनल हँडीकॅपड फायनान्स अँड डेव्हलपमेंट कार्पोरेशन' ही संस्था २४ जानेवारी १९९७ रोजी स्थापन केली आहे. त्यासाठी ४०० कोटी रूपयांचे भागभांडवल दिलेले आहे. कंपनी कायदा १९५६ च्या कलम २५ अन्वये (कंपनी कायदा २०१३ कलम ८ अन्वये) ना नफा ना तोटा या तत्वावर ही संस्था स्थापन केली. एनएचएफडीसी ही संस्था सवलतीच्या दराने ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या १८ वर्षावरील लोकांना कर्ज देते. दिव्यांग व्यक्तींना एनएचएफडीसीचे कर्ज मंजूर करण्यासाठी कुठलीही कमाल वयोमर्यादा नाही. या महाडमंडळाच्या योजना व कार्यक्रम हे कर्जाधिष्ठित सवलतीत कर्ज व कर्जेतर अनुदान योजना या दोन गटात आहेत.

**कर्जाधिष्ठित योजना**

१. स्वरोजगार कर्जे- यात दिव्यांग व्यक्तीला स्वरोजगारासाठी २५ लाखांपर्यंत कर्ज मिळते व त्याचा मुद्दलावरचा कर्ज व्याज दर ५ ते ८ टक्के असतो, कमाल दहा वर्षात हे कर्ज फेडायचे असते.

२. शैक्षणिक कर्ज- यात दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षण किंवा उच्च शिक्षणासाठी ४ टक्के दराने कर्ज दिले जाते. भारतात शिक्षणासाठी १० लाख तर परदेशात शिक्षणासाठी २० लाख रूपये कर्ज दिले जाते. हे कर्ज सात वर्षात परतफेड करणे आवश्यक असते. अभ्यासक्रम संपल्यानंतर एक वर्षाने किंवा नोकरी मिळाल्यानंतर सहा महिन्यांनी कर्जवसुली सुरू होते.

३. सूक्ष्म अर्थपुरवठा- दिव्यांग व्यक्तींना मदत पातळीवर अर्थसहाय्य केले जाते त्यात उद्योग सुरू करणे किंवा

प्राप्ती सुधारणा उपक्रमात मदत केली जाते. स्वयंसेवी संस्थांमार्फत या योजना राबवल्या जातात. स्वयंसेवी संस्था १० लाख कर्ज घेते व ते दिव्यांग किंवा शारीरिक अक्षम व्यक्तींना वितरित करते व संबंधित व्यक्तीला कमाल ५० हजार मदत मायक्रो फायनान्समार्फत केली जाते. एक स्वयंसेवी संस्था वीस दिव्यांग किंवा अक्षम व्यक्तींना मदत करते. यात व्याज दर ५ टक्के असतो, तीन वर्षात हे कर्ज परत करणे अपेक्षित आहे.

**कर्जेतर सुविधा**

अ)कौशल्याधारित दिव्यांग व्यक्ती प्रशिक्षण- या योजनेत एनएचएफडीसी दिव्यांग व्यक्तींना कौशल्य प्रशिक्षण देते त्यात प्रशिक्षणार्थी दिव्यांग व्यक्तींना महिना दोन हजार रूपये विद्यावेतन दिले जाते.

ब) शिष्यवृत्ती योजना- मंत्रालयाने एनएचएफडीसीवर दिव्यांग व्यक्तींना शिष्यवृत्ती देण्याची जबाबदारी टाकली आहे. सध्या एनएचएफडीसी विश्वस्त निधी शिष्यवृत्ती दिव्यांग किंवा शारीरिक अक्षम २५०० विद्यार्थ्यांना देत आहे, त्यात तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांचा विचार केला जातो.

एनएचएफडीसी ही संस्था ३६ राज्यात विविध निर्धारित संस्थांच्या माध्यमातून काम करते. या संस्थेचा पाच सार्वजनिक बँकांशी करारही झालेला आहे. अठरा प्रादेशिक ग्रामीण बँकाही दिव्यांग व्यक्तींना सवलतीच्या दरात कर्ज देतात, महामंडळाची कामगिरी चांगली होते आहे कारण गेल्या चार आर्थिक वर्षात या संस्थेला चांगले श्रेयांकन मिळाले आहे. २०१५-१६ मध्ये संस्थेला असेच चांगले श्रेयांकन मिळण्याची अपेक्षा आहे.

कर्ज वाटप- एनएचएफडीसी या संस्थेने स्थापनेपासून ६९४.२९ कोटी रूपयांचे कर्ज आतापर्यंत वितरित केले आहे व त्याचा लाभ विविध कर्ज योजनातील १.२६ लाख दिव्यांग व्यक्तींना झाला आहे.

कौशल्य प्रशिक्षण- महामंडळाने कौशल्य विकासासाठी दिव्यांग गटातील ३६६१६ व्यक्तींना ४६.२१ कोटींचे अर्थसहाय्य मंजूर केले आहे. २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी एनएचएफडीसी या संस्थेने १७ ते २० हजार लोकांना कौशल्य प्रशिक्षणाचे उद्दिष्ट ठेवले आहे.

***मंत्रालयाने एनएचएफडीसीवर दिव्यांग व्यक्तींना शिष्यवृत्ती देण्याची जबाबदारी टाकली आहे. सध्या एनएचएफडीसी विश्वस्त निधी शिष्यवृत्ती दिव्यांग किंवा शारीरिक अक्षम २५०० विद्यार्थ्यांना देत आहे, त्यात तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांचा विचार केला जातो. एनएचएफडीसी ही संस्था ३६ राज्यात विविध निर्धारित संस्थांच्या माध्यमातून काम करते. या संस्थेचा पाच सार्वजनिक बँकांशी करारही झालेला आहे. अठरा प्रादेशिक ग्रामीण बँकाही दिव्यांग व्यक्तींना सवलतीच्या दरात कर्ज देतात.***

शिष्यवृत्ती योजना- महामंडळाने विश्वस्त निधीतून २०११-१२ ते आजपर्यंत ४७.९४ कोटी रूपये मदत तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी वितरित केली आहे त्यात ७११७ नवीन व १०९७ पुन्हा मुदतवाढ दिलेली प्रकरणे आहेत. शिष्यवृत्ती योजनेत राष्ट्रीय निधीतून एनएचएफडीसीने २००९-१० ते आजपर्यंत ३.५१ कोटी रूपये वितरित केले आहेत अर्थातच तेही तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षणासाठी दिलेले आहेत, त्यात २८२७ नवीन व १०१ मुदतवाढ प्रकरणे आहेत.

महामंडळाने सहकार्य विस्तारासाठी काही योजना आखल्या असून त्यात जास्तीत जास्त दिव्यांग व्यक्तींचा आर्थिक समावेश व्हावा असा विचार आहे.

**बॅकएंड अनुदान योजना-** महामंडळाने रोजगार मंत्रालयाशी वितार विनिमय करून दिव्यांग व्यक्तींसाठी एनएचएफडीसी अंतर्गत अनुदान देण्याचे ठरवले आहे. यात दिव्यांग व्यक्तींना ३५ टक्के कर्ज बॅकएंड अनुदान म्हणून उपलब्ध होऊ शकते अर्थात ही योजना अजून सरकारने मंजूर केलेली नाही.

**बँकांशी सहकार्यातून योजना-** एनएचएफडीसी या संस्थेने विविध बँकांशी करार करणे सुरू केले आहे त्यातून संबंधित बँका दिव्यांग किंवा शारीरिक अक्षम व्यक्तींना कर्ज देतील. एनएचएफडीसीने आधीच पंजाब नॅशनल बँक, आंध्र बँक, आयडीबीआय बँक, बँक ऑफ बडोदा, स्टेट बँक ऑफ हैदराबाद यांच्याशी करार केले आहेत. सरकारी बँकांशिवाय एनएचएफडीसीने अठरा प्रादेशिक ग्रामीण बँकांशी करार केला असून त्यात उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, उत्तराखंड, गुजरात, हरयाणा, महाराष्ट्र व आसाम या राज्यांचा समावेश आहे.

एनबीएफसी व एमएफआय यांच्याशी करार- एनबीएफसी व एमएफआय हे दिव्यांग व्यक्तींना दूरस्थ ग्रामीण व आतापर्यंत ज्यांच्याकडे लक्ष दिले गेले नाही अशा शहरी भागात मदत करू शकतात. एनएचएफडीसीने रिझर्व बँकेला काही निकष शिथिल करण्यास सांगितले आहे त्यामुळे एनबीएफसी व एमएफआय यांच्या सहकार्यातून दिव्यांग

व्यक्तींच्या संस्थांना सवलतीच्या दरात कर्ज मिळू शकते.

दिव्यांग व्यक्तींसाठी जॉब पोर्टल- एनएचएफडीसीने रोजगार मंत्रालयाशी सल्लामसलत केली असून दिव्यांग व्यक्तींना नोकऱ्या देण्यासाठी जॉब पोर्टल सुरू केले आहे. त्यात नोकऱ्या, स्वरोजगार कर्ज, शिक्षण कर्ज, मोफत कौशल्य प्रशिक्षण या सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध केल्या आहेत. हे जॉब पोर्टल केंद्रीय सामाजिक न्याय व रोजगार मंत्र्यांच्या हस्ते २७ जानेवारी २०१६ रोजी सुरू करण्यात आले. दिव्यांग व्यक्तींना आर्थिक समावेशकतेत आणण्यासाठी आर्थिक रचनेत त्यांना सहज स्थान मिळवून दिले आहे. विविध आर्थिक सेवा त्यांना सहजगत्या उपलब्ध करून दिल्या आहेत. भारत सरकारने अनेक महत्वाचे निर्णय दिव्यांग किंवा शारीरिक अक्षम व्यक्तींच्या फायद्यासाठी घेतले आहेत, त्यातून त्यांना आगामी काळात आर्थिक समावेशकतेचा लाभ होईल, त्यांचे एकूणच कल्याण साधले जाईल त्यात दिव्यांग रोजगार विभागाचा मोठा वाटा आहे.

- दिव्यांग व्यक्तींना अग्रक्रमाच्या कर्जात बँकांकडून १० टक्के कमकुवत गट लक्ष्य उद्दिष्टात कर्ज देण्याकरिता समाविष्ट केले आहे.
- दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबन आरोग्य योजनेत वर्षाला साडेतीनशे रूपयाच्या वर्गणीतून सामावून घेतले आहे.
- पदवी व पदव्युत्तर तसेच इतरही शिष्यवृत्त्याची योजना आहे.
- उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिल्या आहेत.
- 'ॲक्सेसेबल इंडिया' योजना सुरू केली आहे.
- दिव्यांग व्यक्तींना कौशल्य प्रशिक्षणासाठी राष्ट्रीय कृती योजना सुरू केली आहे.

■■■

*लेखक राष्ट्रीय अपंग आर्थिक व विकास महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक आहेत.*

*e-mail:das.pcd pareshchandra@gmail.com*

## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :

**Yojana** : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ____________________ date ____________

Name (in block letters) : ____________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ____________________

Phone No. / email : ____________________

PIN : ☐☐☐☐☐☐

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफटद्वारे पाठवावे,**

**अथवा** www.bharatkosh.gov.in/product **येथे ऑनलाईन भरावे.**

## प्रकाशन विभागाची नवी पुस्तके

१. वर्ल्ड ऑफ थिन फिल्म कोटिंग्स (इंग्रजी)
₹ ९०/-

२. तिलक का मुकदमा (हिंदी)
₹ ३३५/-

३. राजभाषा (हिंदी)
₹ १००/-

१. एक देश एक हृदय (हिंदी)

२. उपभोक्ता संरक्षण (हिंदी)

३. पर्यावरण संरक्षण : चुनौतिया और समाधान


## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठवितांना लेखकांनी UNICODE (Mangal) or KRUTI DEV या फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत,

हे नम्र आवाहन.


Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.


Subscribe Online NOW
YOJANA
योजना
Log on to
http://publicationsdivision.nic.in/,
in collaboration with bharatkosh.gov.in


Publications Division
Ministry of Information and Broadcasting
Government of India
website: publicationsdivision.nic.in
Prestigious
INDIA 2016
Reference Annual
now
available
ONLINE
Buy at flipkart
www.flipkart.com
Buy eBooks at kobo
www.kobo.com

# कर्णबधीरता: लोकगीतातून जनजागृती

डॉ. त्र्यंबक दुनबळे



***कर्णबधीरता या अपंगत्वाविषयी अनेक गैरसमज आहेत. प्रसार माध्यमे सामाजिक बदलाची साधने आहेत, हे लक्षात घेऊन 'अली यावर जंग राष्ट्रीय श्रवण विकलांग संस्थान, मुंबई' आधुनिक व पारंपरिक माध्यमांचा जन जागृतीसाठी अतिशय प्रभावी उपयोग करीत आहे. संस्थेने त्यासाठी विविध प्रकारची छापील व दृक श्राव्य सामुग्री तयार केली आहे. जन जागृतीसाठी सामग्री बनविताना संस्थेने विविध प्रयोग केले आहेत. त्यामध्ये मराठी लोकगीतांचा उपयोग खूपच प्रभावी ठरला आहे. जन जागृतीसाठी महत्वाचे योगदान देणाऱ्या या अनोख्या विषयावर टाकलेला हा प्रकाश.***

कर्णबधीरता हे एक छुपे अपंगत्व आहे. प्रत्यक्ष संपर्कात आल्याशिवाय ते कळत नाही. त्यामुळे या अपंगत्वाविषयी अनेक गैरसमज आहेत. हे गैरसमज दूर करून लोकांना उपचाराला प्रवृत्त करणे एक आव्हानात्मक काम आहे. प्रसार माध्यमे सामाजिक बदलाची साधने आहेत. त्यांचा समाज मनावर प्रभाव असतो, हे लक्षात घेऊन 'अली यावर जंग राष्ट्रीय श्रवण विकलांग संस्थान, मुंबई' ने (भारत सरकार, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय) आधुनिक व पारंपरिक माध्यमांचा जन जागृतीसाठी अतिशय प्रभावी उपयोग केलेला दिसून येतो. संस्थेने त्यासाठी विविध प्रकारची छापील व दृक श्राव्य सामुग्री तयार केली आहे. छापील साहित्यात हस्त पत्रिका, पुस्तिका, पोस्टर आदि सुमारे ९५ प्रकारची सामग्री आहे. तर दृक श्राव्य सामग्रीत अनेक लघुपट व रेडियो कार्यक्रमाचा समावेश आहे. संस्थेने ही सामग्री तयार करण्याबरोबरच विविध माध्यमातून त्यांचे वितरण केले आहे. गेल्या दहा वर्षात सुमारे आठ लाख पेक्षा अधिक सामग्रीचे वितरण केले आहे. जन जागृतीसाठी सामग्री बनविताना संस्थेने विविध प्रयोग केले आहेत. त्यामध्ये मराठी लोकगीतांचा उपयोग खूपच प्रभावी ठरला आहे. ओवी, अभंग, लावणी, भारुड, फटका, कीर्तन, मनाचे श्लोक, पोवाडा अशा विविध स्वरुपात ही लोकगीते तयार करण्यात आली. लोकगीते तयार करताना त्यांच्या मूळ साज व बाज यांना धक्का लागणार नाही याची काळजी घेत केवळ शब्द बदलून या रचना करण्यात आल्या आहेत. साधे सोपे शब्द, ताल व सूरांची जन मानसाला असलेली ओळख आणि त्याला दृक व श्राव्य माध्यमांची योग्य जोड दिल्याने ही लोकगीते जन जागृतीसाठी मैलाची दगड ठरली.

**कानाने बहिरा मुका परी नाही -** 'कानाने बहिरा मुका परी नाही' हे गीत आज ही अनेकांना आठवते. मुंबई दूरदर्शनच्या माध्यमातून काही वर्षापूर्वी हे गीत घराघरात पोहचण्यास मदत झाली. कानाला श्रवण यंत्र लावलेला व फुलाशी खेळणारा एक गोंडस मुलगा असलेली चित्रफीत सर्वांच्या आकर्षणाचे केंद्र बनली होती. त्यातील गाणे कित्येकांच्या मनात घर करून गेले होते. साहजिकच या गीताच्या माध्यमातून बहिरी व्यक्ति मुक नसते. ती बोलू शकते हा संदेश जन मनात पोहचविण्याचे महत्वाचे काम झाले. कर्णबधिर व्यक्तीच्या कानात दोष असतो. वाचा इंद्रियात नसतो. त्याचे कारण बोलण्याबरोबरच चघळणे, गिळणे, या क्रियासाठी आपण तोंडाचा उपयोग

करतो. जर वाचा इंद्रियात दोष असेल तर मग या क्रिया करतांना त्रास होतो. पण तसे होत नाही. त्याचे कारण जो काही दोष आहे तो ऐकण्याचा आहे. श्रवण दोषामुळे ऐकू येत नाही. साहजिकच शब्द कानावर न पडल्याने बोलता येत नाही. पण योग्य व वेळेवर उपचार केले तर या श्रवण दोषावर मात करता येते, हे या गीतातून सामान्य माणसाला सहज उमगेल. साहजिकच हजारो लोक श्रवण, वाक व भाषा दोषावर उपचार करायला प्रवृत्त झाले. एका साध्या सरळ गीताने ही किमया केली आहे.

**बाळ तुझा का बोलेना - (ओवी):**

या लोकप्रिय गीताबरोबरच ही ओवी पहा. आपल्या सर्वांच्याच आवडीचा हा गीतप्रकार. आम्ही तयार केलेल्या लोकगीतात एक महिला आपल्या शेजारणीला तिच्या मुलाला श्रवण दोष निदान व उपचारासाठी डॉक्टरकडे नेण्यास कसे प्रवृत करते हे सांगितले आहे. ती महिला म्हणते,

माझ्या सख्या शेजारणी । तुझ्या घरात पाळणा ।

त्यात खेळे आनंदाने । गोजिरा ग बाळ तान्हा ?

माझ्या ग शेजी बाई । बाळ तुझा का बोलेना ।

हाका मारीशी केव्हाची । परी कोणी न पाहिना ?

सखे माझा शेजारणी । ठेव नजर बारीक ।

कधी ऐकतो, कधी नाही । ध्यान ठेवी सांग नीट ।।

काय सांगतेस, सये । बडबड बाळाची थांबली ।

मांगताना दूध पाणी । मुखी त्याच्या नाही वाणी ।।

माझ्या ग शेजी बाई । मन माझे ग साशंक ।।

येते मणी काही बाई । नको रागाऊ मनात ।

करी लगबग आता । हवी करया मसलात ।।

येते मी तुझ्या संगे । जाऊ आपण केंद्रात ।

तेथे डॉक्टर येतात । घेऊ कान तपासून ।

होऊ नको कासावीस । चूक नाही ग कोणाची ।।

पण केवळ डॉक्टरकडे जाणे पुरेसे नाही. तपासणीत बाळाला श्रवण दोष आढळला. त्यावर उपचार सुरू झाले. त्याला श्रवण यंत्र लावले. पण त्याच्या भाषा विकासासाठी पालकांची मदत लागते. श्रवण यंत्राच्या मदतीने बाळ आवाज ऐकू शकते. पण भाषा शिकवावी लागते. पुन्हा शेजारिण मदतीला येते. ती म्हणते,

नको करू त्याला खुणा । सांग शब्दच वस्तूंना ।

काउ चिऊच्या गोष्टी । सांग बसत त्याला ।।

माझ्या ग शेजारणी । नेईल त्याला ग बाहेर ।

सांजवेळी कधी मधी । नेऊ त्याला ग बागेत ।।

आता नाव घालू त्याचे । पारावरच्या शाळेत ।

पाहिलं चार मुले दुसरी । वागू लागेल शिस्तीत ।।

किंवा नको बांधू तो ताईत । कशाला ग गंडादोरा।

जाता येता बाळाशी बोलायचा । हवा छंद घरदारा ।।

लावताना कानी यंत्र । दाखविले शब्द तंत्र ।

आण बाई त्याचा आता लिही तेथे पत्र ।।

**कानाची काळजी (मनाचे श्लोक):** कानातून पाणी येणे , पू येणे म्हणजे कान फुटणे, आपल्याकडे अगदी सामान्य आहे. त्याची अनेक करणे आहेत. कानाची काळजी न घेणे हे त्याचे एक प्रमुख कारण आहे. कानातून श्राव वाहने म्हणजे बहिरेपणाला निमंत्रण असते. पण बहुतेक पालक याकडे कानाडोळा करतात. कानाची काळजी कशी घ्यायची , हे मग आम्ही मनाच्या श्लोकातून लोकांना सांगितले.

दिले देवरया आम्हा दोन कान , त्याचा आम्ही राखतो आज मान

नको आभूषणे कसलीही त्याला, निगा नीट ठेवा कशी ते पाहा

नसे तेल पाण्याची तयांना गरज , उगा रूढ आहे चुकीचा समज

नका घालू काड्या आणि पींना , फाटेल पडदा ध्यानात घ्याना

मऊ कापसाचा लाऊन बोळा, हळुवार हाते साफ करा

नका कान देऊ कुणाच्याही हाती , अडाणीपणाचा दोष येईल माथी

**आवाजाची काळजी (फटका):** ऐकणे आणि बोलणे ही निसर्गाने मानवाला दिलेली मोठी देणगी आहे. आपले बोलणे हे ऐकण्यावरच अवलंबून असते. पण याबाबत आपण सर्वजण अत्यंत दुर्लक्ष करतो. विशेष करून आवाजाच्या बाबतीत काळजी न घेतल्यास वाणी दोषाचा फटका बसू शकतो. यासाठी आवाजाची काळजी काशी घ्यायची, हे फटका या लोकगीत प्रकारातून सांगितले आहे.

उतू नको मातू नको आणि घेतला वसा टाकू नको

दिला देवाने सुर तुला रे उगाच त्याला बिघडू नको

कधी कोणावर ओरडू नको , घसा सारखा खाकरून नको

दिला देवाने सुर तुला रे उगाच त्याला बिघडू नको

विमान गाडी पाहूनशनी , नक्कल त्याची करू नको

दिला देवाने सुर तुला रे उगाच त्याला बिघडू नको

पान तंबाखू खाऊ नको , दारू ताडी पिऊ नको

बोल बोलता हळू बोलावे , गपकन श्वास घेऊ नको

दिला देवाने सुर तुला रे उगाच त्याला बिघडू नको

**मेलो मेलो, बहिरा झालो (भारुड):**

अशा अनेक लोकगीत प्रकारातून लोकांना बहिरेपणा या विषयावर जागे करण्याचा प्रयत्न केला. लोकगीत म्हटले की भारुड विसरून कसे चालेल. एकनाथाचे विंचू चावला हे भारुड सर्वांचेच आवडते व परिचयाचे. चटकन समजणारे व उपरोधिक भाषेत असल्याने कान उघडणी देखील करणारे. कानाची निगा कशी राखावी यासाठी आम्ही मग हे भारुड रचले.

मेलो मेलो , गत प्राण झालो

मेलो मेलो , बहिरा झालो

साथीदार : अरे झालं तरी काय

मुख्य गायक : कर्ण रोग झाला

कर्णस्राव झाला, त्यावर इलाज नाही केला

अन बाबा मी बहिरा झालो

आता मी बहिरा झालो

मुखी गायक : एका जनार्दनी सांगतो ऐका

कानाची निगा उत्तम रखा

त्याने व्हावे सुखी सर्वदा

अशी मग अनेक लोकगीते मनातून रुजत गेली. कुठे गवळण तर कुठे फटका, कधी पोवाडा तर कधी भारुड जन प्रबोधनासाठी कामी आले. मनोरंजन आणि प्रबोधन यांचा मेळ साधल्याने जन जागृतीच्या मोहिमेला गती आली. माध्यमाबरोबर त्याचे स्वरूप बदलत गेले. तसे कॅसेट, सीडी, डीव्हीडी, लघुपटाच्या स्वरुपात ही गीते लोकांच्या मनातील गैरसमज व अज्ञानाचा अंधकार दूर करायला मदत करीत राहिली. गेले दोन दशके प्रकाश दाखविण्याचे काम या गीतातील शब्द करीत आहेत.

■■■

*लेखक अली यावर जंग राष्ट्रीय श्रवण विकलांग संस्थान, मुंबई येथे जन माध्यम प्रसारण अधिकारी आहेत.*

*email: dr.trimbakdunbale@gmail.com*

## आगामी अंक

**जून २०१६**

**'भारताची आश्वासक वाटचाल'**

## प्रकाशन विभागाची नवी पुस्तके

१. **छत्रपती शिवाजी महाराज (हिंदी) ₹ ९५/-**

## अन्य काही पुस्तके

१. **भारतेंदू हरिश्चंद्र (हिंदी) ₹ ११०/-**

२. **आपला राष्ट्रीय ध्वज (मराठी) ₹ ११०/-**

## सूचना

वाचकांना विनंती आहे की, त्यांनी योजना मासिका संबंधीत अभिप्राय योजना कार्यालय:- 'बी' विंग, केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर - ४००६१४ या पत्त्यावर पाठवावे. अभिप्राय सूचनांचे नेहमीच स्वागत असेल.

# ईशान्येकडील आंतरराष्ट्रीय इंटरनेट प्रवेशद्वार



बांगलादेश सबमरीन कंपनी लिमिटेडमार्फत सेवा मिळवून देशात दूरसंचार क्षमता सुधारण्यासाठी सरकारने आगरताळा इथे आंतरराष्ट्रीय इंटरनेट मार्गिका (आयआयजी) स्थापन केली. आंतरराष्ट्रीय इंटरनेट गेटवेची औपचारिक सुरुवात झाल्यानंतर मुंबई व चेन्नई पाठोपाठ त्रिपुराचा देशात तिसरा क्रमांक लागेल. सगळ्या ईशान्य राज्यांना या इंटरनेट गेटवेचा फायदा होणार आहे. ईशान्य प्रदेशासाठी असलेल्या ५३३६.१८ कोटींच्या सर्वसमावेशक दूरसंचार विकास योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. यामध्ये अरुणाचल प्रदेश आणि आसाममधील दोन जिल्हे आणि इतर ईशान्य राज्ये यांच्यामधील मोबाईल जोडणी आणि सर्व राष्ट्रीय महामार्गांवर सलग मोबाईल जोडणी आणि जिल्हावार ऑप्टीकल फायबर जोडणीमध्ये वाढ करणे हे सर्व मार्च २०१८ पर्यंत पूर्ण करण्याची योजना आहे.

**पोशाख आणि वस्त्र निर्मिती केंद्र दिमापूर, नागालँड**

दिमापूर, नागालँड इथे पोषाख व वस्त्र निर्मिती केंद्राचे अनावरण करण्यात आले. या उपक्रमांतर्गत स्थानिक तरुणांमार्फत पोषाख उत्पादनातील उद्योजकता वाढवणे व स्थानिक लोकांना इथल्या केंद्रांवर रोजगार उपलब्ध केले जाणार आहेत. नागालँड सरकार व उद्योजक दोघांच्या मदतीने हे केंद्र विक्रमी एका वर्षा पेक्षा थोड्याच अधिक कालावधीत सुरू झाले.

ईशान्य राज्यातील पोषाख व वस्त्र निर्मिती केंद्र म्हणजे वस्त्र उद्योगातील भारत सरकारने उचललेले एक महत्त्वाकांक्षी पाऊल म्हणता येईल, ईशान्य भारतातील वस्त्र उद्योगाचे चित्र बदलण्याचे सामर्थ्य या क्षेत्रात आहे.

पोषाख उद्योग महसूल निर्मितीत अत्यंत फायद्याचा असून संपूर्ण वस्त्र मूल्य साखळीत रोजगाराची भर घालणारी आहे. ही पोषाख केंद्रे लहान असली तरीही त्यामुळे कापड व वस्त्रोद्योगाच्या एकूण निर्यातीत, निर्यात वाढवण्यासाठीचे एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

कोबलाँग, मोकोकचुंग इथे मुगा पी३ बियाणे केंद्राची आधारशिला रचली आणि महिला सशक्तीकरण व कोहिमातील शाश्वत जीवनासाठी ईशान्य प्रदेश वस्त्र प्रसार योजनेखाली नव्याने मान्यता मिळालेल्या एकात्म एरी सिल्क विकास उपक्रमाचा आरंभ झाला.

रेशमाचा दर्जा आणि त्याचा प्रसार या दोन्हींत नागालँड निर्विवाद आघाडीवर आहे. गेल्या दोन वर्षात रेशीम उत्पादनाला चालना मिळण्यासाठी रेशमाच्या एरी, मुगा व मलबरी या तीनही प्रकाराच्या रेशमाला, लागवडीपासून निर्मितीपश्चात जाहिरातपर्यंत, वस्त्र मंत्रालयाने केंद्र सरकारच्या मदतीने १०१.२५ कोटींचे तीन मोठे रेशीम उत्पादन उपक्रम नागालँडला मंजूर करून दिले. या उपक्रमातून जवळपास ५ हजार शेतकरी एरी, मुगा, मलबरी रेशमाच्या लागवडीत उतरले असून त्यामुळे विविध मार्गांद्वारे रेशमाचा गुणात्मक दर्जा तीन पटीने वाढवता आला.

## आपल्याला माहित आहे का?

# इंचवॉन धोरण

इंचवॉन धोरण म्हणजे आशियायी व पॅसिफिक प्रदेश, व जगातील अपंगांना समाजात अडथळा मुक्तकरून एका दशकात त्यांच्या हक्कांची सुनिश्चिती करणे. या धोरणामध्ये अपंगत्व - समावेशक विकास उद्दिष्टे पहिल्यांदाच प्रादेशिक पातळीवर मान्य करण्यात आली. आशियायी व पॅसिफिकसाठी असलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक व सामाजिक आयोगाचे मंत्री व सदस्य राष्ट्रांच्या प्रतिनिधींच्या बैठकीत या धोरणाला स्वीकारण्यात आले. कोरिया प्रजासत्ताक, इंचवॉन इथे २९ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०१२, या दरम्यान ही बैठक भरवण्यात आली होती.



इंचवॉन धोरण हे नाव दशक कार्य आराखड्याशी संबंधित असून बैठकीच्या ठिकाणावरून ते घेण्यात आले. या धोरणातील उद्दिष्टे आशिया व पॅसिफिक प्रदेशातील जीवनमानाचा दर्जा सुधारण्यावर लक्ष ठेवू शकतील, व बरेचसे आयुष्य गरीबीत जगत असणाऱ्या ६५० दशलक्ष दिव्यांग अपंग लोकांच्या हक्कांची परिपूर्ती याद्वारे करता येईल. हे धोरण २०१३ ते २०२२ या दशकासाठी राबवण्यात येत असून त्यात १० उद्दिष्टे व २७ लक्ष्ये आहेत व प्रगती मोजण्यासाठी ६२ मानके आहेत. इंचवॉन धोरणामध्ये सरकारने सगळ्या प्रकारचे अपंगत्व असलेल्या व्यक्तींची माहिती गोळा करणे आवश्यक आहे, शिवाय यात आणखी कशाची भर घालता येईल याचाही विचार होणे गरजेचे आहे.

दिव्यांग व्यक्तींना सन्मानाची वागणूक मिळावी, त्यांना त्यांचे स्वत:चे पर्याय उपलब्ध असावेत, त्यांच्याशी भेदभाव केला जाऊ नये, आणि त्यांना इतरांप्रमाणेच समाजात सहभागी होता यावे ही इंचवॉन धोरणाची मुख्य कल्पना आहे.

धोरणाच्या उपलब्धतेच्या १० उद्दिष्टांपैकी पहिले उद्दिष्ट - गरिबी कमी करणे, काम आणि रोजगाराच्या संधी वाढवणे, दुसरे उद्दिष्ट - राजकारणातील सहभाग आणि निर्णय क्षमतेला प्रोत्साहन देणे, उद्दिष्ट तिसरे - भौतिक वातावरण, सार्वजनिक वाहतूक, ज्ञान, माहिती व जनसंपर्क उपलब्ध करून देणे, चौथे उद्दिष्ट -सुरक्षेचे सशक्तीकरण करणे, उद्दिष्ट पाचवे -विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कक्षा रुंदावणे, सहावे उद्दिष्ट - लिंग समानता व महिला सक्षमीकरण करणे, उद्दिष्ट सातवे - अपंगत्व समावेशक आपत्ती जोखीम कमी करणे आणि व्यवस्थापनाची खात्री करणे, उद्दिष्ट आठवे - अपंगत्व माहितीचे अवलंबित्व आणि तुलनीयता यात सुधारणा करणे, उद्दिष्ट नववे -व्यक्तींच्या हक्कांच्या अंमलबजावणी निर्णयाला गती देणे, उद्दिष्ट १० - उपप्रादेशिक, प्रादेशिक आणि आंतरप्रादेशिक सहकार्यात पुढाकार.


PUBLICATIONS DIVISION
website: publicationsdivision.nic.in
Some Prestigious Titles Now Available Online
• India 2016 (also available as eBook)
• Bharat 2016 (also available as eBook)
• Legends of Indian Silver Screen (also available as eBook)
• Abode Under The Dome
• Winged Wonders of Rashtrapati Bhavan
• Right of The Line : The President's Bodyguard
• Indra Dhanush
• The Presidential Retreats of India
• Rashtrapati Bhawan
• Belief In The Ballot (also available as eBook)
• Gandhi : Jeevan Aur Darshan (hindi)
• 1857 The Uprising
• Sardar Patel-Sachitra Jeevni(hindi) (also available as eBook)
• Sardar Patel - A Pictorial Biography (also available as eBook)
• Basohli Painting
• Kangra Painting
• Indian Women : Contemporary Essays
• Bharat Ki Ekta Ka Nirman (hindi) (also available as eBook)
• Yuva Sanyasi (hindi)
• Gazetteer of India Vol.2
• The Geet Govinda of Shri Jaydev
• Who's Who of Indian Martyrs (Vol-I)
• Who's Who of Indian Martyrs (Vol-II)
• Saga of Valour
• Some Aspects of Indian Culture
• Art & Science of Playing Tabla (also available as eBook)
• Indian Classical Dance
• Celebration of Life : Indian Folk Dance
• Nataraja
• Bengali Theatre: 200 Years (also available as eBook)
• Bihari Satsai (hindi)
• Bihari Satsai - A Commentary
• Eye In Art
• Looking Again At Indian Art
• The Life of Krishna In Indian Art
• Pahari Painting of Nala Damayanti Theme
• Ajanta Ka Vaibhav (hindi)
• Bharatiya Kala - Udhbhav Aur Vikas (hindi)
• Bharatiya Chitrakala Main Sangeet Tatva (hindi)
• South Indian Paintings
• Garhwal Chitrakala (hindi)
• A Moment In Time
• Samay, Cinema Aur Itihas (hindi)
• Indian Cinema Through The Century
• Bharatiya Cinema Ka Safarnama (hindi)
• A History of Socialism
• Lamps of India
• Bharat Ke Durg (hindi)
• Wood Carving of Gujarat
• Lawns And Gardens
• Paryavaran Sanrakshan : Chunotiyan Aur Samadhan (hindi)
eBooks
• Lokmanya Bal Gangadhar Tilak
• The Gospel of Buddha
• Introduction To Indian Music
• Sardar Vallabhbhai Patel
• Sardar Vallabhbhai Patel (Adhunik Bharat Ke Nirmata Series)
• Lauh Purush Sardar Patel
• Aise They Bapu
• Mahatama Gandhi -A Pictorial Biography
• Gandhi In Champaran
• Mahatma Gandhi And One World
Printed Books available at flipkart.com
eBooks at kobo.com

# शेतीचा विकास आणि सामुदायिक रेडीओची भूमिका

अश्विनी कांबळे




***आजकाल वृत्तवाहिन्या बातम्या कशा निवडतात, कोणत्या मुद्द्यांवर चर्चा घडवली जाते हा स्वतंत्र लेखाचा विषय होऊ शकतो. तर अशा वातावरणात, सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यात म्हसवड इथला माणदेशी तरंग हा सामुदायिक रेडीओ शेतकऱ्यांसाठी जे काम करत आहे, त्याची नोंद घेणे आवश्यक वाटते. 'माण तालुका दुष्काळग्रस्त आहे, तरी इथला शेतकरी, इथला माणूस आत्महत्या करत नाही' ही एका वयाची साठी ओलांडलेल्या, इस्त्रीकाम काम करणाऱ्या बाबांची टिप्पणी खूप बोलकी आहे. अशा भागात काम करणाऱ्या एकमेव सामुदायिक रेडीओ माणदेशी तरंगची ओळख करून देण्याचा हा प्रयत्न.***

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या सध्याच्या अवस्थेबद्दल मुख्य प्रवाहातील माध्यमातून खूप काही बोललं-लिहिलं जात आहे. पण काही अपवाद वगळता कोणतेही वर्तमानपत्र किंवा वृत्तवाहिनी शेती हा मुद्दा सतत लावून धरत नाही. शेतीवर आधारित कार्यक्रमांवर भर दिला जात नाही. आजकाल वृत्तवाहिन्या बातम्या कशा निवडतात, कोणत्या मुद्द्यांवर चर्चा घडवली जाते हा स्वतंत्र लेखाचा विषय होऊ शकतो. तर अशा वातावरणात, सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यात म्हसवड इथला माणदेशी तरंग हा सामुदायिक रेडीओ शेतकऱ्यांसाठी जे काम करत आहे, त्याची नोंद घेणे आवश्यक वाटते. 'माण तालुका दुष्काळग्रस्त आहे, तरी इथला शेतकरी, इथला माणूस आत्महत्या करत नाही' ही एका वयाची साठी ओलांडलेल्या, इस्त्रीकाम काम करणाय्रा बाबांची टिप्पणी खूप बोलकी आहे. अशा भागात काम करणाऱ्या एकमेव सामुदायिक रेडीओ माणदेशी तरंगची ओळख करून देण्याचा हा प्रयत्न.

**सामुदायिक रेडीओ म्हणजे काय?**

१९९५ साली सर्वोच्च न्यायालयाने 'रेडीओ तरंग ही कोणाचीही खाजगी मालमत्ता नाही' असा निर्णय देऊन रेडीओला सरकारच्या बंधांतून मुक्त केलं. त्यातूनचं पुढे खाजगी रेडीओचा उदय झाला. रेडीओ तरंगांचा लिलाव सुरु झाला. पण त्याचा हेतू फक्त व्यवसाय आणि नफा मिळवणे हा होता. रेडीओ या माध्यमाची ताकद लक्षात घेता त्याचा अजून योग्यप्रकारे वापर करण्यासाठी सामुदायिक रेडीओ या संकल्पनेचा उदय झाला. २००२ पासून सरकारी अटी पूर्ण करून कोणतीची एनजीओ किंवा शैक्षणिक संस्था किंवा कृषी विज्ञान केंद्र रेडीओ सुरु करू शकते. या रेडीओची खासियत म्हणजे कमी टप्पा, लोकसहभाग आणि सामुयिक मालकी. जास्तीत जास्त १०-१५ किलोमीटरपर्यंतच हा रेडिओ ऐकला जाऊ शकतो. ज्या भागात तो रेडिओ कार्यरत आहे, तिथल्या लोकांच्या सहभागातून किमान ५०% कार्यक्रम निर्मिती झाली पाहिजे आणि तिसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे समूहाची मालकी. म्हणजे लोकांचा लोकांनी लोकांसाठी चालविलेला रेडीओ म्हणजे सामुदायिक रेडीओ. लोकशाही तत्त्वानुसार चालणारे, अत्यंत कमी गुंतवणुकीतून सुरु होणारे हे माध्यम विकासास हातभार लावू शकते.

**माणदेशी तरंग:**

चेतना गाला-सिन्हा यांच्या माणदेशी फौंडेशन या माण तालुक्यात काम

करणाऱ्या संस्थेतर्फे माणदेशी तरंग रेडीओ सुरु केला गेला आहे. शिवाजी यादव हे या रेडीओचे कार्यक्रम संचालक आहेत तर सचिन मेनकुदळे हे मुख्य तंत्रज्ञ असून जनसंपर्काचे काम सांभाळतात. अनुप फुसके आणि अनुजा कुलकर्णी हे निवेदक, तंत्र सहाय्यक म्हणून काम पाहतात. २००८ मध्ये सुरु झालेला हा रेडीओ म्हसवड आणि आसपासच्या गावांमध्ये बराच लोकप्रिय आहे.

**कार्यक्रम :**

माणदेशी तरंगचे कार्यक्रम सकाळी ७ ते १० आणि संध्याकाळी ६ ते ९ या वेळेत ऐकता येतात. याशिवाय दुपारी १२.३० ते २.३० या वेळेत महिलांसाठी विशेष कार्यक्रम सादर केले जातात. चिंतन-पंचांग-दिनविशेष व्यतिरिक्त मुख्य कार्यक्रम खालीलप्रमाणे:

माळावरचे शिवार: या कार्यक्रमात शेतकयांच्या मुलाखती, शेती विषयक मार्गदर्शन, पशुधन, शेतीतील नवे तंत्रज्ञान याविषयी माहिती सांगितली जाते. प्रत्यक्ष शेतावर जाऊन शेतकऱ्यांच्या मुलाखती घेतल्या जातात.

सखी साजणी: यशस्वी महिला, त्यांचे प्रयत्न, घरगुती उद्योग मार्गदर्शन, छंदाची जोपासना, पाककला, त्यांच्या कलागुणांना वाव अशा प्रकारचे महिलांच्या सहभागातून कार्यक्रम सादर केले जातात.

गंमत-जंमत: हा लहान मुलांसाठी असणारा कार्यक्रम. मुलांच्या कथा, बालगीते, नाटिका, त्यांच्यासाठी बोधकथा वगैरे गोष्टी यात सादर केल्या जातात.

तरुणाई: भागातील तरुणांसाठी असणारा हा कार्यक्रम. यात व्यवसाय संधी, स्पर्श परीक्षा मार्गदर्शन, व्यक्तिमत्त्व विकास, आणि त्याच्या कलागुणांना वाव देणारे कार्यक्रम केले जातात.


रेडीओ डॉक्टर: तज्ञांच्या मुलाखती, आरोग्य विषयक मार्गदर्शन, आहार मार्गदर्शन, ऋतूनुसार घ्यावयाची काळजी असे माहितीपूर्ण कार्यक्रम लोकांसाठी तयार केले जातात.

प्रासंगिक: वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळे कार्यक्रम सादर केले जातात. यामध्ये, यात्रा-जत्रा, महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी, विशेष दिन याबद्दल कार्यक्रम केले जातात.

हे सगळे कार्यक्रम लोक सहभागातून, लोकांच्या माहितीसाठी तयार केले जातात. वरील कार्यक्रमांची नोंद घेतली तर शेतीवर आधारित अनेक कार्यक्रम दररोज सादर केले जातात.

***सरकारी अनुदान, कृषी प्रदर्शन, नवीन बी-बियाणे, नैसर्गिक खते, कीटकनाशकांचा वापर या बद्दल माहिती देणारे कार्यक्रम शेतकऱ्यांच्या मागणीनुसार केले जातात. प्रत्यक्ष भेटून, पत्र पाठवून किंवा फोनवरून शेतकरी त्यांच्या मागण्या नोंदवतात. पारंपारिक पीक घेऊन भरघोस उत्पन्न मिळवणाऱ्या, शेतीत प्रयोग करून उत्पन्न घेणाऱ्या आणि शेतीत नवीन तंत्रज्ञानाचा वापर केलेल्या शेतकऱ्यांच्या त्यांच्या शेतावर जाऊन मुलाखती घेतल्या जातात. त्यातून इतर शेतकऱ्यांना प्रेरणा मिळेल असे त्याचे सादरीकरण केले जाते. कृषी अधिकारी, कृषी विद्यापीठातील तज्ञ, शास्त्रज्ञ यांच्या फोन वरून मुलाखती घेऊन त्यातून शेतकरी वर्गाला माहिती दिली जाते.***

माणदेशी तरंग ज्या भागात ऐकला जातो तिथं पाण्याचे दुर्भिक्ष जाणवते. अशा वेळी शेतीबद्दल दरोरज कार्यक्रम करणे आव्हान आहे. तरी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या सहभागातून आणि तज्ञांच्या सहाय्याने माणदेशी रेडीओला हे शक्य होतं. माणदेशी रेडीओ शेतकऱ्यांना कशावर कार्यक्रम ऐकायचे आहेत याची वेळोवेळी चाचपणी करत असते. मागणी नुसार माहितीचा पुरवठा गेला जातो.



**माणदेशी तरंग आणि शेती :**

आरोग्य, शेती, ग्रामविकास, शैक्षणिक अशा विविध प्रकारच्या सरकारी योजनांची माहिती माणदेशी रेडिओवरून दिली जाते आणि त्यामुळे जनजागृती होण्यास रेडीओची मदत होते. शेतीबद्दल कार्यक्रम करताना कोणत्या बाबींचा विचार करता असं विचारल्यावर शिवाजी यादव म्हणाले, 'आम्ही मुद्दाम कमी पाण्यावर कोणती पिके कशी घेता येतील याचा विचार करतो. याशिवाय जल संवर्धन, नैसर्गिक शेती, पीक नियोजन आणि पशु व्यवसाय यावर अधिक भर दिला जातो'.

सरकारी अनुदान, कृषी प्रदर्शन, नवीन बी-बियाणे, नैसर्गिक खते, कीटकनाशकांचा वापर या बद्दल माहिती देणारे कार्यक्रम शेतकऱ्यांच्या मागणीनुसार केले जातात. प्रत्यक्ष भेटून, पत्र पाठवून किंवा फोनवरून शेतकरी त्यांच्या मागण्या नोंदवतात. पारंपारिक पीक घेऊन भरघोस उत्पन्न मिळवणाऱ्या, शेतीत प्रयोग करून उत्पन्न घेणाऱ्या आणि शेतीत नवीन तंत्रज्ञानाचा वापर केलेल्या शेतकऱ्यांच्या त्यांच्या शेतावर जाऊन

मुलाखती घेतल्या जातात. त्यातून इतर शेतकऱ्यांना प्रेरणा मिळेल असे त्याचे सादरीकरण केले जाते. कृषी अधिकारी, कृषी विद्यापीठातील तज्ञ, शास्त्रज्ञ यांच्या फोन वरून मुलाखती घेऊन त्यातून शेतकरी वर्गाला माहिती दिली जाते. चांगली माहिती मिळत असेल तर लोकांना ती आवडते याचे उत्तम उदाहरण म्हणजे घरगुती दशपर्णी पशु आहाराची माहिती देणारा कार्यक्रम.

***माणदेशी तरंग मोबाईल तंत्रज्ञानाचा वापरही करत आहेत. माणदेशी तरंगचा व्हॉट्स-ॲप ग्रुप आहे. ज्यावर माण मधील लोक त्यांच्या शंका, प्रश्न विचारू शकतात, व्हिडीओ पाठवू शकतात. त्यामुळे लोकसहभाग वाढला आहे. याच बरोबर शेकरू हे मोबाईल ॲपही माणदेशी तरंग वापरत आहेत. हे ॲप तरुण शिक्षित शेतकऱ्यांमध्ये वापरले जात आहे. सध्या स्मार्ट फोनचा वापर वाढला आहे. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून त्याचा विकासासाठी उपयोग करण्याच्या हेतूने शेतीसंदर्भात हे ॲप विकसित केलेले आहे असं सांगण्यात आलं.***

२०१६ हे वर्ष माणदेशी तरंग 'कृषी वर्ष' म्हणून साजरे करत आहे. वर्षभरात विविध शेतकयांना भेट देऊन त्यांच्या शेतातून कार्यक्रमांचे थेट प्रसारण करण्याचा माणदेशी रेडिओच्या लोकांचा बेत आहे. कमी पाण्यात किफायतदार शेती कशी करता याबद्दल जागृती निर्माण करून शेतीला चालना देण्याचा हेतू यामागे आहे. रेडिओच्या माध्यमातून लोकांच्या सहभागातून शेतीसह इतर अनेक बाबतीत




जागृती निर्माण करण्याचे काम माणदेशी तरंग रेडीओ करत आहे. आणि त्यातून त्या भागाच्या विकासाला हातभार लावत आहे.

**नवीन तंत्रज्ञानाचा वापर :**

माणदेशी तरंग मोबाईल तंत्रज्ञानाचा वापरही करत आहेत. माणदेशी तरंगचा व्हॉट्स-ॲप ग्रुप आहे. ज्यावर माण मधील लोक त्यांच्या शंका, प्रश्न विचारू शकतात, व्हिडीओ पाठवू शकतात. त्यामुळे लोकसहभाग वाढला आहे, असं सचिन मेनकुदळे यांचे म्हणणे आहे. याच बरोबर शेकरू हे मोबाईल ॲपही माणदेशी तरंग वापरत आहेत. हे ॲप तरुण शिक्षित शेतकऱ्यांमध्ये वापरले जात आहे असं ही मेनकुदळे यांनी सांगितलं. सध्या स्मार्ट फोनचा वापर वाढला आहे. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून त्याचं विकासासाठी उपयोग करण्याच्या हेतूने शेतीसंदार्भात हे ॲप विकसित केलेले आहे असं सांगण्यात आलं.

कोणत्याही देशाचा, समाजाचा विकास लोकांच्या सहभागाशिवाय शक्य नाही. माध्यमांना लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हंटले जाते पण मुख्य प्रवाहातील माध्यमांची त्यांची भूमिका शंका घेण्यासारखी आहे. अशा वातावरणात माणदेशी तरंग रेडीओ हे माध्यमांनी लोक सहभाग कसा करून घ्यावा याचे उत्तम उहाहरण आहे. शेतीसह संपूर्ण ग्राम विकासासाठी अशा माध्यमांची आवश्यकता आहे. अशा माध्यमांमुळेचं शेतीची सद्यस्थिती बदलेल आणि शेतीला चांगले दिवस येतील.

■■■

*लेखिका भारतीय जनसंचार संस्थान नवी दिल्लीच्या अमरावतीस्थित प्रादेशिक केंद्रात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे.*

*email: ashwini.iimcamravati@gmail.com*

# संशोधन आणि तंत्रज्ञानातील आव्हानांसाठी संयुक्त मोहीम

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस व पॅन आयआयटी यांच्या इम्प्रिंट इंडिया या संयुक्त मोहिमेत अभियांत्रिकी व तंत्रज्ञानातील आव्हाने पेलण्यासाठी एक आराखडा तयार करण्यात येत आहे. भारताशी संबंधित तंत्रज्ञान आव्हाने पेलण्यासाठी इम्प्रिंट इंडिया ही योजना दहा विविध क्षेत्रात काम करणार आहे. या योजनेची सुरूवात करण्यात आली आहे.

या पुढाकारांची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे १) समाजाला कोणत्या नवप्रवर्तनाची किंवा अभिनव तंत्रज्ञानाची गरज आहे याचा शोध घेणे २) शोधून काढलेल्या प्रवर्गात संशोधन करणे ३) या क्षेत्रातील संशोधनाला आर्थिक मदत उपलब्ध करणे ४) संशोधन प्रयत्नांचे फलित जाणून घेताना त्याचा ग्रामीण व शहरी भागातील जीवनावर नेमका काय परिणाम झाला याचा शोध घेणे.

इम्प्रिंट इंडिया ही योजना खालील संस्थांच्या मदतीने विविध क्षेत्रात काम करणार आहे त्यात आयआयटी व इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस या संस्थांचा सहभाग आहे.

१) आरोग्य काळजी- आयआयटी खरगपूर

२) संगणक विज्ञान व आयसीटी - आयआयटी खरगपूर

३) प्रगत पदार्थ- आयआयटी कानपूर

४) जलसंसाधने व नदी व्यवस्था- आयआयटी कानपूर

५) शाश्वत शहरी संरचना - आयआयटी रूडकी

६) संरक्षण- आयआयटी मद्रास

७) उत्पादन- आयआयटी मद्रास

८) नॅनो टेक्नॉलॉजी उपकरणे- आयआयटी बॉम्बे- मुंबई

९) पर्यावरण विज्ञान व हवामान बदल- इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस बंगलोर

१०) ऊर्जा सुरक्षा ( आयआयटी बॉम्बे-मुंबई)

**आयपीव्ही - पोलिओ लशीचा वापर सुरू**

भारताने इंजेक्शनच्या रूपाने द्यावयाची पोलिओ लस शोधून काढली असून ती भारताच्या विविध भागात देण्यास सुरूवात झाली आहे. जागतिक पोलिओ निर्मूलनाचा तो एक भाग आहे. भारत सरकाराने आयपीव्ही म्हणजे शरीरात शीरेद्वारे टोचण्याची पोलिओ लस नेहमीच्या लसीकरण कार्यक्रमात अंतर्भूत केली असून तोंडावाटे देण्याची लसही त्याच्या जोडीला चालू ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे भारतीय मुलांना दुहेरी संरक्षण मिळणार असून पोलिओ निर्मूलनाचे उद्दिष्ट साध्य होणार आहे. पहिल्या टप्प्यात आसाम, गुजरात, पंजाब, बिहार, मध्य प्रदेश व उत्तर प्रदेशात लस उपलब्ध केली जाणार आहे. आयपीव्ही इंजेक्शन एक वर्षाखालील मुलांना दिले जाईल व तिसरी मात्रा (डोस) तोंडावाटे दिला जाईल. लसीकरण मोहिमात ही लस दोन्ही प्रकारे मोफत दिली जाणार आहे. आयपीव्हीमुळे जागतिक आरोग्य सभेच्या मे २०१५ मधील जागतिक पोलिओ निर्मूलन कार्यक्रमाच्या शिफारशीनुसार काम केले जाणार असून उद्दिष्टे साध्य केली जातील.

# राष्ट्रीय बालमजूर प्रकल्प योजना

**धोरण :**

सातव्या पंचवार्षिक योजना काळात १४ ऑगस्ट १९८७ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने राष्ट्रीय बाल मजूर धोरण मंजूर केले. मजुरीस जुंपल्या गेलेल्या बालकांची सुटका केल्यानंतर त्यांचे योग्य पद्धतीने पुनर्वसन करून बालमजुरीच्या घटना रोखण्याचे मुलभूत उद्दिष्ट समोर ठेऊन हे धोरण आखण्यात आले होते. या धोरणात पुढील तीन प्रमुख बाबींचा अंतर्भाव होता:-

- कायदेशीर कृती योजना- मजुरीविषयक विविध कायद्यामध्ये बालमजुरी रोखण्यासाठी असलेल्या विविध तरतुदींची कडक अंमलबजावणी करणे
- विविध विकास योजनांचा लाभ देणे- शक्य असेल त्या प्रत्येक ठिकाणी इतर खाती आणि सरकारी विभागांच्या विविध विकास आणि कल्याणकारी योजनांचा लाभ करून देणे
- प्रकाल्पाधारित कृती कार्यक्रम- जास्त लक्ष देण्याची आवश्यकता असलेल्या भागांमध्ये कामकरी मुलांच्या कल्याणासाठी प्रकल्प सुरु करणे

**उद्दिष्ट:**

भारतात बालमजुरांची संख्या मोठी आहे. साधनांची कमतरता आणि सामाजिक जाणीवांची पातळी पाहून सरकारने दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंत धोकादायक उद्योगामधून बालमजुरी हद्दपार करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. सर्व प्रकारच्या बालमजुरीचे उच्चाटन ही एक प्रक्रिया असून धोकादायक उद्योगापासून तिची सुरुवात करण्यात आली आहे.

**निर्धारित गट :**

योजनेंतर्गत निर्धारित गट १४ वर्षाखालील सर्व मुले जे पुढील क्षेत्रात काम करीत आहेत-

- व्यवसाय आणि प्रक्रिया ज्या बाल मजूर (प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा,१९८६; मध्ये नमूद आहेत आणि/किंवा
- व्यवसाय आणि प्रक्रिया ज्यांचा विपरीत परिणाम मुलांच्या आरोग्य आणि मानसिकतेवर होतो
- मुलांसाठी धोकादायक असल्याचे सिद्ध झालेले रोजगार

**रणनिती :**

१९९१च्या जनगणनेनुसार भारतातील बालमजुरांची संख्या ११. २८ दशलक्ष होती. परंतु १९९९-२०००च्या एनएसएसओ सर्वेक्षणानुसार हा आकडा १०. ४० दशलक्ष इतका आहे. पहिल्या टप्प्यात धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या मुलांचे पुनर्वसन करण्यावर भर दिला जाईल. या योजनेंतर्गत धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या मुलांचे प्रथम सर्वेक्षण केले जाईल आणि नंतर त्यांना विशेष शाळांमध्ये (पुनर्वसन आणि कल्याण केंद्र) दाखल केले जाईल. त्या ठिकाणी या मुलांना मुख्य प्रवाहातील इतर सामान्य मुलांच्या शाळांमध्ये शिक्षण घेण्यायोग्य सक्षम बनविण्यात येईल. त्यांना व्यावसायिक प्रशिक्षणही दिले जाईल.

**योजनेचे घटक:**

राष्ट्रीय बाल मजूर प्रकल्पांतर्गत प्रकल्प क्षेत्रातील बाल मजुरांच्या भल्यासाठी विविध प्रकारच्या विकास आणि कल्याण योजनावर भर दिला जाईल. दहाव्या पंचवार्षिक योजनेंर्गत पुढील कृती कार्यक्रमांचा त्यात समावेश होता :

- बाल मजुरीविषयक कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी
- औपचारिक-अनौपचारीक शिक्षण
- व्यावसाईक प्रशिक्षणाची तरतूद
- उत्पन्न आणि रोजगार निर्मिती
- बालमजुरांचे थेट पुनर्वसन
- बालमजुरीबाबत जनजागृती
- सर्वेक्षण आणि मूल्यमापन

(स्त्रोत : श्रम आणि रोजगार मंत्रालय संकेतस्थळ )


ही सगळी तर के'सागरचीच पुस्तके आम्ही तर तीच अभ्यासतो! पण, आम्ही ती विद्यार्थ्यांना सुचवीत नाही, असे का ? का ?
आई-वडिलांनी अभ्यासलेले अन् मुलांच्या हाती सोपविलेले, ३० वर्षांचा इतिहास असलेले के'सागरीय संदर्भ..
स्पर्धा परीक्षा पुस्तकांसंदर्भात योग्य मार्गदर्शन करू शकणारे सुविद्य अभ्यासू विक्रेते...
सर्व स्पर्धा परीक्षांची सर्व प्रकाशनांची सर्व पुस्तके असणारी महाराष्ट्रातील दोन स्वतंत्र दालने-
सूट २०% ते ५०%
K'Sagar's हाऊस ऑफ बुक्स
'दुर्गा चेंबर्स', ३९/१ बुधवार पेठ, अप्पा बळवंत चौक, जोगेश्वरी मंदिराशेजारी, पुणे-४११ ००२.
९९२३९०६५००/८०८७७२२२७७
(०२०) २४४८३१६६
K'Sagar बुक सेंटर
'नुतन क्लासिक', नारायण पेठ, नू. म. वि. प्राथमिक शाळेसमोर, अप्पा बळवंत चौक, पुणे-४११ ००२.
९८२३१२१३९५/९५४५५६७८६२/६३
(०२०) २४४५३०६५
कारण आम्ही क्लासेसमध्ये त्यातूनच शिकवतो ना!
आज अधिकारी असलेल्या प्रत्येकानं अभ्यासलंय के'सागर!
के'सागरीय पुस्तके अभ्यासा म्हणजे क्लासेसच्या टेस्ट सेरिजमधील सर्व प्रश्नांची उत्तरे तर तुम्हाला देता येतीलच पण आयोगाची प्रश्नपत्रिकाही तुम्ही सहज सोडवाल!
सुबोध भारतीय राज्यघटना
स्टेट बँक ऑफ इंडिया क्लेअरिकल ग्रेड भरती परीक्षा
STI PSI ASSTT पूर्व परीक्षा
संपूर्ण पोलीस कॉन्स्टेबल भरती परीक्षा
लेटेस्ट जनरल नॉलेज व चालू घडामोडी
स्पर्धा परीक्षा भारताचा भूगोल
महाराष्ट्राचा भूगोल
कृषिविषय
संपूर्ण कृषिसेवक
जिऑग्रफी थ्रू मॅप्स इंडिया
K'Sagar आयोगाच्या वाढत्या काठिण्यपातळीनुसार अन् प्रश्नांच्या नव्या धर्तीनुसार रचना केलेले संदर्भ

Yojana Marathi (Monthly) May 2016
RNI No. MAHMAR/2009/32156
Reg No. G/NMD/137/2016-18
Published Date : 12th May, 2016
Date of Posting : 16th May, 2016

# राज्यसेवा 2015-16 मधील यशवंत



**अतुल कानडे**
(राज्यात प्रथम)
Excise SP



**श्रीमती रोहिणी नऱ्हे**
(राज्यात मुलींमध्ये प्रथम)
N.Tahshildar




**अभिजीत नाईक**
(एस.टी. प्रवर्गात प्रथम)
Dy. Collector



**उमाकांत पारधी**
(राज्यात पाचवा) Dy. Collector

"माझ्यासारख्या कुठलाही क्लास करण्याची परिस्थिती नसलेल्या ग्रामीण भागातील मुलांसाठी कोळंबे सरांचे Economics, Indian Constitution ही पुस्तके म्हणजे One Stop Solution. महाराष्ट्रातला प्रत्येक विद्यार्थी हा सरांशी पुस्तक रुपाने जोडलेला असतो मग तो सरांचा विद्यार्थी असो वा नसो.




**स्नेहा उबाळे**
Dy. Collector

"When you want something all the universe conspires in helping you to achieve it.... and Ranjan Sir and his Bhagirath Academy provided the requisite universe for me.




**धनंजय पाटील**
Dy. SP.

"सरांच्या Teaching चा आणि सर्व पुस्तकांचा माझ्या यशामध्ये प्रचंड मोलाचा आहे. जवळ-जवळ सर्वच विषयांसाठी मी श्री. रंजन कोळंबे सरांचीच पुस्तके वाचली आहेत. सरांच्या Interview चा मला खुप फायदा झाला. One Man Army आहेत सर मी सरांचे आभार मानतो आणि भगीरथच्या पुढील वाटचालीस खुप शुभेच्छा...



**अनुराधा गुरव** Dy. SP.
(ओबीसी मुलींमध्ये प्रथम)

"मी फक्त कोळंबे सरांचीच विद्यार्थीनी आहे. Pre पासुन Interview पर्यंत रंजन सर हे असे एकमेव व्यक्तीमत्त्व आहे की, जे स्वतः UPSC, MPSC चे लेक्चर स्वतः घेतात. सोबत सेमीनार घेतात, दर्जेदार पुस्तके लिहितात इतके असुनही UPSC, MPSC चे मॉक इंटरव्हूव सुद्धा घेतात. रंजन सर हेच खरे आमचे प्रेरणास्त्रोत! त्यांनी रचलेल्या पायावरच आम्ही आमची यशाची इमारत उभी करु शकलो.



"माझ्या यशाचे संपूर्ण श्रेय श्री. रंजन सर आणि माझ्या कुटुंबाला जाते. रंजन सरांच्या मार्गदर्शनाचा मला परीक्षेच्या Prelim, Main आणि Interview या तिन्ही टप्प्यावर खूप फायदा झाला. संवाद कसा साधायचा आणि कोणत्याही बाऊंसवर शांत कसे रहायचे हे सरांकडून शिकलो. त्यामुळेच मी Jack of everything, though master of none बनू शकलो. Thank you so much Sir....

**संदिप मिटके**
Dy. SP.

**35+ Students Class I**

**95+ Students Class II**

## UPSC 2016-17
Foundation Batch
Prelim + Mains + Interview
Starts From : 1 July 2016

## MPSC 2016-17
Foundation Batch
Prelim + Mains + Interview
Starts From : 4 July 2016

**Bhagirath IAS Academy**
UPSC • MPSC

मंत्री हाईटस्, २ रा मजला, शनिवार पेठ, पुणे -३०.
फोन नं. : 020-64013450 | 9970298197 | 7378406920
*Web :* www.bhagirathacademy.com
*E-mail :* bhagirathacademypune@gmail.com
*Facebook :* Bhagirath IAS Academy

Editor - **Umesh Ujgare**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Additional Director General (I/C), on behalf of Publication Division and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.
Posted at - Mumbai - Patrika Channel Sorting Office,GPO, Mumabi - 400 001.